

मासिक वार्तापत्र • अंक 19 • मे 2021 • सहयोग मूल्य - रु. 5 • 16 पाने

# कामगार बिगुल

### नव्या समाजवादी क्रांतीचा उद्घोषक


पाच राज्यांमध्ये झालेल्या निवडणुकांचा निकाल आणि कामगार वर्गाचा दृष्टिकोण 3

धनिक शेतकरी आंदोलनाचे वर्गचारित्र्य उघड करणाऱ्या काही घटनांचे विश्लेषण 5

हेलिन बोलेक आणि इब्राहिम गोक्चेक यांच्या आठवणी 15


## लाखोंचे मृत्यू! फॅसिस्ट मोदी सरकारचे करोना थांबवण्यात घोर अपयश!

### अजून एका अनियोजित लॉकडाऊन-मुळे कामगार-कष्टकऱ्यांवर संकटांचा पहाड !

**संपादक मंडळ**

करोनाच्या दुसऱ्या लाटेचा कहर अजूनही चालूच आहे आणि यामध्ये महामारीसोबतच पुन्हा एकदा अनियोजित लॉकडाऊनमुळे कामगार-कष्टकरी वर्गावर संकटांचा पहाड कोसळला आहे. लाखो लोक तडफडून मरत असताना एकीकडे देशाचा 'सर्वोच्च नेता' आपल्या फॅसिस्ट सत्तेचे 'गौरवशाली' प्रतिक असलेला 'सेंट्रल विस्टा'चा राजमहाल हजारो कोटी रुपये खर्चून आणि कायदे धाब्यावर बसवून बांधण्यात व्यस्त आहे, तर दुसरीकडे फॅसिस्ट राज्यसत्ता इलाजासाठी जनतेतून उठणाऱ्या आवाजांना दाबण्यात, आणि भांडवली मीडीयाच्या सहाय्याने मुद्यांना भरकटवण्यात व्यस्त आहेत.

#### भयावह चित्र

एप्रिल मध्ये देशाच्या विविध शहरांमध्ये दिवसरात्र भडकलेल्या चितांच्या चित्रांनी देशाच्या अंतरात्म्याला अस्वस्थ करुन सोडले होते. परंतु त्यानंतरच्या काही दिवसात समोर आलेले गंगा-यमुनेच्या पाण्यावर तरंगणारे हजारो मृतदेह आणि नद्यांच्या पात्रांमध्ये वाळूत पुरुन ठेवलेले हजारो मृतदेह, काळजाला भेग पाडत ओरडून ओरडून करोना महामारीमध्ये केंद्र-राज्य सरकारांचे आणि नफेखोर आरोग्य व्यवस्थेच्या अपयशाचे भयाण चित्र दाखवत होते. हॉस्पिटल्सच्या दारांवर तडफडून मरणारी माणसं, स्मशानात लाकडं मिळत नाहीत म्हणून होणाऱ्या हाणामाऱ्या, 10 ते 15 पट किंमतींना काळ्याबाजारात विकली जाणारी औषधं आणि त्यातही झालेली फसवेगिरी, पी.एम. केअर्स फंडातून आलेले व्हेंटीलेटर्स न चालल्यामुळे गेलेले जीव, सोशल मीडीयावर रोज चाललेला मदतीसाठीचा टाहो, तोंडाने आपल्या मुलाला ऑक्सिजन देण्याचा प्रयत्न करणारा हताश बाप, एकाच कुटुंबातील सर्वांचे झालेले मृत्यू, अनाथ झालेली शेकडो बालकं, अशी सर्व विदारक चित्र एकच वास्तव सांगत आहेत: दीड वर्षांचा वेळ मिळूनही केंद्र आणि राज्य सरकारांचं, आणि त्यातही विशेषत: फॅसिस्ट मोदी सरकारचं घोर अपयश!

#### मृत्यूचे दिखाव्याचे आकडे आणि खरे भीषण वास्तव

जागतिक आरोग्य संघटनेनेच आता मान्य केले आहे की जगाच्या स्तरावर करोनाने झालेले मृत्यू आधिकारिक आकड्यांपेक्षा 2 ते 3 पट जास्त असतील. तेव्हा भारतासारख्या मोजदाद करण्याला गांभीर्याने न घेणाऱ्या देशात, जिथे फॅसिस्ट सत्ताधाऱ्यांनी तर आकडे लपवणे, गोळा न करणे आणि केले तरी जाहीर न करणे या पद्धतीला जोपासले आहे, वास्तव मृत्यूचे आकडे आधिकारिक आकड्यांच्या किमान दहा पट असतील यात आश्चर्य नाही.

एप्रिलच्या अंकात आम्ही गुजरात, राजस्थान, दिल्ली, उत्तरप्रदेश, महाराष्ट्र अशा अनेक राज्यांमध्ये कशाप्रकारे सरकारी दबावाखाली आणि खोटे चित्र उभे करण्यासाठी मृत्यूचे आकडे लपवले जात आहेत याबद्दल मांडणी केली होती. घरांमध्ये झालेले मृत्यु, कोव्हिड रिपोर्ट येण्याअगोदर झालेले मृत्यू, गावाखेड्यांकडे तपासण्याच न होता झालेले मृत्यू, करोनाबद्दल समाजमनात निर्माण झालेल्या ठपक्याच्या भावनेमुळे समोर न आलेले मृत्यू, मृत्यूचे कारणच

पान 4 वर

## लसींच्या नावाने फसवणूक सूरूच!

### अपुऱ्या लसीकरणा अभावी, ज्ञानाच्या मक्तेदारीपायी, देश संकटात!

### सर्वांना लस मिळणेच दुरापास्त, मोफत तर दूरची गोष्ट आहे! मोदीच्या लोकरंजकतेची शिक्षा देश भोगणार आहे!

**✍ अभिजित**

गेल्या शतकातल्या अनुभवाने पक्के केलेले, सूर्यप्रकाशाएवढे स्पष्ट वैज्ञानिक सत्य हेच आहे की करोना सारख्या साथींच्या रोगांवर एकमेव इलाज आहे बहुसंख्यांक जनतेचे लसीकरण. लसीद्वारे बहुसंख्यांक जनतेची रोगप्रतिकारक शक्ती विकसित होते आणि साथींच्या प्रसारावर आळा बसतो. लहान मुलांना अनेक लसींचे जे डोस दिले जातात त्यामुळेच देवी, पोलिओ सारख्या अनेक रोगांवर माणसाने निर्णायक विजय मिळवला आहे.

अशामध्ये संपूर्ण भारताचे तातडीने आणि विनामूल्य लसीकरण करणे हीच सरकारची प्राथमिकता हवी होती. मार्च महिन्यापर्यंत भारत हा जगातील सर्वाधिक मोठा लसनिर्माता देश आहे अशा प्रचाराच्या फैरी डागल्या गेल्या. परंतू वास्तव हे आहे की जनतेचे सार्वत्रिक लसीकरण करणे हे भारत सरकारचे उद्दिष्ट नव्हते आणि आता (तहान नाही!) घराला आग लागल्यावर विहीर खोदण्याचे काम चालू झाले असले, तरी येत्या वर्षभरात तरी ते शक्य होईल असे दिसत नाही. अगोदर ब्रिटनमधील ॲस्ट्राझेनेकाने शोधलेली आणि पुण्यातील सीरम कंपनीने बनवलेली कोव्हीशील्ड लस आणि नंतर भारत बायोटेक कंपनीने बनवलेली कोव्हॅक्सिन लस या दोन्ही लसींना चाचण्यांच्या कडक निर्बंधांमधून सूट देऊन लसीकरणाला परवानगी दिली गेली. जनतेच्या हिताकरिता ही घाई केली गेली असेच म्हटले गेले, परंतु एकाप्रकारे मोठ्या संख्येने विनापरवानगी जनतेला लस देऊनच, जनतेला 'गिनी पीग' बनवूनच पुढच्या टप्प्यातली चाचणी केली गेली. सुदैवाने लसीचे गंभीर दुष्परिणाम समोर आलेले नाहीत आणि लस सुरक्षित आहे असेच वैज्ञानिक समुदायाचे मत आहे. यानंतर गरजेचे बनले होते की अत्यंत व्यापक नियोजनाद्वारे संपूर्ण जनतेचे तात्काळ लसीकरण हाती घेतले जावे, आणि हे करणे तेव्हाच शक्य होते, जेव्हा वर्षभर अगोदरपासून याची तयारी केली गेली असती.

परंतु रोज चाललेल्या लसींच्या जाहिरातींमध्ये, मोदींनी एप्रिल मध्ये जाहीर केलेल्या 4 दिवसांच्या 'लस महोत्सवाच्या' गजरामध्ये, जगातील सर्वात मोठ्या लसीकरण मोहिमेच्या घोषणांमध्ये, सीरमला भेट देऊन मोदींनी केलेल्या अजून एका फोटो समारंभामध्ये, जणू काही मोदी सरकार लसीद्वारे जादूची कांडी फिरवणार आहे अशा पैदा केलेल्या भ्रमाच्या फुग्यामध्ये **एक गोष्ट गायब आहे: प्रत्यक्ष लस. देशाच्या लसीकरणाची कोणतीही व्यावहारिक, सार्वत्रिक मोहिमच मोदी सरकारने आखलेली नव्हते हे नागडे वास्तव समोर आहे. एकीकडे जगातील काही देश बहुसंख्य लोकसंख्येला लस देऊन मास्क मुक्त होत असताना, भारत मात्र अजून किमान वर्षभराच्या करोना संकटाच्या सावटात जगणार आहे अशी लक्षणे दिसत आहेत.** मोदी सरकारच्या या कर्तुत्वामुळे, लसीकरण केंद्रांवर उडालेली झुंबड आणि तेथे होणारी रोजचीच भांडणं, आणि करोनाच्या लाटांची सततची भिती हे चित्र आता बराच काळ चालणार आहे.

पान 11 वर

# दुर्घटना नाही हत्याकांडाचे सत्र आहे हे!

✍बबन

नजिकच्या काही काळातच नाशिक, भांडूप, भंडारा, नालासोपारा येथील हॉस्पिटल्स मधील असंख्य रुग्णांचे बळी घेणाऱ्या अपघातांच्या घटना आपल्या स्मृतीपटलावरुन येवढ्या सहज मिटणार आहेत काय? करोना बाधीतांचा संघर्ष हा जगण्यासाठीच आहे, मग त्यांच्या वाट्याला आलेले हे अपघाती मरण कोणामुळे? याची जबाबदारी कोण घेणार? करोना महामारीच्या काळात भांडवली आरोग्य व्यवस्थेचे जे बिभत्स चित्र आपल्या समोर आले आहे त्यावर बरंच काही पाहून, भोगून, जगून आणि लिहून झालं आहे, पण मूलभूत प्रश्न अजूनही कायम आहेत.

भंडाऱ्यात 9 जानेवारी रोजी सरकारी रुग्णालयात रात्री 2 वाजता आग लागल्याने अतिदक्षता विभागात असलेल्या 10 नवजात बालकांचा जागेवरच मृत्यू झाला. आग नियंत्रणात आल्यावर बालकांना बाहेर काढण्यासाठी गेलेल्या कर्मचाऱ्यांनी त्यांचे शरीर हे अधिकाऱ्यांच्या शब्दात "कोळशासारखे जळालेल्या" अवस्थेत सापडले. आपल्याला माहित असावे कि सरकारी रुग्णालयात मृत्युमुखी पडलेले सर्वच नवजात बालकं ही गरीब कुटुंबात जन्माला आलेली होती. या घटनेला 3-4 महिने झाल्यानंतरही हॉस्पिटल्सचे फायर ऑडीट (अग्निप्रतिरोधक परिक्षण) पूर्ण न झाल्यामुळे राज्यात अशा घटना घडतच आहेत.

24 मार्च च्या रात्री भांडूप मध्ये आग लागल्याने कोविड सेंटर असलेल्या मॉलच्या इमारतीला आग लागल्याने 10 रुग्ण जागीच मृत्युमुखी पडले. एक महिना होत नाही, तर नाशिकच्या झाकीर हुसैन रुग्णालयात ऑक्सिजन गळती झाल्यामुळे 21 एप्रिल रोजी 131 रुग्णांचा जीव धोक्यात आला त्यापैकी 24 जणांना आपले प्राण गमवावे लागले. त्यानंतर दोनच दिवसांनी 23 एप्रिल रोजी नालासोपारा (विरार) मधील रुग्णालयाच्या इमारतीला आग लागल्याने 13 रुग्णांना आपले प्राण गमवावे लागले. यानंतर लगेचच 28 एप्रिल रोजी ठाण्यात देखील वरील कारणामुळे एका रुग्णालयाला आग लागली. त्यात 4 रुग्णांचा बळी गेला.

या सर्व घटनांनी पुन्हा एकदा आपत्ती व्यवस्थापन किती ढिसाळ पद्धतीने करते हे जाहीर केलेच आहे. असंख्य निर्दोष रुग्णांना तडफडत आपले प्राण गमवावे लागले, परंतु आरोग्य यंत्रणेत आमूलाग्र सुधारणा तर दूरच, साधे अग्निप्रतिरोधक यंत्रणांचे कामही झालेले नाही.

या सर्व घटनांवर फक्त उसासे सोडणे, दुर्घटना म्हणून खंत व्यक्त करणे, आणि भांडवली विरोधी पक्षांद्वारे राजकीय टीकेचे गुण वसूल करणे याशिवाय काहीही झाले नाही. सरकार तर्फे सुद्धा चौकशी समित्यांचे फार्स पुन्हा केले गेले आणि सर्व परिस्थिती येरे माझ्या मागल्या अशीच आहे.

आग लागून रुग्णांचे प्राण जाण्याचे प्रमुख कारण आहे हॉस्पिटल्स मध्ये अग्निशमन यंत्रणेचा, अग्निप्रतिरोधक बांधणीचा अभाव, गजबजलेल्या जागी हॉस्पिटल्स बांधणे, आग वा सुरक्षेचे नियम डावलून कोणत्याही बिल्डिंगच्या कोपऱ्यात हॉस्पिटल्सचा धंदा सुरु करणे, सुरक्षा यंत्रणेकडे झालेले दुर्लक्ष, नियमित देखरेख आणि तपासणी न करणे. यापैकी प्रत्येक समस्येच्या मुळाशी एकच गोष्ट आहे आणि ती आहे खर्चाचा अभाव आणि मानवी जीवनाप्रती नसलेली संवेदना. नियम मोडीत काढून, प्रचंड पैसे खाऊन सुरक्षा नियम न पाळणाऱ्या हॉस्पिटल्सना परवानगी देणे हा शिरस्ता बनला आहे. खर्चाचा अभाव यामुळेच आहे कारण की देशभरात सर्वत्र खाजगी आरोग्य यंत्रणेला प्रोत्साहन देणे आणि सरकारी यंत्रणा मोडीत काढणे किंवा तिचेच खाजगीकरण करणे हेच धोरण आहे. खाजगी आरोग्य व्यवस्था नफा बघते, मानवी जीवन नाही. तेव्हा खर्च कमी करण्याचे आणि त्यापायी लोकांचे जीव धोक्यात घालण्याचे काम सर्वच उद्योगांमध्ये चालते. भोपाळ गॅस दुर्घटना, जिथे 1984 मध्ये एका रात्रीत 8000 जीव घेतले, ती सुद्धा सुरक्षेच्या खर्चाकडे दुर्लक्ष केल्यामुळेच झाली होती. महाराष्ट्रातील सर्व हॉस्पिटल्समध्ये झालेले मृत्यू हे सुद्धा सरकारने वा खाजगी क्षेत्रा ने सुरक्षेवर न केलेला खर्च, आणि नफेखोर व्यवस्थेने निर्माण केलेली मानवी जीवनाप्रती अनास्था याचेच परिणाम आहेत.

राज्यासह देशभरातील आरोग्य व्यवस्था किती खिळखिळी आहे हे करोना महामारीत उघडपणे सर्वांच्या लक्षात आले आहे. पण सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेकडे चाललेले जाणीवपूर्वक दुर्लक्ष व नफेखोरीला मिळत असलेले प्रोत्साहन हे बहुसंख्य समस्यांच्या मुळाशी आहेत. गेल्या 3 दशकांमध्ये नियोजनबद्ध पद्धतीने सार्वजनिक आरोग्य सेवा मोडीत काढून खाजगी आरोग्य व्यवस्थेला, नफेखोरीला चालना देण्याचे काम करण्यात आले आहे. या सरकारी दवाखान्यांकडे कामगार्-कष्टकरी वर्ग शेवटचा उपाय म्हणून पाहतो, त्या सरकारी दवाखाने, हॉस्पिटल्सची अवस्था मरणासन्न रोग्यांची आहे, हे आज सर्वज्ञात आहे. आरोग्याच्या खाजगी क्षेत्रामध्ये 11 टक्के गुंतवणूक होत असतांना सरकारी आरोग्य सेवेत मात्र फक्त 1 टक्के गुंतवणूक केली जाते! थोडक्यात सर्वच पक्षांच्या सरकारांनी सत्तेत आल्यावर खाजगीकरणाचा घाट घालून आरोग्य व्यवस्था उध्वस्त करवली आहे.

सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अगोदरच तुटपुंज्या संसाधनावर आणि अपुऱ्या मनुष्यबळावर काम करत होती. सरकारी आरोग्य सेवेवर खर्च कमी करायचा हेच धोरण असल्यामुळे सरकारी हॉस्पिटल्स मध्ये मनुष्यबळाची वाणवा आणि साधनांकडे दुर्लक्ष होणारच. अशात या

पान 12 वर

साथींनो

'कामगार बिगुल' आपले स्वतःचे वृत्तपत्र आहे. हे वृत्तपत्र अधिक चांगले बनवण्यासाठी आपल्या सूचनांचे आम्ही स्वागत करतो. त्याच बरोबर आपण जर देशभरातील कामगारांपर्यंत आपल्या कारखान्यातील, ऑफिस मधील परिस्थिती, मालक वर्गाकडून केली जाणारी लूट, संसदीय राजकीय पक्षांचा श्रीमंत धार्जिणेपणा, पोलिस व मालकांच्या खाजगी गुंडांकडून केले जाणारे अत्याचार, तुमच्या रहिवासी वस्त्यांमधील खराब परिस्थिती, शिक्षण, आरोग्य यांसारख्या सुविधांचा अभाव इत्यादी विषयी आपली मतं पोहचवू इच्छित असाल तर आम्हाला आपले लेख किंवा प्रतिक्रिया पाठवू शकता. आपण आम्हाला खालील पत्त्यावर पत्र पाठवू शकता किंवा फोन करून सुद्धा संपर्क साधू शकता.

• रूम नंबर 209, हिरानंदानी बिल्डिंग-7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043 मो. - 9619039793, 9082861727
• अहमदनगर - 9156323976, 9657590491
• पुणे - 9422308125

## 'कामगार बिगुल'चे स्वरूप, उद्देश आणि जबाबदाऱ्या

1. 'कामगार बिगुल' व्यापक कष्टकरी जनतेमध्ये क्रांतिकारी राजकीय शिक्षक व प्रचारकाची भूमिका पार पाडेल. हे वृत्तपत्र कामगारांमध्ये क्रांतिकारी वैज्ञानिक विचारधारेचा प्रचार करेल आणि खऱ्याखुऱ्या सर्वहारा संस्कृतीचा वाहक बनेल. हे वृत्तपत्र जगभरातील क्रांतींचा इतिहास आणि त्यांच्यातून घ्यावयाचे शिक्षण, आपल्या देशातील वर्ग संघर्ष, कामगार चळवळीचा इतिहास आणि त्यातून घ्यावयाचे धडे यांच्याशी कामगार वर्गाला परिचित करेल. त्याच बरोबर समस्त भांडवली अफवा-दुष्प्रचारांचा भांडाफोड करेल.

2. 'कामगार बिगुल' भारतीय क्रांतीचे स्वरूप, मार्ग आणि समस्यांविषयी क्रांतिकारी कम्युनिस्टांमध्ये चालणाऱ्या विविध चर्चा नियमित रुपात छापेल आणि देश-विदेशातील राजकीय घटना आणि आर्थिक परिस्थितीचे योग्य विश्लेषण मांडून कामगार वर्गाला शिक्षित करण्याचे काम करेल.

3. 'कामगार बिगुल' स्वतः अश्या चर्चा चालवेल जेणे करून कामगारांचे राजकीय शिक्षण होईल. तसेच त्यांच्यामध्ये योग्य लाइनची समज विकसित होऊन ते क्रांतिकारी पार्टी बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकतील आणि त्यातून व्यवहारामध्ये योग्य लाइनच्या सत्यापनाचा आधार तयार होऊ शकेल.

4. 'कामगार बिगुल' कामगार वर्गामध्ये राजकीय प्रचार आणि शिक्षणाचे कार्य चालवत सर्वहारा क्रांतीच्या ऐतिहासिक जबाबदारीशी त्याला परिचित करेल, त्याला आर्थिक संघर्षासोबतच त्याच्या राजकीय अधिकारांसाठी लढायला शिकवेल, चार आणे-आठ आण्याच्या किरकोळ आर्थिक लढायांमध्ये कामगारांना अडकावून टाकणाऱ्या नकली कम्युनिस्टांपासून आणि भांडवली राजकीय पक्षांचे शेपूट असलेल्या किंवा व्यक्तिवादी-अराजकतावादी ट्रेड युनियन्स पासून सावध करत त्याला हरतऱ्हेच्या अर्थवाद व सुधारवादाविरुद्ध लढायला शिकवेल, त्याच बरोबर त्याच्यात सच्ची क्रांतिकारी चेतना निर्माण करेल. 'कामगार बिगुल' सर्वहारा वर्गाच्या फळ्यांमधून क्रांतीकारकांची भरती करण्याच्या कामात सहाय्यक बनेल.

5. 'कामगार बिगुल' हे वृत्तपत्र कामगार वर्गाचा क्रांतिकारी शिक्षक, प्रचारक आणि आवाहनकर्ता ह्या भूमिकांबरोबरच क्रांतिकारी संघटनकर्ता व आंदोलनकर्त्यांची भूमिका सुद्धा पार पाडेल.

### बिगुल व्हॉट्सॲप चॅनेल

जर तुम्ही आमच्याशी व्हाट्सॲप वर जोडून घेऊ इच्छिता, तर या लिंक वर जाऊन आमचा व्हॉट्सॲप चॅनेल जॉईन करावा - http://www.marathi.mazdoorbigul.net/whatsapp
चॅनेल जॉईन करण्यामध्ये काही समस्या असेल तर या नंबर वर आपले नाव आणि जिल्हा लिहून पाठवावा - 9892808704 (पर्यायी नंबर 9619039793)



**बुर्झ्वा वृत्तपत्रे भांडवलाच्या विशाल ढिगांच्या बळावर चालतात, कामगारांची वृत्तपत्रे स्वतः कामगारांनी गोळा केलेल्या पैशावर चालतात.**
**लेनिन**


# कामगार बिगुल

खाजगी वितरणासाठी

संपादक मंडळ : निखील एकडे, बबन ठोके

संपादकीय कार्यालय : रुम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग - 7-बी, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट), मुंबई 400043

संपर्क : 8669735643 , 9619039793

ईमेल : bigulakhbar@gmail.com

सहयोग राशी : रु. 5 (एका अंकासाठी)
वार्षिक : रु. 100 (टपाल शुल्कासह)

# पाच राज्यांमध्ये झालेल्या निवडणुकांचा निकाल आणि कामगार वर्गाचा दृष्टिकोण

## केवळ निवडणुकां मार्गे फॅसिझमला हरवणे शक्य नाही!

## असा विचार करणे म्हणजे भांडवली उदारमतवादी भ्रमच!

### संघवादाच्या (फेडरिलझमच्या) भूमिकेतून फॅसिझमला उत्तर देता येत नाही!

### संघीय हक्कांच्या रक्षणाची घोषणा हा प्रादेशिक भांडवलदार वर्गाचा नारा आहे!

### हा कामगार वर्गाचा लढा नाही, तर वर्ग समर्पणवाद आहे!

### आज दरोडेखोरांच्या या वा त्या गटाला निवडण्याऐवजी कामगार वर्गाला निवडणुकांमध्येही आपला स्वतंत्र राजकीय पक्ष उभा करण्याची गरज आहे!

✍ शिवानी

बंगाल, आसाम, तामिळनाडू, केरळ या चार राज्यांसहित पुदुचेरी केंद्र शासित प्रदेशात मार्च-एप्रिल 2021 मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकांचे निकाल नुकतेच जाहीर झाले आहेत. पश्चिम बंगालमध्ये सत्ता पुन्हा तृणमूल काँग्रेसच्या हाती आली आहे, तर भाजप इथला दुसरा सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला आहे. आसाममध्येही भाजपप्रणीत युती पुन्हा एकदा सरकार बनवणार आहे. तामिळनाडूमध्ये काँग्रेस सामील असलेल्या द्रमुक प्रणीत आघाडीने निवडणूक जिंकली आहे आणि भाजपचा समावे असलेल्या अण्णाद्रमुक आघाडीला पराभवाला सामोरे जावे लागले आहे. केरळ विधानसभा निवडणुकीत सी.पी.एम.च्या नेतृत्वातील 'डाव्या लोकशाही आघाडी' (एल.डी.एफ.)ने पुन्हा निवडणूक जिंकली असून काँग्रेस प्रणीत युती युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंट (यूडीएएफ) पराभूत झाली आहे. पुदुचेरीमध्ये, एन.आर. काँग्रेस व भाजपच्या आघाडीने राज्य विधानसभेत बहुमत मिळवले आहे आणि पुदुचेरीमध्ये भाजपचेच युती सरकार स्थापन होणार आहे. एकूणच, निवडणुकांचे निकाल बरेच वैविध्यपूर्ण आहेत, पण तरीही बरेच विश्लेषक-निरीक्षक आणि राजकीय गट मनमर्जी निष्कर्ष काढण्यात व्यस्त आहेत. परंतु एक गोष्ट स्पष्ट आहे की, देश पातळीवर मोदी सरकारने करोना साथीसंदर्भात केलेल्या गैरव्यवस्थापनाची आणि गुन्हेगारी दुर्लक्षाची शिक्षा काही प्रमाणात भाजपला निवडणुकांमध्ये भोगावी लागली आहे. असो. **कामगार वर्ग आणि सामान्य कष्टकरी जनतेसाठी या निवडणुकीच्या निकालांचा अर्थ काय आहे हे समजून घेणे महत्वाचे आहे.**

संपूर्ण देश करोना साथीच्या दुसऱ्या लाटेचा आणि देशव्यापी आरोग्याच्या संकटाचा सामना करत असताना या पाच राज्यांत निवडणुका घेण्यात आल्या. निवडणुकीदरम्यान विविध पक्षांनी आयोजित केलेल्या मोठ-मोठ्या सभा आणि रोड-शोचा करोना संसर्गावर काय परिणाम झाला आहे ते आपल्या सर्वांसमोर आहे. निवडणुकीनंतर लगेचच बंगाल, तामिळनाडू आणि केरळमध्ये करोना संसर्ग आणि करोना मृत्यूच्या घटनांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. परंतु यादरम्यान, निवडणूक आयोग हात धरून बसून राहिला आणि सर्व निवडणुक पक्षांनी या साथीच्या गांभीर्याची थट्टाच केली. मतदानाच्या शेवटच्या टप्प्याच्या वेळी या पक्षांकडून काही दिखाव्याची पावले उचलली गेली होती पण तोपर्यंत बराच उशीर झाला होता. आणि त्यातही भाजप व मोदी सरकार तर शेवटपर्यंत सभा आयोजित करण्यात व्यस्त होते आणि प्रधानमंत्री मोदी निर्लज्जपणे व्यासपीठावरून हात हलवून बोंबलत होते की आजपर्यंत एवढी मोठी सभा आपण पाहिलीच नाही!

जेव्हा रोम जळत होते आणि तिथला राजा निरो बासरी वाजवत होता, तेव्हा असेच काहीतरी घडले असावे. **अनेक आंतरराष्ट्रीय आरोग्य तज्ञांनी सुद्धा असे म्हटले आहे की निवडणूक सभा आणि कुंभमेळ्या सारख्या धार्मिक मेळाव्याचा 'सुपर स्प्रेडर' कार्यक्रम हेच इतक्या तीव्रतेने करोना संक्रमणाच्या प्रसारास कारणीभूत आहेत. परंतु प्रत्यक्षात तर सत्तेत बसलेले ते लोक जबाबदार आहेत, जे सर्व काही माहित असूनही हे होऊ देत होते. हे देशातील जनतेविरोधात भयंकर गुन्ह्यापेक्षा कमी नाही. फेब्रुवारी महिन्यातच, सरकारने नियुक्त केलेल्या वैज्ञानिकांच्या समितीने इशारा दिला होता आणि एप्रिलच्या सुरूवातीसच हे समजू लागले होते की संक्रमणाची ही दुसरी लाट अधिक संक्रामक आणि प्राणघातक आहे, परंतु निर्दोष लोकांच्या जीवाला धोक्यात टाकण्याचेही पाप निवडणूक आयोग आणि मोदी सरकारच्या माथी आहे.** त्यांच्या या जनद्रोही वागणुकीबद्दल त्यांना सर्वात कडक शिक्षा का होऊ नये? मोदी सरकारचे हे अक्षम्य गुन्हेगारी दुर्लक्ष हेच कारण आहे की आज भारतातील कष्टकरी लोकांना करोना महामारी आणि उपासमार या दोन्ही गोष्टींना बळी पडावे लागत आहे.

एकीकडे, करोना संकटाच्या या संपूर्ण काळात, मोदी सरकारचा गैरकारभार व सरकारी उत्तरदायित्व व जबाबदारीपासून पलायन साथीला कैक पट अक्राळविक्राळ बनवत होते, तर दुसरीकडे साथीशी लढण्याचे कोणतेही सुसंगत नियोजन आणि सुरळीत अंमलबजावणी करण्याऐवजी सगळे केंद्रीय मंत्रिमंडळ आणि केंद्र सरकार निवडणुकांच्या प्रचारात मस्त होते. करोना आपत्तीच्या काळातच पश्चिम बंगालच्या निवडणुका आठ टप्प्यात करवल्या गेल्या ज्यायोगे मोदी-अमित शहा आणि सर्व केंद्रीय मंत्र्यांच्या जास्तीत जास्त सभा आयोजित करता याव्यात. प्रत्येक निवडणुकीप्रमाणेच भाजपने या निवडणुकांमध्येही खूप पैसा-संसाधने उधळली, प्रसारमाध्यमांना 'सेट' केले आणि निवडणूक आयोगाला खिशात घातले. असे असूनही, मोदी-शहा यांना अपेक्षित निकाल मिळाले नाहीत आणि त्यांना पश्चिम बंगाल, तामिळनाडू व केरळमध्ये पराभवाला सामोरे जावे लागले. यामागील प्रमुख कारणांपैकी एक, अगोदर म्हटल्याप्रमाणे, मोदी सरकारचे करोना महामारीबद्दल अगांभीर्य व गैरव्यवस्थापन सुद्धा आहे, ज्याचा परिणाम उत्तर प्रदेशातील नुकत्याच पार पडलेल्या पंचायत निवडणुकांच्या निकालावरही दिसून आला आहे.

पश्चिम बंगालचा विचार केला तर, ना फक्त संघ परिवाराने भाजपला विजयी करण्यासाठी सर्व शक्ती पणाला लावली होती, तर निवडणूक आयोगही यासाठी टाचा घासून जोर लावून होता. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, योगी आदित्यनाथापासून ते सर्व केंद्रीय मंत्री आणि इतर राज्यांतील भाजप-संघी नेत्यांनी बंगाल जिंकण्यासाठी कोणतीही कसर सोडली नाही. फक्त बंगाल निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मोदींनी बांगलादेशचा दौरा केला आणि तिथे जाऊन बांगलादेशलाही 1.2 कोटी कोविड-लसींची भेट दिली! बंगाल निवडणुकीत निवडणूक आयोगाच्या भूमिकेमुळे पुन्हा एकदा हे स्पष्ट झाले आहे की भारतीय फॅसिस्टांनी बऱ्याच काळापासून नोकरशाही, न्यायव्यवस्था आणि अगदी निवडणूक आयोगातही घुसखोरी केली आहे आणि आपल्या गरजांनुसार त्यांना वाकवले आहे. निवडणूक आयोगाची गुन्हेगारी उदासीनता आणि निवडणूक जिंकण्याच्या मोदी सरकारच्या लालसेने पश्चिम बंगालला प्रचंड मोठ्या करोना संसर्ग आणि मृत्यूच्या भोवऱ्यात ढकलले आहे. निवडणूक आयोग आणि भाजप आता गायब झाले आहेत, परंतु बंगालमधील जनता करोना संसर्गाला भोगत आहे.

**पाच राज्यात झालेल्या या निवडणुकांमध्ये सर्वाधिक चर्चा पश्चिम बंगालच्या निवडणूकची होती.** याचे एक कारण असे होते की संघ परिवार, भाजप आणि मोदी-शहाची नजर बंगालवर बऱ्याच काळापासून होती. त्या दृष्टीनेच त्यांच्याकडून बरीच तयारीही केली जात होती. नागरिकत्व दुरुस्ती कायदा (सी.ए.ए.) आणि राष्ट्रीय नागरिकता नोंदवही (एन.आर.सी.) लागू करण्यामागील प्रमुख हेतू पश्चिम बंगाल तसेच आसाममधील विधानसभा निवडणुका सुद्धा होत्या. "मुस्लिम" आणि "बांग्लादेशी घुसखोर" सारख्या कल्पित शत्रूंच्या प्रतिमा तयार करुन राजकीय ध्रुवीकरण करणे हे या दोन राज्यांमधील हिंदुत्ववादी फॅसिस्टांसाठी माध्यम होते. म्हणून, आर.एस.एस. आणि मोदी-शाह यांच्यासाठी पश्चिम बंगालची निवडणूक ही हिंदुत्ववादी फॅसिस्ट राजकारणाची स्थापना करण्याच्या दृष्टीकोनातून सर्वात महत्वाची होती. बंगालमध्ये मुस्लिम लोकसंख्या बरीच, म्हणजे एकूण लोकसंख्येच्या सुमारे 30 टक्के आहे. फॅसिस्टांसाठी या प्रकारे धार्मिक ध्रुवीकरणाची जमीनही येथे मोठ्या प्रमाणात होती. हेदेखील लपून राहिलेले नाही की भाजपने पैसे, संसाधने, आणि केंद्र सरकारच्या यंत्रणेची संपूर्ण ताकद विशेषत: पश्चिम बंगालमधील निवडणुकांच्या तयारीसाठी लावली होती. मोदींनी 20 आणि गृहमंत्री अमित शहा यांनी एकट्या पश्चिम बंगालमध्ये 50 हून अधिक सभांना संबोधित केले. याखेरीज भारतीय फॅसिस्टांच्या कह्यातील अत्यंत लवचिक निवडणूक आयोगाच्या कामगिरीनेही भाजपचा मार्ग सुकर केला. **म्हणायला बंगालमधील स्पर्धा त्रिकोणी होती, परंतु काँग्रेस व संसदीय डाव्या पक्षांना सुरुवातीपासूनच गंभीर दावेदार म्हणून कोणीच पाहिले नाही.**

बंगाल निवडणुकीच्या निकालात ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसने 292 जागांपैकी 213 जागा जिंकल्या आणि एकूण मतांपैकी 47.94टक्के मते मिळवली. उमेदवारांच्या मृत्यूमुळे दोन जागांवर निवडणूका झाल्या नाहीत. 2016 च्या विधानसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेसने 211 जागा जिंकल्या होत्या. दुसरीकडे, यावेळी झालेल्या निवडणुकीत भाजपला 77 जागा मिळाल्या असून एकूण मतदानाच्या 38.13 टक्के मते त्यांना मिळाली आहेत. काँग्रेस, संसदीय डावे, आणि इंडियन सेक्युलर फ्रंटची युती इनमीन एक जागा जिंकू शकली, तीदेखील आय.एस.एफ.च्या उमेदवारीच्या जागेवर.

निवडणुकीच्या प्रचारादरम्यान मतांचे ध्रुवीकरण करण्यात कोणतीही कसर सोडली नाही आणि प्रचंड धर्मवादी ध्रुवीकरणाचे वातावरण तयार केले. याशिवाय, निवडणुकीच्या ठीक अगोदर टी.ए.मसी.चे अनेक दिग्गज नेते भाजपवासी झाले ज्यामुळे ममता बॅनर्जी यांना मोठा धक्का बसला. त्यातील सर्वाधिक उल्लेखनीय होते सुवेंदु अधिकारी जे ममता बॅनर्जीनंतर तृणमूलमधील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात शक्तिशाली नेते मानले जात होते. 2017 मध्ये तृणमूल काँग्रेसचे माजी नेते मुकुल रॉय यापूर्वीच भाजपमध्ये दाखल झाले होते. पण निवडणूकीच्या वेळी जणू काही बंगालच्या राजकीय देखाव्यावर पक्षबदलूंची टोळधाडच चालून आली होती. या सर्वांमुळे तृणमूल काँग्रेसची स्थिती काहीशी ठीक दिसत नव्हती आणि म्हणूनच नंदिग्राममधील "कार्यकर्त्यांचे मनोबल वाढविण्यासाठी" ममता बॅनर्जी यांनी सुवेंदू अधिकारी यांच्याविरुध्द लढा दिला आणि पराभवही पत्करला. आता नंदीग्रामच्या चळवळीची वेगळीच कहाणी होती; 2007 साली डाव्या आघाडीच्या सरकारविरूद्ध झालेल्या चळवळीचा चेहरा ममता बॅनर्जी होत्या खऱ्या, परंतु खरा संघटक सुवेंदु अधिकारीच होते. त्यामुळे या जागेवरुन भाजपचा विजय अनपेक्षित नाही. मजेची गोष्ट म्हणजे म्हणजे **निवडणुकांच्या काळात धनिक शेतकरी आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या संयुक्त किसान मोर्चाने, ज्यामध्ये संसदीय बोलघेवड्या डाव्यांच्याही युनियन सामील आहेत, नंदीग्राममध्ये भाजपविरोधात आणि तृणमूल काँग्रेसच्या समर्थनार्थ प्रचार केला!** अर्थातच, सी.पी.आय.-सी.पी.एम.ने स्वत:ला या प्रचारापासून दूरच ठेवले कारण सिंगूर-नंदीग्रामचा काळा भूतकाळ त्यांचा पिछा सोडू शकत नाही. परंतु हे निश्चित आहे की धर्मवादी फॅसिझमला पराभूत करण्याच्या नावाखाली, या प्रकारच्या 'शंकराच्या वराती'ची संयुक्त आघाडी बनवण्याच्या अयशस्वी प्रयत्नांचे असे हास्यास्पद परिणामच होणार. ही बाब वेगळी की धनिक शेतकरी चळवळीतील नेत्यांची भाजपविरोधी निवडणूक मोहीम विशेष प्रभावी सुद्धा ठरली नाही.

अनेक निरीक्षक ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखाली तृणमूल काँग्रेसच्या या विजयाला

पान 6 वर

# लाखोंचे मृत्यू! फॅसिस्ट मोदी सरकारचे करोना थांबवण्यात घोर अपयश!

पान 1 वरून

वैद्यकीय रित्या न तपासता नोंदवण्याची ऐतिहासिक परंपरा, इतकेच नाही तर मृत्यूची नोंदच न होण्याची परंपरा, करोनामुळे मृत्यू झाला असला तरी सरकारी धाकामुळे तशी नोंदच न होणे, अशी अनेक कारणे आहेत ज्यामुळे भारतात करोनामुळे झालेले वास्तव मृत्यू आणि सरकारी आकडा यात मोठी तफावत असणारच आहे.

भारतात आधिकारिक रित्या 3 लाखांवर मृत्यूंचा आकडा जरी दिला जात असला, तरी जगभरातील विविध तज्ञांच्या मते हा आकडा किमान दुप्पट तरी आहेच आणि बहुतांशी तो पाच पट म्हणजेच 16 लाखांच्या आसपास असण्याची शक्यता आहे. पूर, भुकंप, वादळं अशा आजवर आलेल्या कुठल्याही नैसर्गिक संकटामध्ये झालेल्या एकत्रित जीवहानीपेक्षाही हा आकडा प्रचंड मोठा आहे.

## या सर्व काळात मोदी सरकार काय करत होते

दीड वर्षांच्या काळानंतर जी स्थिती आहे, त्याला कारणीभूत आहे मोदी सरकारचे अक्षम्य दुर्लक्ष, आत्ममुग्धता, जनहिताप्रती असलेला तिटकारा, अहंकार आणि मग्रुरी जी कोणत्याही फॅसिस्ट सत्तेच्या कार्यपद्धतीचा भाग असतेच. गेल्या दीड वर्षात मोदी सरकार काय करत होते?

जानेवारी 2020 मध्ये जगभरात करोना पसरणे सुरू झाले होते. भारतात पहिली लाट मार्च 2020 मध्ये सुरू झाली, कारण चाचण्याच तेव्हा चालू झाल्या. 22 मार्च 2020 रोजी पहिला लॉकडाऊन जाहीर झाला. त्या अगोदर जगाच्या 150 देशांमध्ये करोना पसरून चुकला होता, पण मोदी सरकारने परदेशातून येणाऱ्या प्रवाशांकडे पूर्ण दुर्लक्ष केले. याच काळात डोनाल्ड ट्रंपच्या स्वागतात लाखोंची गर्दी जमवण्यात मोदी व्यस्त होते. यानंतरही सरकारी यंत्रणेला वेगाने हलवून जनतेपर्यंत राशन, औषधे, चाचण्या न पोहोचवता मोदी सरकारने मुख्यतं अत्यंत अनियोजित, अमानवी, आणि निरंकुषपणे लागू केलेल्या लॉकडाऊनलाच करोनाशी लढण्याचे मुख्य हत्यार मानले. अत्यंत हळू वेगाने देशभरामध्ये चाचण्या वाढवल्या गेल्या. मोफत मास्क, सॅनिटायझर वाटणे, झोपडपट्टीवासीयांना सर्वांना सुरक्षित निवारे उपलब्ध करून देणे, दारोदारी मदत पोहोचवणे, षडयंत्र सिद्धांतांविरोधात प्रचार करणे, अवैज्ञानिक धारणा मोडीत काढणे, गावाखेड्यांपर्यंत खरी माहिती पोहोचवणे झालेच माही. प्रचंड असुरक्षितता निर्माण करणाऱ्या या पावलांचा परिणाम होता दारूण परिस्थितीत कोट्यवधी कामगारांचे पायी विस्थापन, उपासमार, ज्याने हजारो बळी घेतले. या काळात जेव्हा जनतेचे अत्यंत व्यापक, शिक्षण, प्रबोधन होणे गरजेचे होते, जे झाले नाही. इतकेच नाही तर टाळ्या, थाळ्या वाजवणे, दीप लावणे अशासारख्या नाटकी उपायांवर जोर दिल्यामुळे आणि षडयंत्र सिद्धांतांना फोफावू दिल्यामुळे जनतेचे गाफील होणे वाढतच राहिले. या संपूर्ण काळामध्ये वैद्यकीय सुविधांमध्ये सुधारणांच्या नावाने मुख्यत्वे फक्त तात्पुरते कोव्हिड केअर सेंटर उभारणे आणि तात्पुरत्या स्तरावर डॉक्टर, आरोग्य कर्मचाऱ्यांची भरती करणे हेच केले गेले.

पहिली लाट जेव्हा ओसरू लागली, तेव्हापासूनच काही वैज्ञानिकांनी दुसऱ्या लाटेचे दिलेले इशारे दुर्लक्षून मोदी सरकारने नेहमीप्रमाणे प्रचंड मीडियातंत्राचा वापर करत श्रेय ओरबाडण्याचा तमाशा सुरू केला. करोनावर यश मिळवल्याबद्दल मोदींच्या अभिनंदनाचे ठराव पास झाले, आंतरराष्ट्रीय मंचांवर मोदी जगाला धडे देऊ लागले की भारताने कसा करोनावर विजय मिळवला आणि जगाने भारताकडून कसे शिकले पाहिजे. लस कंपन्यांचे दौरे करून जणू मोदी स्वत:च लस निर्माता आहे असे चित्र रंगवणे सुरू होते, पण वास्तवात लस कंपन्यांना हजारो कोटी कसे कमावता येतील याची खलबते चालत होती. देशामध्ये ऑक्सिजनचे उत्पादन वाढवणे, विविध औषधांचे उत्पादन आणि साठा वाढवणे तर दूरच आरोग्यमंत्री तर शेठ रामदेव (उर्फ ढोंगी 'बाबा' रामदेव) यांच्या 'कोरोनील' या सिद्ध न झालेल्या औषधाची जाहिरात करत होते. जगभरातील देशांनी लसींची अतिरिक्त ऑर्डर नोंदवलेली असताना भारत सरकार मात्र फक्त मूठभर लोकांच्या लसींचे नियोजन करत होते. हे कमी म्हणून की काय, दुसरी लाट सुरू झाल्याची चिन्हे दिसत असतानाही उत्तराखंडामध्ये लाखो लोकांना एकत्र बोलावून कुंभमेळ्याचे नियोजन करायचेच याकरिता भाजपने विरोध करणारा स्वत:चा मुख्यमंत्रीच बदलला आणि दुसरीकडे 'अशी गर्दी कधी पाहिलीच नाही' असे कौतुक करत मोदींनी आणि इतर सर्व भांडवली पक्षांनी बंगालमध्ये व देशभरात हजारो लोकांच्या असंख्य निवडणुक सभा घेतल्या.

पण या सगळ्या काळात सरकार 'झोपले' होते काय? अजिबात नाही. जनतेच्या गरजांकडे कानाडोळा करणारे मोदी सरकार अत्यंत कार्यक्षमतेने देशातील भांडवलदार वर्गाची सेवा करण्यात गुंतले होते. याच काळात नवीन 4 कामगार कायदे लागू करण्याचे नियोजन पूर्णत्वाकडे नेले गेले, ज्याद्वारे देशातील भांडवलदारांना कामगारांच्या श्रमशक्तीच्या लुटीची खुली परवानगी दिली गेली. देश विक्रीला काढणारे बजेट मांडून मोदी सरकारने खाजगीकरणाचा अभूतपूर्व रेटा लावत बँका, विमा क्षेत्र, सागरी वाहतूक क्षेत्र, स्टील, रस्ते, खते, वीजवहन, गॅस, इंधनतेल, रेल्वे, विमानतळ, खेळाची मैदाने असे सर्व काही भांडवलदारांच्या घशात घालण्याचे काम वेगाने पुढे नेले. हजारो कोटींची कमाई करवणाऱ्या आय.पी.एल स्पर्धा या काळातही थांबल्या नाहीत. मात्र याच काळात लोकशाही अधिकारांकरिता लढणाऱ्या कार्यकर्त्यांना खोट्या आरोपाखाली जीवाला धोका असूनही तुरुंगात सडवले गेले. धनिक शेतकरी आंदोलनाचेही लोकशाही अधिकार न मानता मोदी सरकारने दमन करवले आणि सोशल मीडीयावर निर्बंध आणण्यासाठी नवीन कायदे रेटून, फास्टॅग सारख्या योजना रेटून जनतेवर पाळत ठेवण्याचे काम मात्र वेगाने पुढे नेले. या काळात अभूतपूर्व प्रचंड बेरोजगारीने कंबर मोडलेली असतानाच, हे विसरता कामा नये की इतिहासात पहिल्यांदा पेट्रोल, डिझेलच्या दराने याच काळात 100 रुपयांचा दर गाठून जनतेवर महागाईचा प्रचंड बोजा वाढवला.

हा सगळा नंगा नाच कमी होता की काय, याच काळात दिल्लीमध्ये नवीन संसद भवन, मोदीसाठी राजमहलारूपी नवीन घर, अनेक कार्यालये असणाऱ्या सेंट्रल विस्टा प्रकल्पाला सर्व नियम धाब्यावर बसवून बनवण्याचे काम चालू केले गेले. देश जळत असताना महाल बांधण्याचे काम करणाऱ्या फॅसिस्टांची ही पापं जनता कधीच विसरणार नाही.

स्पष्ट आहे की या सगळ्या काळात जनतेकरिता आरोग्य सुविधा उभारण्याचे सोडून मोदी सरकार अत्यंत कार्यक्षमतेने आपल्या कॉर्पोरेट भांडवलदार वर्गाच्या मालकांच्या सेवत गुंतलेले होते.

## लस आणि ऑक्सिजनच्या कमतरतेचे कारण काय

लस आणि ऑक्सिजनच्या कमतरतेचे सर्वात मोठे कारण आहे बेफिकिरी आणि नियोजनाचा घोर अभाव. लसींच्या बाबतीत तर मोदी सरकारने देशातील बहुसंख्य जनतेच्या लसीकरणाचे नियोजन कधी कल्पनेतही केलेच नाही. सर्व नियोजन लसींच्या तुटवड्याद्वारे कंपन्यांना नफेखोरीची संधी उपलब्ध करून देण्याचेच केले गेले. परिणामी आज लसींकरिता उडालेली झुंबड आणि हजाराच्या वर किमतीला मिळणारी लस आपल्या समोर आहे!

ऑक्सिजनच्या कमतरतेचा अपराध तर अजून मोठ्या हलगर्जीपणाचा परिणाम आहे. स्वत:ची पाठ थोपटून घेण्यात व्यस्त असलेल्या मोदी सरकारने देशभरात ऑक्सिजन पुरवठा वाढवण्याचे, ऑक्सिजनच्या वाहतुकीच्या नियमनाचे, निर्यातीला थांबवण्याचे कोणतेही गंभीर प्रयत्न केले नाहीत. वर्षभराचा वेळ मिळूनही या अत्यंत साध्या कामालाही ते करू शकले नाहीत कारण साथरोगांचे वैज्ञानिक वास्तव न समजता, फक्त दहशतीने, सक्तीने लागू केलेल्या तीन महिन्यांच्या लॉकडाऊननंतर करोना गेला आहे याचा आनंद साजरा करण्याची त्यांना घाई झालेली होती. परिणामी देशभरातील उच्च न्यायालयांमध्ये ऑक्सिजन साठी (!) लोकांच्या याचिका दाखल झाल्या, आणि अगदी भाजपच्या आमदारांपर्यंतचे जीव ऑक्सिजनवाचून तडफडून गेले आहेत.

## कामगार कष्टकरी वर्गावर संकटांचा पहाड : एकीकडे भूक तर दुसरीकडे करोनाचा मार

अनियोजित, तडकाफडकी लागू केलेल्या आणि दडपशाहीने चालवलेल्या पहिल्या लॉकडाऊनने भूक, तहान, शेकडो किलोमीटर पायी चालण्याच्या थकव्याने हजारो कामगारांचे बळी घेतले आणि बेरोजगारी, उपासमारीने संपूर्ण कामगार वर्गावर अपार यातनांचे सुलतानी संकट लादले. अशाच अनियोजित पद्धतीने लागू केलेल्या दुसऱ्या लॉकडाऊनने अगोदरचीच खस्ता हालत असलेल्या कामगार कष्टकरी वर्गावर संकटांचा पहाड कोसळला आहे.

एकीकडे करोनावर इलाज, बेड, ऑक्सिजन, रेमडेसीवीर, व्हेंटिलेटरची परवड, लाखोंचा खर्च, दुसरीकडे घरातील अनेकांच्या एकत्र आलेल्या आजारामुळे उध्वस्त होण्याची पाळी; आणि तिसरीकडे कामधंदे बंद असल्यामुळे उत्पन्नाअभावी घरभाडे, गॅस, वीजबील, मुलांच्या शाळांच्या फी आणि सर्व नियमित खर्च चालवण्याची आबाळ अशा स्थितीत कामगार-कष्टकरी वर्ग नरकयातना भोगत आहे. एकीकडे करोनाचा मार, आणि दुसरीकडे उपासमार अशा दुहेरी कात्रीत कडकलेल्या कामगार-कष्टकरी वर्गाच्या सहनशीलतेचा अंत सरकारने पाहिला आहे. देशात सर्वांना अनेक महिने पुरेल इतका खाद्यांनाचा साठा शिल्लक असतानाही घरोघरी किमान राशन पोहोचवण्याचे कामही एकाही सरकारने केले नाही; आणि अभूतपूर्व संकट काळातही कोणत्याही प्रकारची सार्वत्रिक आर्थिक मदत न पोहोचवून हे सिद्ध केले की प्रचंड गाजावाजा करून लागू केलेल्या आधार, ऑनलाईन सुविधा, बँकखात्यांसारख्या सुविधा फक्त भांडवलदारांच्या हितासाठी आणि जनतेवर पाळत ठेवण्यासाठीच होत्या.

ठीक करोना काळात देशभरातील बँका, खाणी, रेल्वे, विमानतळ, इत्यादी अनेक गोष्टी मोठमोठ्या भांडवलदारांच्या घशात घालणारी ही सरकारं थोडी जरी 'लोकशाही' आणि 'लोकांची' असती तरी किमान उत्पन्नाची हमी देऊन, जीवनावश्यक गरजांच्या पूर्ततेची फक्त तयारीच नाही तर खात्री करवून लॉकडाऊन लागू करवला असता. दुसऱ्यांदा झालेल्या अनियोजित, किंबहुना जनतेकडे दुर्लक्ष करण्याचे नियोजन करूनच झालेला हा लॉकडाऊन पुन्हा अधोरेखित करतो की सरकारं, कायदा, व्यवस्था फक्त भांडवलदारांसाठीच आहेत!

## आता तक्रारकर्त्यांची सुद्धा दडपशाही

फॅसिस्ट राज्यसत्तेचे सर्वात बिभत्स रूप असलेल्या उत्तर प्रदेशात भाजपच्या योगी आदित्यनाथांच्या राज्यात इलाजा उपलब्धतेच्या अभावाने हजारो लोकांचे मृत्यू झालेत. अगदी भाजपचे आमदारही स्वत:करिता इलाज मिळवू शकले नाहीत. लखनौ पासून ते बनारस आणि नॉयडा पर्यंत धडाडून पेटलेल्या चितांची चित्रं देशभरात सर्वांनी पाहिलीत. यावर जेव्हा लोकांनी सोशल मीडियावर मदतीची आह्वाने टाकणे चालू केले आणि हॉस्पिटल्सनी ऑक्सिजन नसल्याचा टाहो फोडणे चालू केले, तेव्हा योगी सरकारने या सामान्य लोकांवर, हॉस्पिटल्सवर आणि बातम्या देणाऱ्या पत्रकारांवरच खटले भरणे चालू केले आहे. अगदी माजी आय.ए.एस. अधिकारीही यातून सुटले नाहीत. सत्य दडपण्यासाठी सत्तेचा वापर या थराला पोहोचलेला आहे की भाजपचेच एक आमदार राजकुमार अग्रवाल हे स्वत: आपल्या मुलाच्या मृत्यूवर व्यवस्थेच्या गैरव्यवस्थापनाची आणि निष्काळजीपणाची पोलिसात साधी तक्रार नोंदवू शकलेले नाहीत. दंडूकेशाही, पोलिसराज, दडपशाही हेच वास्तव असलेले फॅसिस्ट संघी, सामान्य जनतेच्याच काय तर 'आपल्याच' लोकांच्या जीवाचीही पर्वा करत नाहीत हे हिटलरचा इतिहाससुद्धा आपल्याला शिकवतोच. मोदी आणि योगी सरकार त्याचे बिभत्सतम रूप आपल्यासमोर प्रस्तुत करत आहेत.

## मिडीयाला हाताशी धरून प्रतिमा जपण्याचे उद्योग पुन्हा सुरू

जे एक काम फॅसिस्ट निश्चितपणे चांगले करू पाहतात आणि करतातही ते म्हणजे प्रचंड खोटा प्रचार. गेल्या 7 वर्षांमध्ये गोदी मीडियाचे वास्तव हळूहळू का होईना जनतेला समजणे चालू झाले आहे. करोनाच्या प्रचंड अपयशाला झाकण्यासाठीही मोदीच्या बोलवत्या धनी असलेल्या मालकांनी, भांडवलदारांनी, आपल्या मीडीयाच्या मार्फत सारवासारवीचे आणि मुद्दा

पान 15 वर

# धनिक शेतकरी आंदोलनाचे वर्गचारित्र्य उघड करणाऱ्या काही घटनांचे विश्लेषण

✍निमिष

कुठलेही आंदोलन हे नेमके कोणत्या वर्गासाठीचे आहे हे त्या आंदोलनाच्या मागण्यांवरून ठरते. दिल्लीच्या सीमेवर गेल्या पाच महिन्यांपासून सुरू असलेले आंदोलन हे "शेतकऱ्यांचे" नसून धनिक शेतकरी, कुलक, बड्या शेतमालकांचे आहे, कारण ह्या आंदोलनाच्या मागण्या प्रामुख्याने बड्या शेतमालकांच्या हिताच्या मागण्या आहेत. शेतमालाला हमीभाव, नफ्याची हमी हीच या आंदोलनाची प्रमुख मागणी आहे आणि ही मागणी फक्त धनिक शेतकऱ्यांच्या हिताची आहे; गरीब शेतकरी, शेतमजूर, शहरी कामगार वर्ग या सर्वांना या मागणीने नुकसानच होणार आहे हे या अगोदर कामगार बिगुल मध्ये मांडले गेले आहेच. या आंदोलनाचे धनिक शेतकरी धार्जिणे वास्तव दिवसेंदिवस अधिकाधिक स्पष्ट होत चालले आहे. तरीदेखील आजही अनेक "क्रांतिकारी" संघटना, त्यांचे कार्यकर्ते, व कामगार-कष्टकरी वर्गाची बाजू घेण्याचा दावा करणारे विचारवंत, फॅसिझम विरोधातील लढाईच्या पराजयबोधाने ग्रस्त आणि पूर्वापारपासूनच धनिक शेतकऱ्यांना नेतृत्व देत आलेले 'कम्युनिस्ट' या आंदोलनाचे शेपूट बनले आहेत, ते सर्व आजसुद्धा ह्या आंदोलनाचे समर्थन करत आहेत. या आंदोलनाचे वर्गचरित्र स्पष्ट व्हावे याकरिता गेल्या काही काळातील लाक्षणिक व व्यवच्छेदक घटना, परिघटना, व वक्तव्यांचे वर्गीय विश्लेषण ह्या लेखाद्वारे मांडत आहोत.

## हे आंदोलन धनिक शेतकरी, कुलकांचे आंदोलन का आहे?

चालू आंदोलन हे सर्वच शेतकऱ्यांचे आणि कामगार हिताचे आंदोलन आहे, केवळ धनिक शेतकरी, कुलकांचे नाही, हे सिद्ध करण्यासाठी आंदोलनाचे अनेक समर्थक सतत असा तर्क देत आलेत की ह्या आंदोलनात शेतमजूर देखील सहभागी आहेत; नव्हे, केवळ सहभागीच नव्हे, तर मोठ्या संख्येने सहभागी आहेत. ह्या तर्काने तर 1990-92 चे राम मंदिर आंदोलन हे कामगार-कष्टकऱ्यांचे आंदोलन होते, असेच म्हणावे लागेल, किंवा मोदींच्या सभांना कामगार मोठ्या संख्येने येतात म्हणून मोदी हे कामगारांचे नेते आहेत इतके हास्यास्पद निष्कर्ष ह्या तर्काने निघतात. कोणत्याही आंदोलनाचे वर्ग चारित्र्य हे त्या आंदोलनातील सहभागी आंदोलकांच्या आर्थिक वर्ग चारित्र्यावरून ठरत नसते, तर त्या आंदोलनाच्या मागण्या ह्या कोणत्या वर्गाच्या हिताच्या मागण्या आहेत याच्या विश्लेषणावरूनच ठरू शकते.

मोदी सरकारने पारित केलेल्या तीन शेती सुधारणा कायद्यांपैकी पहिले दोन कायदे - शेतमालाच्या व्यापारासंबंधी व हमीभावासंबंधी सुधारणा ह्या मोठमोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांना शेतमालामध्ये हमीभावाशिवाय व्यापाराची, कंत्राटी शेतीची खुली सुट देतात, हमीभाव देणाऱ्या कृषी उत्पन्न बाजार समित्या उध्वस्त करण्याकडे नेतात आणि त्यातून कॉर्पोरेट कंपन्या विरुद्ध धनिक शेतकरी, कुलक हा वर्ग संघर्ष उभा राहतो; साहजिकच हे दोन्ही कायदे आडत्यांना व धनिक शेतकरी, कुलकांना थेट नुकसानकारक आहेत. तिसरा कायदा जो आवश्यक वस्तू कायद्यांमधील दुरुस्ती आहे, तो मोठमोठ्या कंपन्यांना जमाखोरी-काळाबाजारीची सूट देतो, महागाईला प्रोत्साहन देतो आणि म्हणूनच तो व्यापक कष्टकरी जनतेकरिता नुकसानकारक आहे.

या पार्श्वभूमीवर सदर आंदोलनाची प्रमुख, आणि सर्वात प्रमुख मागणी नेहमीच हमीभावाची राहिली आहे. म्हणायला मोदी सरकारने पारित केलेल्या तिनही कायद्यांविरोधात हे आंदोलन आहे, परंतु आंदोलन सुरू झाल्यापासून या आंदोलनाच्या नेत्यांनी हमीभावाच्या मागणीचाच खऱ्या अर्थाने पुरस्कार केला आहे. हमीभावामुळे बाजारभाव वाढतात आणि महागाई वाढते हा समजायला अत्यंत सोपा तर्क आहे. हमीभावामुळे तर मजुरी वाढणार नाही, त्यामुळे फक्त मजुरीवर जगणाऱ्या शेतमजूर किंवा शहरी कामगार यांच्या हिताची ही मागणी होऊच शकत नाही. शेतमालाला हमीभाव मिळाल्यामुळे गरिब शेतकऱ्यांना कोणताही फायदा होत नाही, कारण गरीब शेतकरी हा बाजारात जेवढे विकतो, त्यापेक्षा त्याच्या गरजांकरिता त्याला बाजारातून जास्त खरेदी करावे लागते. हमीभावामुळे फक्त त्या शेतकऱ्याच्या नाही तर सर्वच शेतमालाचे भाव वाढतात. त्यामुळे गरीब शेतकऱ्यांनी इतर मजुरीच्या मार्गाने केलेली कमाई गरजांवर जास्तच खर्च करावी लागते. तेव्हा हमीभावामुळे गरीब शेतकऱ्यांनाही नुकसानच सहन करावे लागते. तेव्हा हमीभावाची मागणी फक्त धनिक शेतकऱ्यांचे हित साधते.

## प्रस्तुत आंदोलनाच्या वर्ग चरित्राचे ठळक होत जाणे

सध्या चालू असलेल्या आंदोलनामध्ये आपल्या धोकेबाज नेतृत्वाचे चरित्र समजू न शकल्यामुळे गरीब शेतकरी आणि शेतमजूर सामील दिसतात, परंतु त्यामुळे मालक-कामगार शोषणाच्या नात्यावर काही फरक पडलेला नाही. ह्या "शेतकरी आंदोलना"चे नेतृत्व करणाऱ्या संयुक्त किसान मोर्चात शेतमजुरांचे, कामगारांचे प्रतिनिधित्व करणारी एकही संघटना नाही. तिसरी सुधारणा, जी कामगार-कष्टकऱ्यांना व व्यापक जनतेला नुकसानकारक असणारी मागणी ही आंदोलनाच्या नेत्यांसाठी तितकीशी महत्त्वाची नाही. खरेतर भूतकाळात आवश्यक वस्तूंच्या साठेबाजीचा कायदा रद्द व्हावा अशा मागण्या धनिक शेतकरी वर्गाकडून आलेल्या आहेत आणि मनरेगा योजना रद्द करण्याच्या मागण्याही यांनी केल्या होत्या. तेव्हा शेतमजूरांबद्दल उतू चाललेले यांचे प्रेम हे पुतना मावशीचे प्रेम आहे. शेतमजूर व कामगार-कष्टकऱ्यांच्या मागण्यांवरसुद्धा (उदा शेतमजुरांसाठी किमान वेतन, किंवा चार लेबर कोड रद्द करण्याची मागणी) हे 'किसान-मज़दूर एकते'चा नारा देणाऱ्या आंदोलनाची अळी-मिळी-गुपचिळी आहे. अनेक ठिकाणी शेतमजुरांना, दलित भुमिहीनांना आंदोलनात सहभागी होण्याची सक्ती केली जात आहे. याची उदाहरणे दिसून येत आहेत.

चालू शेतकरी आंदोलनातील शेतमजुरांच्या सहभागाचे वास्तव उघड करण्यासाठी दोन प्रातिनिधिक घटनांवर नजर टाकूयात.

जानेवारी मध्ये पंजाबच्या अनेक ग्राम पंचायतींनी गावातील प्रत्येक कुटुंबाला आंदोलनाकरिता किमान एक व्यक्ती पाठवण्याची सक्ती करणारे ठराव केले आहेत. तसे न केल्यास 2100 रुपये दंड देखील लावलेला आहे. ह्या निर्णयाचा सर्वात मोठा फ़टका गावातील श्रमिकांनाच बसणार आहे. हातावर पोट असणाऱ्या बहुसंख्य ग्रामीण श्रमिकांनी दिवसभर राबल्यावरच रात्री त्यांच्या घरची चूल पेटते. अशा परिस्थितीत पोटापाण्याचे काम सोडून ह्या श्रमिकांनी आंदोलनाला यावे व घरातील लेकराबाळांना उपाशी ठेवावे अशी ह्यांची अपेक्षा आहे काय? बहुसंख्येने दलित असणाऱ्या, 2100 काय 21 रुपये देखील दंडाचे भरायचे ज्यांची परिस्थिती नाही अशा शेतमजुरांवर, ग्रामीण श्रमिकांवर ह्या सवर्ण जमीनमालकांच्या पंचायती केवळ आंदोलनाची लोकसंख्या फुगवण्यासाठी जुलुम करत आहेत.

मागील वर्षी कोरोनाच्या पहिल्या लाटेनंतर लॉकडाऊन लागू झाल्यावर जूनमध्ये ह्याच पंजाबच्या पंचायतींनी गावातील शेतमजुरांच्या मजुरीची कमाल मर्यादा 2,500 रुपये प्रति एकर ठरवून टाकली होती. हया दराच्या वर मजुरी मागणाऱ्या मजुरांचा सामाजिक बहिष्कार करण्याचा निर्णय सुद्धा घेण्यात आला, एवढेच काय गावातील शेतमजुरांना गाव सोडून जाण्यास देखील मनाई करण्यात आली होती. ह्या ग्राम पंचायती ह्या वास्तवात धनिक शेतकऱ्यांच्याच हितांचे रक्षण करतात. म्हणूनच जेव्हा कमी किमतीत शेतमजुरांनी ह्या बड्या शेतमालकांच्या शेतावर राबण्याची गरज ह्या धनदांडग्यांना होती तेव्हा ह्या पंचायतींनी शेतमजुरांना गाव सोडण्यास मनाई केली होती, आणि आता आंदोलन फ़ुगवण्याची गरज आहे तेव्हा ह्याच गावातील श्रमिकांना आंदोलनाला उपस्थित राहण्याची सक्ती केली जात आहे.

'कॅरावान' पत्रिकेला दिलेल्या मुलाखतीत पंजाबमधील शेतमजुरांची संघटना 'पंजाब खेत मजदूर युनियन' व पंजाबमधील दलित भुमीहीन शेतकऱ्यांची संघटना 'ज़मीन प्राप्ती संघर्ष कमिटी' ह्या संघटनांनी कॅरावान पत्रिकेशी बोलताना सांगितले कि शेतमजुरांकडे आंदोलनस्थळी येण्या-जाण्यासाठी पैसे वा साधने नसतात. शिवाय बहुतांश शेतमजुरांचे हातावर पोट असल्याने मजुरी बुडवून आंदोलनाला येणे शक्य होत नाही. हरयाणामध्ये देखील वस्तूस्थिती ह्यापेक्षा वेगळी नाही. हरयाणामध्ये पंजाबसारख्या युनियन नाहीत. तिथे ह्या आंदोलनाचे तृणमूल व्यवस्थापन त्यांच्या प्रतिगामितेसाठी प्रसिद्ध असलेल्या खाप पंचायती करतात. ह्या खाप पंचायती मुख्यतः जाट जमीनमालकांच्या हितांसाठी काम करतात. अनेक पंचायतींनी इतर जातीतील, व विशेषत: दलित ग्रामीण मजूर कुटुंबांना आंदोलनामध्ये सहभागी होण्याची सक्ती केलेली आहे. हे झाले शेतकरी आंदोलनातील शेतमजुरांच्या सहभागाबद्दल.

## खऱ्या मागण्यांचे आणि आंदोलनाचे उघड होत चाललेले वास्तव

शेतकरी आंदोलनाने जरी सुरूवातीलाच तीनही कायद्यांना एकत्र विरोधाची भुमिका घेतलेली असली, तरी गरीब शेतकरी आणि शेतमजुरांच्या मोठ्या लोकसंख्येचे समर्थन प्राप्त करून घेण्यासाठी आणि शोषक धनिक शेतकरी, कुलक आधारित वर्ग चरित्र लपवण्यासाठी तिनही कायद्यांना विरोध करणे त्यांना राजकीयदृष्ट्या भागच होते. अर्थातच अशा "तडजोडी" मूळातच असलेल्या वर्गीय हितसंबंधांना किती काळ झाकणार? काही काळ लोटल्यावर आता सत्य पुढे येणे सुरू झाले आहे.

ह्या आंदोलनामध्ये सामिल संघटनांपैकी भारत किसान युनियन (एकता - उग्राहा) ह्या मोठ्या संघटनेचे नेते, व संयुक्त किसान मोर्चामधील एक महत्त्वाचे नेते जोगिंदर सिंह उग्राहा ह्यांनी मार्चमध्ये 'न्यूजक्लिक' वेबसाईटला दिलेल्या मुलाखतीत म्हटले आहे की तीनपैकी दोन सुधारणा रद्द केल्या व तिसरी सुधारणा स्थगित जरी केली तरीही शेतकरी आंदोलन मागे घेता येईल. तिन्हीपैकी कुठली सुधारणा सर्वप्रथम रद्द केली जावी असे विचारल्यावर त्यांनी शेतमाल व्यापारासंबंधीची सुधारणा सर्वप्रथम मागे घेतली जावी असे म्हटले आहे! म्हणजेच ह्या युनियनची, संयुक्त किसान मोर्चाची व ह्या आंदोलनाची प्राथमिकता काय आहे हे ह्यातून स्पष्ट आहे.

'द हिंदू' ह्या वृत्तपत्राला मार्चमध्ये दिलेल्या मुलाखतीत क्रांतिकारी किसान युनियनचे अध्यक्ष व संयुक्त किसान मोर्चाचे नेते दर्शन पाल ह्यांनी म्हटले आहे की आंदोलनाच्या सर्वच मागण्यांबद्दल आंदोलनाने टोकाची भुमिका घेण्याची गरज नाही. हमीभावाच्या मागणीबद्दल तपशीलवार चर्चा होणे गरजेचे आहे, परंतु इतर मागण्यांवर तडजोड करावी लागल्यास हरकत नसावी. म्हणजेच ह्या 'क्रांतिकारी' युनियनला महागाई वाढवणाऱ्या, कामगार-कष्टकऱ्यांच्या थाळीतला घास काढून घेणाऱ्या तिसऱ्या सुधारणेपेक्षाही बड्या शेतमालकांना आणखी गबर बनवणाऱ्या हमीभावाची जास्त काळजी आहे !

या दोन्ही वक्तव्यांमधून हे सुद्धा स्पष्ट आहे की हे कोणत्याही प्रकारचे 'क्रांतिकारक' आंदोलन तर नाहीच, उलट सत्ताधारी वर्गाचाच एक कनिष्ठ हिस्सा असलेल्या धनिक शेतमालक वर्गाचे आंदोलन आहे.

आणखी काही राजकीय घटनांवर नजर टाकल्यानंतरही "शेतकरी आंदोलना"चे चरित्र स्पष्ट होते. लोकशाही नागरी अधिकार, कामगार वर्गीय संस्कृती, स्त्री-पुरूष समानतेची मूल्ये कामगार वर्गीय चळवळीसाठी नेहमीच मूलभूत मुद्दे राहिले आहेत, ज्यांवर तडजोड शक्य नाही. सदर आंदोलनामध्ये 'क्रांतिकारी 'शक्यता तपासणाऱ्यांनी काही घटनांना जरा उघड्या डोळ्याने जरी पाहिले असते तरी डोक्यात प्रकाश पडला असता.

मोदी सरकारने दुसऱ्या कार्यकाळाच्या सुरुवातीपासूनच कामगारांसाठी, आदिवाश्यांसाठी, स्त्री प्रश्नांवर काम करणाऱ्या अनेक सामाजिक - राजकीय कार्यकर्त्यांची धरपकड केलेली आहे. ह्या सर्व कार्यकर्त्यांच्या लोकशाही अधिकारांवर जी दडपशाही मोदी सरकारने चालवली आहे, त्याविरोधात एकता-उग्राहा संघटनेच्या कार्यकर्त्यांनी सर्व राजकीय कैद्यांच्या मुक्ततेच्या मागणीवर मागील 10 डिसेंबर रोजी निदर्शने केली. ह्या निदर्शनांनंतर, संयुक्त किसान मोर्चामधील

पान 14 वर

# पाच राज्यांमध्ये झालेल्या निवडणुकांचा निकाल आणि कामगार वर्गाचा दृष्टिकोण

पान 3 वरून

फॅसिझमचा पराभव म्हणून संबोधत आहेत. ममता बॅनर्जी यांच्या नावाचे पोवाडे गायले जात आहेत. असे **अति-आशावादी विश्लेषण अजून काही नाही तर उदारवादी (लिबरल) विषाणूमुळे ग्रस्त आणि वर्गदृष्टीने रिक्त डोक्यांचे उत्पादन मात्र आहे. पहिली गोष्ट म्हणजे निवडणुकांमधील निव्वळ पराभवामुळे हिंदुत्ववादी फॅसिझमच्या जीवघेणा धोका टळल्याचा निष्कर्ष काढला जाऊ शकत नाही** आणि पूर्वीही असे काही घडलेले नाही. भाजपने निवडणूक जरी हरली असली तरी **आर.एस.एस. आणि संघ परिवाराच्या वैचारिक-संघटनात्मक संरचनेची उपस्थिती नेहमीच खाली देत राहील की हिंदुत्ववादी फॅसिझम करिता समाजात सुपिक जमीन नेहमी तयार होत राहील.** याखेरीज भांडवलशाहीची आर्थिक संकटे देखील वस्तुनिष्ठपणे फॅसिझमसारख्या कट्टर-उजव्या विचारसरणीच्या प्रतिक्रियावादी सामाजिक आंदोलनाच्या विकासासाठी जमीन तयार करतातच. म्हणूनच, निवडणुकीच्या निकालामुळे इतके आशावादी होणे वास्तवात भांडवली उदारवादाचेच प्रतिबिंब आहे. दुसरे म्हणजे, पश्चिम बंगालमध्ये भाजपचा पराभव झाला असला, तरी तो रिकाम्या हाताने परतलेला नाही. 'दीदी' ने भाजपच्या फॅसिस्ट राजकारणाला धूळ चारल्यासारख्या बऱ्याच गोष्टी बोलल्या जात आहेत, परंतु खूप कमी लोक या गोष्टीकडे लक्ष देत आहेत की बंगालमधील सत्ता जरी पुन्हा तृणमूल काँग्रेसकडे आली असेल, पण इथे भाजप दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष म्हणून पुढे आला आहे . 2016 च्या विधानसभा निवडणुकीत भाजपला 10.16 टक्के मतांसहित केवळ 3जागा मिळाल्या होत्या पण 2021 मध्ये त्यांच्या जागा 77 वर पोहचल्या आहेत आणि मतांची टक्केवारी 38 टक्के झाली आहे! भाजपला कदाचित सरकार स्थापन करता आले नसेल पण यावेळी विधानसभेतील एकमेव विरोधी पक्ष म्हणून तो उदयास आला आहे आणि काँग्रेस आणि संसदीय डाव्या पक्षांना या भूमिकेतून रद्दबातल केले गेले आहे. ममता बॅनर्जी यांच्या विजयाने बंगालमधील कष्टकरी जनतेला काय मिळेल हे आधीपासूनच स्पष्ट आहे. बंगालमधील लोक गरिबी, बेरोजगारी आणि उपासमारीच्या ज्या पातळीवर आहेत, त्यात कोणत्याही बदलाची शक्यता दिसत नाही.

शिवाय, ममता बॅनर्जी आणि **तृणमूल काँग्रेसचा विजय धर्मवादी हिंदुत्वाच्या फॅसिस्ट राजकारणावर धर्मनिरपेक्षतेचा विजय नाही, जसा काही जण दावा करत आहेत; उलट हा ध्रुवीकरणाच्या राजकारणाचा विजय आहे.** जोवर हिंदू धार्मिक चिन्हांचा प्रश्न आहे, तर ममता बॅनर्जी यांनीही निवडणूक प्रचारामध्ये या प्रतीकवादाचा जोरदार उपयोग केला आहे. याशिवाय तृणमूल काँग्रेसने बांगला अस्मितावादाचे कार्डही जोरदार चालवले, ज्यामध्ये मुख्यत्वे 'बांग्ला' विरुद्ध 'बाहेरील' चे राजकारण केले गेले. त्याचबरोबर टी.एम.सी.ने देखील राजकीय फायद्यासाठी भाजपने निर्माण केलेल्या धार्मिक ध्रुवीकरणाचा उघडपणे वापर केला. मुस्लिम लोकसंख्येने तृणमूल काँग्रेसला एकगठ्ठा मतदान केले कारण तृणमूलने तळागाळात अशी भीती पसरविली जात होती की, जर त्यांना मत दिले नाही तर भाजप जिंकेल आणि फक्त तृणमूल काँग्रेसच भाजपला रोखू शकते. 2020 च्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत अरविंद केजरीवालच्या आम आदमी पक्षाने हेच केले होते. या तथाकथित धर्मनिरपेक्ष पक्षांना फॅसिस्टांनी केलेल्या धार्मिक ध्रुवीकरणाचा नेहमीच निवडणुकांमध्ये फायदा झाला आहे आणि म्हणूनच त्यांचा त्याला कडक विरोध नाही व असणारही नाही. हेच कारण आहे की मालदा आणि मुर्शिदाबादसारख्या मुस्लिमबहुल भागात तृणमूलचे 80 टक्क्यांहून जास्त उमेदवार विजयी झाले आहेत कारण असुरक्षितता आणि भीतीमुळे एकत्रित मुस्लिम लोकांनी तृणमूल काँग्रेसला एकगठ्ठा मतदान केले आहे.

**बंगालमधील** काँग्रेस आणि संसदीय डाव्यांचा सुपडा साफ होण्याचे एक कारण हे धृवीकरणही होते. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच असे झाले आहे की पश्चिम बंगाल विधानसभेमध्ये काँग्रेस व संसदीय डाव्या पक्षांचा एकाही आमदार निवडून आला नाही. 2016 मध्ये काँग्रेस-डाव्या आघाडीला एकूण 77 जागा मिळाल्या होत्या, ठीक तेवढ्याच जेवढ्या यावेळी भाजपला मिळाल्या आहेत. दुसरीकडे, 2014 ते 2019 या काळात हिंदू लोकसंख्येवरील पकड आणखी मजबूत करण्याच्या उद्देशाने, भाजप बंगालमधील मुख्यत: दलित, आदिवासी आणि इतर मागासवर्गीय (ओबीसी) घटकांमधील आपला पाया दुप्पट करण्यात यशस्वी झाला आहे, हे तेच समाजघटक आहेत, ज्यापैकी बहुतांश गरीब आहेत आणि पारंपारिकपणे ते डाव्या पक्षांचा आधार असायचे. अलीकडील निवडणुकांनंतर झालेल्या अनेक सर्वेक्षणांतून असेही दिसून आले आहे की बंगालमधील "सवर्ण" आणि "उच्च" जातींच्या तुलनेत भाजपला इतर कोणत्याही पक्षापेक्षा दलित आणि इतर मागासवर्गीय जाती तसेच आदिवासींकडून जास्त पाठिंबा मिळाला आहे. तथाकथित कम्युनिस्ट पक्षांचा पाया येथूनही कमी होत असल्याचे आणि भाजप आपले पाय पसरवत असल्याचे यातून दिसून येते. येथे उल्लेख करणे महत्त्वाचे आहे की यावेळी पश्चिम बंगालच्या माटिगारा-नक्षलबारी विधानसभा मतदारसंघातून भाजपने राखीव जागा जिंकली आहे. नक्षलबारीला ऐतिहासिक महत्त्व आहे आणि म्हणूनच ही वस्तुस्थिती स्वतःहून बरेच काही प्रकट करते. या भागात 30 टक्के दलित लोकसंख्या आहे आणि त्यांच्या पाठिंब्याशिवाय भाजपला जिंकणे अशक्य होते. **तृणमूल काँग्रेसच्या विजयाबद्दल टाळ्या वाजविणाऱ्या कम्युनिस्टांनी उत्सवाच्या नशेत इतके धूंद होऊ नये की वर्ग अंतदृष्टी आणि वर्गीय राजकारणाची साथच सुटेल.**

पश्चिम बंगाल निवडणुकीत ज्या गोष्टीची फारशी चर्चा होतच नाहीये, ती म्हणजे काँग्रेस तसेच संसदीय डाव्या पक्षांचे राजकीय पटलावरून साफ होणे. कामगार वर्गाच्या राजकारणावर दावा करणाऱ्या पण वास्तवात त्यांच्या हितसंबंधांचा सौदा करणाऱ्या म्हणजेच सामाजिक लोकशाही वाद्यांचे आणि दुरूस्तीवाद्यांचे संसदीय निवडणुकीच्या रिंगणातून गायब होण्यासाठी सुद्धा ही निवडणूक लक्षात ठेवली जाईल! बंगालवर तीन दशके राज्य करणाऱ्या दुरूस्तीवाद्यांना या विधानसभा निवडणुकीत एकही जागा मिळाली नाही. ज्योती बसू आणि बुद्धदेव भट्टाचार्य यांच्या कुप्रसिद्ध काळात त्यांनी ज्या प्रकारे कामगार वर्गाच्या राजकारणाला अर्थवाद आणि संसदवादाच्या गर्तेत ढकलले त्याच्या परिणामी हे होणारच होते. बेगडी-पर्याय हा नवीन पर्याय तयार करण्याच्या मार्गात अडथळाच ठरतो. निश्चितपणे, पश्चिम बंगालमधील कष्टकरी जनतेसाठी आपली एकता स्थापित करणे आणि योग्य राजकीय पर्यायाच्या भोवती स्वतःला एकत्र करणे हे एक मोठे आव्हान आहे.

**आसाममध्ये** भाजप युतीचे सरकार पुन्हा सत्तेत आले आहे. येथे 2016 मध्ये भाजपने पहिल्यांदा सत्ता जिंकली होती. ईशान्येकडील एखाद्या इतक्या मोठ्या राज्यात भाजपने आपल्या फॅसिस्ट राजकारणाच्या आधारे बहुमताच्या जवळ जाऊन स्वबळावरच सरकार स्थापन करणे हे पहिल्यांदाच झाले होते. यावेळी एकूण 126 जागांपैकी 75 जागा भाजप युतीने जिंकल्या आहेत. आसाममध्ये सलग दोनदा गैर-काँग्रेसी सरकार निवडून येण्याची ही पहिलीच वेळ आहे. भाजपने या वेळी 93 जागांवर उमेदवार उभे केले होते, ज्यापैकी 93 जागा जिंकल्या आहेत. हा आकडा गेल्या वेळेप्रमाणेच आहे. यासोबतच भाजपचे राजकीय सहयोगी असलेल्या आसाम गणपरिषद (ए.जी.पी.) आणि युनायटेड पीपल्स पार्टी लिबरल्स (यू.पी.पी.एल.) यांना 9 आणि 6 जागा मिळाल्या आहेत. काँग्रेसच्या नेतृत्वाखालील 10 पक्षांच्या "महाजोत" या युतीला 51 जागा मिळाल्या आहेत. काँग्रेसला 29 जागा मिळाल्या आहेत. युतीतील इतर घटक, जसे की बद्रुद्दीन अजमल यांची ऑल इंडिया युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंट (ए.आय.यू.डी.एफ.) ला 16 जागा आणि बोडोलँड पीपल्स फ्रंटला बोडोलँड प्रादेशिक क्षेत्रात (बी.टी.आर.) एकूण 4 जागा मिळाल्या आहेत.

बी.पी.एफ. ला 2016 च्या विधानसभा निवडणुकीत 12 जागा मिळाल्या होत्या, आणि त्यावेळी तो भाजपचा मित्रपक्ष होता. भाजपला एकूण मतदानाच्या 33.2 टक्के मते मिळाली आहेत, तर काँग्रेसला 29.6 टक्के मते मिळाली आहेत.

सी.ए.ए.-एन.आर.सी. प्रकरणावर आसाममध्ये भाजपला तीव्र विरोध झाला होता. सी.ए.ए.च्या विरोधात उभ्या झालेल्या चळवळीतील दोन नवीन पक्षांनीही यावेळी निवडणुकीत भाग घेतला. यामध्ये प्रमुख होता अखिल गोगोई यांनी स्थापन केलेला रायजोर पक्ष, ज्याच्या वतीने अखिल गोगोईंनी स्वत:च शिबसागर मतदारसंघातून निवडणूक लढविली आणि भाजपच्या उमेदवाराचा पराभव केला. अखिल गोगोई यांनी बद्रुद्दीन अजमलचा कट्टरपंथी जातीय पक्ष ए.आय.यू.डी.एफ.शी हातामिळवणी करण्याच्या काँग्रेस आणि डाव्या पक्षांच्या निर्णयाचा निषेधही नोंदविला होता आणि कोणत्याही धर्मनिरपेक्ष आघाडीत अशा पक्षाच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते.

भाजपने या वेळी विधानसभा निवडणुकीत सी.ए.ए.-एन.आर.सी.च्या मुद्यावर निर्लज्ज मौन बाळगले होते. भाजपने आपल्या जाहीरनाम्यातही सी.ए.ए.-एन.आर.सी.चा उल्लेख केला नव्हता. अर्थात, तरीही आसाममध्ये धार्मिक आधारार ध्रुवीकरण करण्यात भाजपला मोठ्या प्रमाणात यश मिळाले आहे. "बांग्लादेशी मुस्लिम घुसखोर" विरुद्ध "हिंदू शरणार्थी" अशी छबी स्थापित करण्यासाठी सुद्धा विशेष प्रयत्न केले गेले आहेत. याशिवाय भाजपच्या विजयामागील एक कारण आहे, चहामळ्यांतील कामगारांमध्ये त्यांचा मजबूत आधार आहे; यामुळेच 2016 मध्ये भाजपला सत्ता मिळविण्यात यश मिळाले होते. यामुळेच जेव्हा काँग्रेसने आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात चहा बाग कामगारांचे किमान वेतन प्रतिदिन 351रुपये करण्याचे आश्वासन दिले, तेव्हा लागलीच मुख्यमंत्री सोनोवाल यांनी निवडणूक प्रचार सुरू होण्यापूर्वीच सध्याच्या 167 रुपये मजुरीमागे 50 रुपये वाढ जाहीर केली होती. यासह आसामच्या तीन डोंगराळ जिल्ह्यांमध्ये सुद्धा भाजपची पकड आणखी मजबूत झाली आहे आणि येथील पाचही जागा भाजपने जिंकल्या आहेत. बंगाली बहुल प्रदेश असलेल्या बराक खोऱ्यात सुद्धा भाजपला 6 जागा मिळाल्या आहेत. संपूर्ण निवडणूक प्रचारादरम्यान भाजपने काँग्रेस-ए.आय.डी.यू.एफ. आघाडीला "आसामी" अस्मितेसाठी धोकादायक म्हटले; निवडणुकीला "दोन सभ्यतांचा संघर्ष" म्हटले, आणि स्वत:ला "आसामी संस्कृती व सभ्यते"चे संरक्षक म्हटले. हेच कारण आहे की नागरिकत्व दुरुस्ती कायद्यासंदर्भात निवडणूक प्रचारामध्ये भाजप काहीच बोलला नाही आणि संपूर्ण मोहीम यावर केंद्रीत केली की काँगेस-प्रणीत युती जिंकणे म्हणजे "बांग्लादेशी घुसखोरांकडे" सत्ता सोपविणे होईल. भाजपला सी.ए.ए.वर बोलण्याची गरज यासाठीही पडली नाही कारण “आसामी” राष्ट्रीय अस्मितेभोवती प्रतिक्रियावादी जमवाजमव करण्यात या पक्षाला एका मर्यादेपर्यंत यश मिळाले आहे आणि त्यामुळेच निवडणुकीत गैर-मुस्लिमांना नागरिकत्व देण्याच्या वादग्रस्त मुद्यावर तो यामुळेच बोलू इच्छित नव्हता. दुसरीकडे, **बद्रुद्दीन अजमल यांचा पक्षही भाजप-संघ परिवाराने उभारलेल्या धार्मिक ध्रुवीकरणाच्या आगीत तेल टाकण्याचेच काम करत होता. एक प्रकारचा कट्टरतावाद दुसऱ्या प्रकारच्या कट्टरतावादाला खतपाणी घालण्याचेच काम करतो, हे आसाम निवडणुकीतही दिसून आले.** काळाबरोबर स्पष्ट होत असलेली आणखी एक गोष्ट म्हणजे आसम गण परिषदेसारख्या मुख्य प्रवाहातील आसामी राष्ट्रवादी पक्षांची होत चाललेली कालबाह्यता. पूर्वी, ए.जी.पी.ने दोनदा आसाममध्ये सरकार स्थापन केले होते, परंतु यावेळी तो पक्ष 9 जागांपुरता उरला आहे, जे 2016 च्या तुलनेत 5 जागा कमी आहे. याशिवाय आसू (ऑल आसाम स्टुडंट्स युनियन) आणि आसाम जातीयतावादी युवा विद्यार्थी परिषद यांनी स्थापन केलेला आणखी एक आसामी राष्ट्रवादी पक्ष, ए.जे.पी., एकही जागा जिंकू शकला नाही.

आसाममधील मजूर-गरीब लोक जीवनातील मूलभूत गोष्टींनाही वंचित आहेत. असे असूनही, कोणताही योग्य राजकीय पर्याय नसल्यामुळे भाजप युतीने निवडणूक जिंकली. आसामच्या सर्व आदिवासी भागांमध्ये संघ परिवाराने बस्तान बांधले आहे. त्यांच्या धर्मवादी फॅसिस्ट विखारी राजकारणामुळे येथे धार्मिक ध्रुवीकरण तीव्र झाले आहे आणि त्याचा थेट फायदा भाजपला होत आहे, जे निवडणूक निकालातून दिसून येत आहे.

**तामिळनाडूमध्ये** यावेळी द्रमुकच्या नेतृत्वात धर्मनिरपेक्ष पुरोगामी आघाडी (एस.पी.ए.)चे सरकार आले आहे. गेल्या दहा वर्षांपासून सत्ताधारी असलेल्या अण्णाद्रमुक आघाडीला हरवून द्रमुक आघाडीने निवडणूक जिंकली आहे. या महायुतीत डी.एम.के. व्यतिरिक्त काँग्रेस, एम.डी.एम.के., संसदीय डावेपंथी, थोल तिरुवामलनची व्ही.सी.के. आणि इतर अनेक लहान पक्षांचा समावेश आहे. दुसरीकडे अण्णाद्रमुकने भाजप, पी.एम.के आणि काही अन्य छोट्या पक्षांसोबत मिळून निवडणूक लढवली. द्रमुकच्या नेतृत्वातील युतीने 234 जागांपैकी 159 जागा जिंकल्या, ज्यापैकी द्रमुकने एकूण 133 जागा जिंकल्या, जे स्पष्ट बहुमत आहे. अण्णाद्रमुक आघाडीने 75 जागा जिंकल्या, ज्यापैकी भाजपने 4 जागा जिंकल्या. भाजपने 20 जागा लढवल्या होत्या. 2001 नंतर तामिळनाडू विधानसभेत भाजपचे प्रतिनिधीत्व असण्याची ही पहिलीच वेळ आहे. उत्तर तामिळनाडूच्या वणियार जातीमध्ये आधार असलेल्या पी.एम.के.ने वणियार समाजासाठी मुख्यमंत्री पलानीस्वामी यांच्या अण्णाद्रमुक सरकारकडून निवडणुकीपूर्वी शिक्षण आणि सरकारी नोकरीतील मागासवर्गीयांच्या कोट्यातून 10.5 टक्के आरक्षण लागू करवले होते. तथापि, या राजकीय उलथापालथीनंतरही पी.एम.के.ला 23 पैकी केवळ 5 जागा जिंकता आल्या. त्यामागील एक कारण म्हणजे गैर-वणियार मागासवर्गीय आणि दलित जातींचे द्रमुकच्या मागे जाणे होते.

परंतु, हे देखील खरे आहे की गेल्या दोन

पान 7 वर

# पाच राज्यांमध्ये झालेल्या निवडणुकांचा निकाल आणि कामगार वर्गाचा दृष्टिकोण

पान 6 वरून

दशकांपासून तामिळनाडूमध्ये विविध जातीय पक्ष राजकीय पटलावर अवतरले आहेत. द्रमुक आणि अण्णाद्रमुकसारख्या द्रविड अस्मिता आधारित पक्षांच्या मागास जातींच्या पारंपारिक मतपेढ्यांना हे सर्व पक्ष कोरत आहेत. **त्याशिवाय या दोन्ही प्रमुख द्रविड पक्षांची लोकप्रियताही कमी झाली आहे** आणि नुकत्याच झालेल्या निवडणुकांमधून स्पष्ट झाले आहे की, द्रमुक आणि अण्णाद्रमुक यांना राज्याचे सरकार स्थापन करण्यासाठी युतीचा मार्ग पत्करावा लागला आहे. परंतु, तेथे **द्रविडच्या अस्मितेचा प्रश्न आजही भांडवली राजकारणाच्या क्षेत्रात तितकाच महत्त्वाचा आहे जितका सात-आठ दशकांपूर्वी द्रविडी चळवळ सुरू झाली तेव्हा होता.** हेच कारण आहे की द्रविड अस्मितेचे आणि प्रतीकात्मकतेचे राजकारणच संसदीय राजकारणात प्रभावी रहाते. 1967 पासूनच द्रमुक आणि अण्णाद्रमुक एकामागून एक तामिळनाडूमध्ये सत्ता उपभोगत आले आहेत. यावेळी, अण्णाद्रमुक सरकारविरोधातील सत्ताविरोधी भावना देखील द्रमुक आघाडीच्या विजयाच्या मागे महत्वाचे कारण आहे; त्याच वेळी, जरी त्यांच्या पक्षाने 66 जागा जिंकल्या आणि 33.29 टक्के मते मिळविली असली, तरी जयललिता यांच्या निधनानंतर अण्णाद्रमुक मध्ये मोठ्या राजकीय भूमिकेच्या नेत्याची अनुपस्थितीदेखील एक कारण आहे. द्रमुकने 133 जागा जिंकून 37.7 टक्के मते मिळविली. अण्णाद्रमुकपासून 2018 मध्ये विभक्त झालेला ए.एम.एम.के. काही खास प्रभाव पाडू शकला नाही. द्रमुक आघाडीत सामील असलेल्या थोल तिरुमावलनच्या व्ही.सी.के.ने 6 पैकी 4 जागा जिंकल्या. एकूणच आपण असे म्हणू शकतो की या दक्षिणेकडील राज्यातही पाय रोवण्याचा भाजप प्रयत्न करीत आहे. आणि **अगोदरच्या अनुभवाप्रमाणे, ज्या सर्व राज्यांमध्ये भाजपची पारंपारिक संघटनात्मक रचना किंवा आधार नाही, अशा सर्व राज्यांत, प्रादेशिक पक्षांशी युतीच्या कुबड्यांच्या आधारे भाजप आपला आधार विकसित करतो आणि वेळ आल्यावर त्याच कुबड्या त्यांच्या पाठीत हाणायला वापरतो, हे दिसून आले आहे.**

ज्या महानुभावांना या वेळी तृणमूल काँग्रेस, द्रमुक इत्यादींच्या विजयांमध्ये भारतीय "संघराज्य"चा विजय दिसतो आहे, ते हे समजण्यास असमर्थ आहेत की या संघराज्यवादालाच वापरुन भाजप अशा राज्यांवर आपली पकड मजबूत करीत आहे, जिथे त्याला कोणताही आधार नाही. आणि हे काम भाजपकडून नेहमीच प्रादेशिक भांडवली पक्षांचे हात पिरगळवून् केले जात नाही, तर **प्रादेशिक भांडवली पक्षांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या पक्षांना अशा युतीमध्ये रसच आहे कारण त्यांना केंद्रीय सत्तेत आपला पूर्वीपासून असलेला वाटा बळकट करण्याची आणि वाढविण्याची संधी मिळते.** ही वेगळी बाब आहे की, द्रमुक येवो वा अण्णाद्रमुक, तामिळनाडूच्या कष्टकरी लोकांच्या राहणीमानात आमूलाग्र बदल होणार नाहीत. द्रमुक-अण्णाद्रमुक या सापनाथ आणि नागनाथामधील राजकीय रस्सीखेचीत राज्यातील कष्टकरी जनतेला काहीच भविष्य नाही. हे दोन्ही पक्ष भांडवलशाहीचीच सेवा करतात आणि कष्टकरी जनतेला द्रविड आणि तामिळ अस्मितावाद आणि प्रतीकवादामध्येच गुंतवून ठेवतात.

**केरळमध्ये** यावेळी सुद्धा सी.पी.एम.च्या नेतृत्वात डावी लोकशाही आघाडी (एल.डी.एफ.) सत्तेत आली आहे. तिने 140 पैकी 99 जागा जिंकल्या आहेत. बंगालमध्ये काँग्रेसबरोबर युती करून निवडणुका लढवणाऱ्या सी.पी.एम.चा केरळमध्ये मुख्य विरोधी पक्ष काँग्रेसच आहे! या निवडणुकबाज मदाऱ्यांचा हा संधीसाधूपणाच आहे की त्यांच्यासाठी सत्ताच मुख्य आहे, तत्त्व नाही. काँग्रेसप्रणीत युती यु.डी.एफ.ला 41 जागांवर समाधान मानावे लागले आहे, ज्यापैकी काँग्रेसने लढवलेल्या 93 पैकी 21 जागा जिंकल्या आहेत. केरळच्या सिंहासनावर या दोन्ही आघाड्या एकामागून एक राज्य करत आल्या आहेत, पण जवळपास चार दशकांनंतर सलग दोनदा एकाच युतीचे सरकार स्थापन झाले आहे. त्यासोबतच, यावेळी केरळमध्ये भाजपला आपले खाते उघडता आले नाही, जरी 2016 मध्ये त्याने एक जागा जिंकली होती. एल.डी.एफ.च्या विजयाचे मुख्य कारण म्हणजे मागील दोन गंभीर पूरांदरम्यान झालेले सरकारी मदतकार्य, 2018 मधील निपा विषाणूच्या संसर्गाच्या पार्श्वभूमीवर पुरवलेली आरोग्य आणि इतर आवश्यक सेवा, आणि अलीकडील करोना साथीच्या रोगाचा तुलनेने चांगला प्रतिबंध. मात्र निवडणुका संपताच केरळमध्ये करोना संसर्गाचे प्रमाण अनेक पटींनी वाढले आहे. जरी या दोन्ही युतींवर वेळोवेळी भ्रष्टाचाराचे आरोप केले गेले आहेत, परंतु इतर कोणताही वास्तविक पर्याय नसल्यामुळे या दोघांपैकी एकाचे सरकार बनत आले आहे. या व्यतिरिक्त केरळमध्ये संसदीय डाव्या पक्षाची उपस्थिती देखील एक भ्रम निर्माण करते, आणि बहुतेक तरुण यालाच समाजवादाचे मॉडेल मानतात. हा भ्रम सुद्धा कोणताही वास्तविक पर्याय निर्माण आणि संघटित होण्यात मोठा अडथळा म्हणून काम करतो. सत्य हे आहे की तेथे सत्तेत असलेले तथाकथित कम्युनिस्ट पक्ष उदारीकरण-खासगीकरणाची लुटखोर धोरणे राबविण्यात अजिबात मागे नाहीत. केरळमध्ये फॅसिस्ट भाजपचा रथ रोखण्यासाठी या संसदीय डाव्या विचारांना जिंकणे आवश्यक आहे, असा पुष्कळ लोकांचा गोंधळ आहे. **वास्तवात सामाजिक लोकशाही आणि दुरुस्तीवादाच्या अवशेषांवरच फॅसिझमच्या मशरूमची पैदास होते. याचे सर्वात मोठे उदाहरण म्हणजे जर्मनीत नाझीवाद वाढणे आणि आपल्या देशात हिंदुत्व फॅसिझमचा उदय होय.** पण केरळमधील कष्टकरी लोकांच्या जीवनस्थितीचा विचार करता, रोजगाराचा सर्वात मूलभूत प्रश्न त्यांच्यासमोर तोंड वासून उभा आहे आणि एल.डी.एफ. किंवा अन्य कोणत्याही सरकारकडे यावर कोणताही तोडगा नाही. यासोबतच केरळमध्ये भाजपचा निवडणुकीतील पराभवही कमी मोजता कामा नये. संघ परिवार येथे अत्यंत संयम व तत्परतेने आपला वैचारिक व संघटनात्मक आधार येथे तयार करीत आहे. साबरीमलाच्या मुद्यावरही जनमत तयार करण्यात भाजपला यश आले होते आणि निवडणुकीच्या वेळी ते हा मुद्दा वापरतही होते. परंतु आपल्या देशातील उदारवादी विषाणूने ग्रस्त बौद्धिक घटकांना हे वास्तव दिसत नाही कारण ते स्वतःच राजकीय दूरदृष्टीच्या अभावाचे बळी आहेत.

**पुदुचेरीमध्ये** भाजपप्रणीत युती सरकार स्थापन करणार आहे. येथील विधानसभेच्या 33 जागांपैकी 30 जागांवर निवडणूक होते आणि 3 सदस्यांना केंद्र सरकारकडून नेमले जाते. येथे 10 जागा अखिल भारतीय एन.आर. काँग्रेसने व 6 जागा भाजपने जिंकल्या आहेत. 2016 मध्ये येथे काँग्रेस सत्तेत आली होती. यावेळी काँग्रेसला 2 जागा तर द्रमुकला 6 जागा मिळाल्या आहेत. अपक्षांनी येथे 6 जागा जिंकल्या आहेत. खरे तर भाजपकडून लढलेल्या बहुतांश उमेदवार हे काँग्रेसचेच पक्ष-बदलू उमेदवार आहेत आणि भाजपचा विद्यमान विधानमंडळ गट खरेतर 2016-21 मध्ये काँग्रेसचा विधानमंडळ गट होता! भांडवली पक्षीय राजकारणाच्या सडलेल्या आणि दुर्गंध सोडणाऱ्या घाणीने गेल्या 6 वर्षात सर्व विक्रम मोडले आहेत. हेच कारण आहे की भांडवली संसदीय विरोधक रुदालीसारखे छाती बडवत बोंबलतात की भाजपचे लोक आमच्या आमदारांना अशी लालूच देतात की हे निष्पाप बिचारे तिला नाकारू शकत नाहीत. याला वैचारिक कटीबद्धता जी यांची फक्त भांडवलाप्रती आहे. **साम्राज्यवादाच्या या पतनशील युगात भांडवली राजकारणामध्ये "मूल्यांचा" ज्याप्रकारे ऱ्हास झाला आहे, अगदी स्वतः भांडवलशाहीच्या मापदंडांनी मोजून सुद्धा, तो खरंच आश्चर्यचकित करणारा आहे. तसे पाहिले तर मूल्य देखील वर्ग-निरपेक्ष नसतातच आणि भांडवली राजकारणामध्ये तर संधीसाधूपणा आणि पक्षबदलूपणा सर्वात मूल्यवान संचित असते.** हेच कारण आहे की या पतनशील काळात भाजपचे **घोडाबाजाराचे** राजकारण चोमात चालू आहे. एन.आर. काँग्रेस आणि अण्णाद्रमुक सारख्या द्रविड अस्मितावादी प्रादेशिक पक्षांना संघी फॅसिस्ट भाजपशी हातामिळवणी करण्यात काहीच अडचण वाटत नाही. पुदुचेरीच्या कामगार जनतेच्या हिताचे प्रतिनिधित्व विद्यमान कोणताही राजकीय पर्याय करीत नाही. सत्ता परिवर्तनानंतर फक्त इतका फरक होणार आहे की, **अगोदर काँग्रेस इथल्या जनतेच्या छाताडावर नाचत होती आणि आता भाजप नाचणार आहे.**

या राज्यांच्या विधानसभा निवडणुकांच्या निकालांनंतर जी सर्वात प्रमुख गोष्ट दिसून येते ती म्हणजे भारतातील उदारवादी व्हायरसने ग्रस्त बुद्धीजीवी आणि विविध प्रकारच्या सामाजिक लोकशाहीवादी आणि डाव्या घटकांमध्ये अनैतिहासिक व अ-काटेकोर विचारातून निर्माण झालेला गोड-गैरसमज आणि अति-आशावादाचे वादळ, जे सर्वाधिक सोशल मीडियावर घोंघावले आहे. निवडणुकांच्या या मिश्र परिणामांना फॅसिस्ट राजकारणाचा अंत म्हणून हे घटक सादर करीत आहेत आणि फॅसिझमच्या धोक्याबद्दल कष्टकरी जनतेला बेसावध करत आहेत; सध्याच्या आव्हानांशी लढा देण्याकरिता क्रांतिकारी हस्तक्षेप करण्याच्या मार्गावर कामगार वर्गाला नि:शस्त्र व अरक्षित सोडत आहेत. यालाच आम्ही भांडवली उदारमतवादी भ्रम म्हटले आहे. खरेतर क्रांतिकारी पर्यायाच्या अनुपस्थितीबद्दल काळजी करण्याऐवजी देशातील उल्लेखनीय बौद्धिक वर्तुळात एक वेगळ्याच प्रकाराचा टीकाहीन उल्हास आणि उत्सवी वातावरण तयार झाले आहे. या उदारवादी समुदायाबद्दलचे लेनिनचे मूल्यांकन आजही तेवढेच अचूक आहे की जेव्हा एका उदारवाद्याला शिवी दिली जाते तेव्हा ते म्हणतो: देवाचे आभार, त्यांनी मला मारहाण केली नाही. जेव्हा त्याला मारहाण केली जाते, तेव्हा तो पुन्हा देवाचे आभार मानतो की त्याला मारले नाही. आणि जेव्हा तो मारला जाईल, तेव्हा तो पुन्हा देवाचे आभार मानेल की या नश्वर देहापासून अनश्वर आत्म्याला मुक्ती तर मिळाली! त्यांची हीच तऱ्हा आहे. क्रांतिकारक बदल त्यांना अपचन करवतात, म्हणून ते केवळ लहान बदलांनीच काम चालवतात!

**दुसरे म्हणजे, अशा सगळ्या उदारवादी राजकारणाचे उद्दिष्ट असते "कमी वाईट" पर्याय निवडणे.** अधूनमधून काही क्रांतिकारक आणि तथाकथित क्रांतिकारक पक्षही याच लिबरल विषाणूमुळे पीडित होत असल्याचे आढळले आहे. विशेषत: बंगालमध्ये ममता बॅनर्जी आणि तृणमूल काँग्रेसच्या विजयाबद्दल असेच एक दृश्य दिसून येत आहे. भांडवली निवडणुकांच्या नुराकुस्तीमध्ये हार-जीतचा खेळ तर सुरूच राहतो. बिहार विधानसभा निवडणुकीत लालू यादव आणि नितीशकुमार (आर.जे.डी.-जे.डी.यू.ची संधीसाधू आघाडी) यांनी भाजपला पराभूत केलेल्या खूप दिवस लोटले नाहीत. तरीही, अनेक हुशार सुजाण उदारवादी फॅसिझमच्या निर्णायक पराभवाविषयी बोलताना थकले नाहीत. नंतर काय झाले? **नितीशकुमार यांनी काहीही उशीर न करता भाजपचा हात धरला आणि मागे एकटे राहिले आपले गरीब बिचारे उदारवादी सज्जन!** यानंतर, 2019 च्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी उत्तर प्रदेशात मायावती आणि अखिलेश यादव एकत्र आल्यावर जणू काही या लिबरल जमातींच्या नसांमध्ये नवीन रक्तच संचारले होते! पण तो आशावादही फार काळ टिकला नाही. आजकाल उद्धव ठाकरे हे त्यांच्या आवडत्या नायकांपैकी एक आहेत. या पक्षांचे नेते स्वत: भांडवली निवडणुकीच्या धिंगाण्याला सर्कसपेक्षा कमी लेखत नाहीत, पण तरीही लिबरल व्हायरसने ग्रस्त असणाऱ्यांचा गळा विनाकारणच कोरडा पडत राहतो. आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की **कोणताही बेगडी-आशावाद शेवटी गहन निराशेला जन्म देतो. दरोडेखोरांच्या या किंवा त्या पक्षाच्या विजयातून बेगडी-आशावाद पोसण्याऐवजी लोकाभिमुख क्रांतिकारक शक्तींचे वास्तविक लक्ष कष्टकरी जनतेच्या मुक्तीचा खरा पर्याय उभा करण्याकडे असले पाहिजे.**

या शिवाय उदारवाद्यांच्या या जमातीत स्मृतिभ्रंशाची समस्या सुद्धा मोठ्या प्रमाणात आढळून येते. ज्या कोणत्या चेहऱ्या-मोहऱ्यांना यांनी फॅसिझमविरुद्ध नायकांची भूमिका देण्याचा हास्यास्पद प्रयत्न केला आहे, त्या सर्वांचा इतिहास फॅसिस्टांची शैय्यासंगत करण्याच्या उदाहरणांनी व्याप्त आहे. मग ती मायावती असो वा या गटाची नवीन 'पोस्टर गर्ल' ममता बॅनर्जी, या सर्वांनी यापूर्वीच भाजपबरोबर राजकीय फेरफटके बरेच मारले आहेत. पण भ्रम आणि मतिभ्रमांनी त्रस्त असलेल्या या उदारमतवादी लोकांना त्याचे काय? खरेतर वैचारिक-सैद्धांतिक अक्षविहीनता आणि इतिहासबोधाच्या अभावी हे उदारवादी या किंवा त्या छद्म-पर्यायाच्या मागे धावत राहतात. वास्तविक परिवर्तनाच्या कोणत्याही प्रकल्पावर काम करणे त्यांच्यासाठी एक दुर्दम्य गोष्ट असते. आणि मग ब्रेष्ट्च्या शब्दात हे लोक लहान बदलांद्वारे मोठ्या बदलांचा मार्ग थांबवण्याच्या कामाला लागतात.

या निवडणुकीच्या निकालांना भारतीय संघराज्यवादाचा विजय म्हणून जाहीर करणारा दुसरा गटही आहे. या गटातही अनेक प्रकारचे लोक आहेत - काँग्रेस-समर्थकांपासून ते संसदीय डाव्यांच्या विचारवंतांपर्यंत. परंतु या गटांच्या सुरात आता "नावाने मार्क्सवादी पण प्रत्यक्षात राष्ट्रवादी" असणारे गटही सूर मिसळत आहेत. पंजाबमधील हे भाषिक अस्मितावादी-बुंडीस्ट-राष्ट्रवादी या निवडणुकांच्या विश्लेषणाच्या बहाण्याने पुन्हा एकदा संघराज्यवादाचे ढोल बडवत आहेत. त्यांच्या विश्लेषणावरून हे स्पष्ट दिसून येते की त्यांची सामान्य तर्कबुद्धी सुद्धा कशाप्रकारे कंगाल झालेली आहे आणि मार्क्सवादाच्या क्रांतिकारक सिद्धांत आणि व्यवहारापासून ते वेगाने दूर झाले आहेत.

बंगालच्या निवडणुकीच्या निकालावर हे

पान 8 वर

# पाच राज्यांमध्ये झालेल्या निवडणुकांचा निकाल आणि कामगार वर्गाचा दृष्टिकोण

पान 7 वरून

राष्ट्रवादी म्हणतात की हा केंद्राच्या हिंदूत्ववादी अजेंड्यावर संघवादाचा विजय आहे! अशा प्रकारच्या वर्ग-विश्लेषण रहित भांडवली राष्ट्रवादाचे वेड या राष्ट्रवादी लोकांना बऱ्याच काळापासून आहे. आता यांना कुणी विचारावं की ममता बॅनर्जींच्या टी.एम.सी.चा अस्मितावाद, केरळमधील सामाजिक फॅसिस्टांचे राजकारण आणि तामिळनाडूतील भाषिक अस्मितावाद्यांची उठाठाव कष्टकरी वर्गातील कोणत्या हिश्श्यांचे प्रतिनिधित्व करते? भांडवली राष्ट्रवाद आणि प्रादेशिक भांडवलदार वर्गाच्या लोकप्रिय नाऱ्यावर म्हणजेच “संघवादा”वर या प्रकारे लोटांगण घालणे हे कोणत्याही प्रकारे कम्युनिस्ट राजकारण किंवा कामगार वर्गीय कार्यदिशा होऊ शकत नाही. दुसरे, या निवडणूकीत तसेच बंगालच्या राजकारणात तृणमूल काँग्रेसने ज्या प्रकारचे अस्मितेचे राजकारण केले आहे ते कामगारवर्गाच्या क्रांतिकारी राजकारणासाठी पूर्णत: घातक आहे आणि कामगार वर्गाच्या भावी एकतेच्या शक्यतेमध्ये अडथळाच आहे. तसेच, या कम्युनिस्टांचा हा दावा की ममतांचा “जय बांगला” चा नारा भाजपच्या “जय श्री राम” च्या घोषणेवर भारी पडला, वास्तवापासून कोसभर दूर आहे. या निवडणूकीत ममता बॅनर्जीनी "दुर्गे"चे प्रतीक सर्वात जास्त आणि खुलेपणाने वापरले आहे कारण त्यांनाही "हिंदू" ओळखीवरचा दावा सोडण्याची इच्छा नव्हती आणि त्या बंगालच्या हिंदू लोकसंख्येला आपल्या "हिंदू ब्राह्मण" असल्याचा पुरावा देत होत्या आणि "सॉफ्ट हिंदुत्व" चे कार्ड खेळत होत्या. खरेतर हा संघ परिवाराच्या हिंदुत्ववादी फॅसिस्ट राजकारणाचा विजयच आहे की भांडवली निवडणुकीच्या क्षेत्रात त्यांनी प्रत्येक विरोधकला आपली “हिंदू” ओळख सिद्ध करण्यास भाग पाडले आहे आणि आपल्या सोयीचे नियम या खेळाला लागू केले आहेत. पण आमचे राष्ट्रवादीही याचे कौतुक करीत आहेत. खरेतर या राष्ट्रवादी-भाषिक कट्टरतावाद्यांनी कोणत्याही राजकीय घटनेचे विश्लेषण करण्यासाठी मार्क्सवादी पद्धतीला अगोदरपासूनच थंड्या बस्तानात गुंडाळून ठेवले आहे, आणि म्हणूनच प्रत्येक घटना स्पष्ट करण्यासाठी त्यांच्या फाटलेल्या वैचारिक झोळीतून संघराज्यवादाचाच गंजलेला वस्तरा निघतो आणि सत्याची हजामत करण्यात हे स्वत:ला जुंपून घेतात.

संघराज्यवादाचे प्रणेते असलेले हे राष्ट्रवादी त्यांच्या संघराज्यवादी चश्म्यातून आसाममधील निवडणुकीच्या निकालांचे कोणतेही स्पष्टीकरण टाळतात. त्यांच्या मते भारतासारख्या बहुराष्ट्रीय देशात हिंदुत्ववादी फॅसिस्टांची सर्वात मोठी दुर्बलता म्हणजे संघराज्यवाद आहे, मग ही कमकुवतता आसाममध्ये का कामी आली नाही? म्हणूनच आसामच्या बाबतीत, जेथे आसामी राष्ट्रीय अस्मिता आणि स्थानिक भावना कोणत्याही अर्थाने बांग्ला अस्मितेपेक्षा कमी नाहीत, उलट असे म्हणणेच अधिक योग्य ठरेल की आसाममध्ये अस्मिता अधिक प्रबळ आहे, तेथील निवडणुक निकालांचे असेच संघराज्यवादी विश्लेषण करण्यावेळी हे राष्ट्रवादी नजरा चुकवू लागतात. सर्व स्थानिक विरोधाभासांना आणि तथाकथित संघराज्यवादाच्या समर्थकांना भाजपने कसे ‘मॅनेज’ केले? इतकेच नव्हे तर कर्नाटकपासून पंजाब, महाराष्ट्र, गुजरात आणि हरियाणा (ज्याला हे बुंडवादी-राष्ट्रवादी वेगळी राष्ट्रीयता मानतात) ते त्रिपुरापर्यंत भाजपची फॅसिस्ट मोहीम सतत बळकट किंवा अधिक मजबूत झाली आहे किंवा तिने या राष्ट्रवाद्यांच्या प्रिय संघराज्यवाद्यांना गिळंकृत केले आहे. यातून दिसून येते की जेव्हा मार्क्सवादी विज्ञानावरची पकड सुटते तेव्हा असेच विरोधाभासी परिणाम समोर येतात. या राष्ट्रवाद्यांना किंवा सोबतच संघराज्यवादाच्या इतर समर्थकांना खरोखरच हिंदुत्ववादी फॅसिझमचे, ज्याचे मुख्य उद्दिष्ट सध्याच्या साम्राज्यवादाच्या युगातील भांडवलदार वर्गाच्या सर्वात प्रतिक्रियात्मक भागाची सेवा करणे आहे, खरे स्वरूप माहितच नाही. यासाठी हे फॅसिस्ट जिथे सोईचे असेल तिथे केंद्रियतेला फाट्यावर मारत फुटीरतावाद्यांशी हातमिळवणी करु शकतात, गायीला थाळीमध्ये सादर करू शकतात आणि भाषा-संस्कृतीला धरून मनमर्जी सूट देऊ शकतात. जनसंघ आणि नंतर भाजपच्या काळात आपण सहजपणे पाहू शकतो की ही भारतीय फॅसिस्टांची वैचारिक लवचिकताच आहे. पण हे राष्ट्रवादी, संघींच्या हिंदुत्ववादी फॅसिस्ट विचारधारेत कोणते आदर्श, एकरूपता आणि सातत्य शोधत आहेत ही देखील संशोधनाची बाब आहे! अर्थातच, या राष्ट्रवाद्यांच्या लिखाणात आणि विचारांमध्ये भांडवली संघराज्यवादासोबत सतत होणाऱ्या फेरफटक्यांची निरंतरता नक्कीच दिसून येत येते. खरेतर सर्व राज्यांमध्ये प्रादेशिक भांडवलदार वर्गाच्या सर्व राजकीय पक्षांना ना हिंदुत्ववादी फॅसिस्टांसमवेत सत्तेची शैय्या सजवण्यात हरकत आहे, ना त्यांच्या कडेवर बसण्यात त्यांनी इतिहासात कधी कमतरता सोडली आहे. काँग्रेस काय आणि स्थानिक पक्षांचे नेते काय, सर्वजण गलिच्छ नाल्यांच्या पाण्याप्रमाणे भाजपच्या गटार-गंगेमध्ये सतत येत जात राहतात. हे समजण्याकरिता एखाद्या विशेष कौशल्याची आवश्यकता आहे का? सर्व राज्यांमध्ये या राष्ट्रवाद्यांना प्रिय असलेल्या स्थानिक संघराज्यवादाचे झेंडेकरी असलेल्या पक्षांसोबत युती करूनच भाजप मजबूत झाली आहे. खुद्द पंजाबच याचे एक जिवंत उदाहरण आहे.

वास्तविक या राष्ट्रवाद्यांच्या म्हणण्यानुसार भारतातील प्रत्येक राष्ट्र आणि राष्ट्रीयता दडपलेल्या आहेत. त्यांच्या मते, भारतातील सर्व राष्ट्रांना राष्ट्रहीन/अराष्ट्रीय भांडवलदार वर्ग दडपत आहे. त्यांचे विश्लेषण किती दिवाळखोर आहे हे इतके वाचूनच समजते. खरेतर भारताचा शासकवर्ग या राष्ट्रवाद्यांच्या मतानुसारचा राष्ट्रहीन नाही, तर तो बहुराष्ट्रीय सत्ताधारी वर्ग आहे, ज्यामध्ये प्रत्येक राष्ट्रातील भांडवलदार वर्गाला त्यांच्या शक्ती आणि आकारमानानुसार प्रतिनिधित्व मिळालेले आहे. नक्कीच, सत्तेच्या वाटण्याबाबत या वेगवेगळ्या गटांत सतत चढाओढ चालू असते, ज्याचे राजकीय प्रतिबिंब भांडवली संसदीय राजकारणात वेगवेगळ्या पक्षांमधील ओढाताणीमध्ये दिसून येते, परंतु याचा अर्थ असा नाही की या राष्ट्रांचे भांडवलदार वर्ग दडपलेले आहेत. केंद्रापासून ते राज्यांच्या पातळीवर होणाऱ्या निवडणुकांच्या राजकारणापासून ते सामाजिक स्तरावर होणाऱ्या विविध चळवळींमध्ये हे आपण सहजपणे पाहू शकतो. परंतु डोळ्यांवर जर संघराज्यवादाची आणि राष्ट्रवादाची पट्टी चढवलेली असेल तर असे साधे युक्तिवाद आणि तथ्य सुद्धा कोणाला समजावून सांगता येत नाहीत. खरेतर, आज काश्मीर आणि ईशान्य भारतातील राज्यांव्यतिरिक्त राष्ट्रीय प्रश्न भारतात इतर कोठेही अस्तित्वात नाही. परंतु या राष्ट्रवाद्यांमध्ये असे म्हणण्याचे धैर्य देखील नाही की जर भारतातील सर्व राष्ट्रे “राष्ट्रीय” अत्याचाराच्या जात्यात भरडली जात असतील तर लेनिनवादी कार्यदिशे नुसार राष्ट्रीय दमनाविरोधात फक्त एकच कार्यक्रम बनू शकतो - स्वतंत्र्य होण्याच्या पर्यायासहित आत्मनिर्णयाचा अधिकार. संघराज्यवाद किंवा कोणत्याही प्रकारच्या प्रादेशिक स्वायत्ततेचे रक्षण वा मागणी या राष्ट्रीय दमनाचा अंत करण्याचा कार्यक्रम असूच शकत नाही. हा तर पूर्णपणे सुधारवादी कार्यक्रम होईल, किमान लेनिनवादी कार्यदिशा तर हेच सांगते. पण आम्ही म्हटल्याप्रमाणे या क्रांतिकारक धैर्याच्या अभावामुळे, जेव्हा हे राष्ट्रवादी स्वत:ला या "दडपलेल्या" राष्ट्रीयतेचे नेते म्हणून पाहू लागतात, तेव्हा त्या विरोधात लढण्यासाठी ते लगेचच आपल्या खिशातून संघराज्यवादाची पिपाणी काढून वाजवू लागतात.

कामगार वर्गाचे क्रांतिकारक तत्वज्ञान, मार्क्सवाद, संघराज्यवादाला विरोध करते आणि सुसंगत लोकशाहीवर आधारीत केंद्रियतेचे समर्थन करते. संघराज्यवाद हा फक्त प्रादेशिक भांडवलदार वर्गाचा नारा आहे, अजून काही नाही. भांडवलशाही मध्ये कामगार वर्गाने संघराज्यवादाचा विशेषतः विरोध केला पाहिजे कारण यामुळे भविष्यात वेगवेगळ्या राष्ट्रांमधील आणि विविध राष्ट्रीयता असलेल्या कामगार-कष्टकरी जनतेचे ऐक्य रोखले जाते आणि त्यांच्यात विभाजनाच्या भिंती उभ्या होतात. संघराज्यवादाचा नारा देणे म्हणजे कामगार वर्गाच्या खऱ्या राजकारणापासून आणि वर्गसंघर्षांपासून पळून कामगार वर्गाला भांडवलदार वर्गाचे शेपूट बनवणे आहे. त्यांच्या संघराज्यवादी जीर्ण रंगढंगात हेच काम भाषिक अस्मितावादी-बुंडिस्ट-राष्ट्रवादी करत आहेत. सर्व जगाप्रमाणेच भारततही भांडवली शोषण आणि त्याद्वारे पैदा केल्या जाणाऱ्या सर्व भाषिक, राष्ट्रीय, सांस्कृतिक, जातीय आणि लैंगिक भेदांचा विनाश हा कामगार वर्गीय दृष्टीकोनावर टिकूनच शक्य आहे. हिंदुत्व फॅसिझमच्या रूपातील भांडवलशाहीच्या हितरक्षकालाही कामगार वर्गाच्या क्रांतिकारक वर्गीय एकजुटीच्या फौलादी मुठीच्या प्रहारानेच धूळ चाखवता येईल, संघराज्यवादाच्या सुधारवादी खुळखुळ्याने नाही.

भाकप-माकप सारख्या संसदीय डाव्या सुधारवादी पक्षांची खरी परिस्थितीही या निवडणुकांमध्ये पुन्हा एकदा उघडकीस आली. भांडवली राजकारणाच्या मलकुंडात आकंठ आंघोळ करणारे हे पक्ष आपल्या निकृष्ट प्रकारातील राजकीय संधीसाधूपणाला लपवण्यासाठी सतत नवीन वैचारिक बुरखा परिधान करत राहतात. आजकाल आपला संधीसाधूपणा आणि कामगार वर्गाशी केलेली फितुरी लपवण्यासाठी इतर भांडवली पक्षांशी हातामिळवणी करण्याला हे पक्ष फॅसिस्ट भाजपविरोधी रणनितीचे नाव देतात आणि दावा करतात की मोदी-शहांच्या रथाचे चाक पुढे जाण्यापासून रोखणे हीच वेळेची गरज आहे आणि याला कामगार वर्गाने समजून घेतले पाहिजे! त्यांच्या या तथाकथित फॅसिस्टविरोधी रणनीतीची दिवाळखोरी यावेळच्या निवडणुकांच्या वेळीही उघडकीस आली, जेव्हा एकीकडे बंगालमध्ये फॅसिस्ट रथ थांबविण्यासाठी त्यांनी काँग्रेसशी युती केली होती आणि दुसरीकडे केरळमध्ये काँग्रेसच्या विरोधात निवडणूक मैदानात ते उतरलेले होते. जणू केरळमध्ये फॅसिझमच्या पुढे जाणाऱ्या मोहिमेला थांबवणे आवश्यक नव्हते! हे विसरता कामा नये की जनसंघाच्या रूपात भाजपला मुख्य प्रवाहात आणण्याचे आणि कामगार चळवळीशी ऐतिहासिक विश्वासघात करून तिला अर्थवाद आणि संसदेवादाच्या गर्तेत ढकलण्याचे पापही याच संसदीय बात-बहाद्दरांच्या माथी आहे. म्हणूनच त्यांची स्थिती देखील कमी हास्यास्पद नाहीये. बंगालमध्ये त्यांचा मोठा आधार यापूर्वीच भाजपकडे गेला होता, आणि त्यांच्या जुन्या पारंपारिक भागात सुरूंग लावून उरली-सुरली कमतरता या वेळी तृणमूल काँग्रेसने पूर्ण केली.

शेवटी, सर्वात महत्त्वाची गोष्ट ही समजून घेणे आवश्यक आहे की विविध राज्यांमध्ये कोणताही पक्ष जिंकला किंवा हरला तरी त्या राज्यांतील सामान्य कष्टकरी लोकांच्या जीवनात कोणताही वास्तविक बदल होणार नाहीये. सर्व रंगांचे आणि झेंड्यांचे पक्ष भांडवली व्यवस्थेचेच पुरस्कर्ते आहेत, तिच्या रक्षणामध्ये गुंतले आहेत आणि भांडवलदार धार्जिण्या, कामगार-कष्टकरी विरोधी धोरणांनाच पुढे नेत आहेत. या वस्तुस्थितीची पुष्टी या तथ्यातूनच होते की सर्व भांडवली पक्ष, मग ते भाजप, काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, द्रमुक-अण्णाद्रमुक किंवा दुरूस्तीवादी भाकप-माकप असोत, या सर्वांना भांडवलदार घराण्यांपासून ते छोटे-भांडवलदार, धनिक शेतकरी आणि शेतमालक, व्यापारी, बिल्डर, डीलर्स यांच्याकडून कोट्यवधी रुपये दरवर्षी मिळतात. यावेळच्या विधानसभा निवडणुकांबद्दल बोलायचे झाले तर बंगालमधील एकूण उमेदवारांपैकी 18 टक्के करोडपती होते, आसाममधील 27.9टक्के उमेदवार करोडपती होते, तामिळनाडूमध्ये 18.3 टक्के उमेदवार करोडपती होते, तर पुदुचेरीमध्ये 23 टक्के उमेदवार करोडपती होते. हे पक्ष आणि त्यांच्या उमेदवारांकडून कामगार वर्ग आणि सामान्य कष्टकरी जनतेच्या हितांचे प्रतिनिधित्व करण्याची अपेक्षा केली जाऊ शकते? नक्कीच नाही!

त्याच बरोबर, एखाद्या जागी फॅसिस्ट भाजप आणि त्यांचे सहयोगी हरले असले तरी तो जनतेला एखादा तात्काळ अल्प मुदतीचा दिलासा वाटू शकतो, परंतु फॅसिझमचे संकट याप्रकारे टळू शकत नाही. म्हणूनच निवडणुकीच्या निकालांनी उत्साही होण्याऐवजी जनपक्षधर-शक्तींनी आणि विशेषत: कामगार वर्गाच्या क्रांतिकारक शक्तींनी जनतेचा योग्य राजकीय पर्याय उभा करण्याकडे लक्ष दिले पाहिजे. संसदीय राजकारणात क्रांतिकारक हस्तक्षेप करताना सुद्धा लोकांमध्ये संसदीय राजकारणाच्या माध्यमातून सामाजिक-आर्थिक संरचनेत आमूलाग्र बदल करता येण्याच्या भ्रमाला सतत उघडे केले पाहिजे. हे तेव्हाच शक्य आहे जेव्हा कामगार वर्ग आणि सामान्य कष्टकरी जनता आपल्या स्वतंत्र राजकीय पक्षाच्या माध्यमातून संसदीय निवडणूकीत डावपेचात्मक सहभाग घेईल आणि त्याच्या मर्यादांना व्यवहारात दाखवून देईल. कामगार वर्गाचे महान शिक्षक लेनिनच्या शब्दांत ऐतिहासिकदृष्ट्या कालबाह्य संसदवादाला राजकीय दृष्टीने कालबाह्य व्यवहारातच सिद्ध केले जाऊ शकते. कष्टकरी जनतेची वास्तविक मुक्ती तेव्हाच शक्य आहे जेव्हा उत्पादन आणि राज्यकारभारावर कष्टकरी वर्गांचाच ताबा असेल आणि निर्णय घेण्याची शक्ती त्यांच्या हातात असेल. भारतात ही गोष्ट फक्त नव्या समाजवादी क्रांतीद्वारेच होऊ शकते. हे सांगण्याची गरज नाही की चार राज्ये आणि एका केंद्रशासित प्रदेशातील निवडणुकीच्या निकालांनी कष्टकरी जनतेसमोर त्यांचा योग्य राजकीय पर्याय उभा करण्याची गरज पुन्हा अधोरेखित केली आहे.

**मज़दूर बिगुल, मे 2021 मधून साभार**

**अनुवाद - अभिजित**

# पॅरिस कम्युन: पहिल्या मजूर राज्याची सचित्र कथा (पुष्प तिसरे)

आज भारतातच नाही, तर संपूर्ण दुनियेत कामगार भांडवली लुटखोरांच्या वेगवान होत चाललेल्या हल्ल्यांचा सामना करत आहेत, आणि कामगार आंदोलन विखुरलेपण, साचलेपणा, आणि हताशेने ग्रासलेले आहे. अशामध्ये इतिहासाची पाने उलटून कामगार वर्गाच्या गौरवशाली संघर्षांपासून शिकण्याचे आणि त्यांच्यापासून प्रेरणा घेण्याचे महत्व फार वाढते. **आजपासून 150 वर्षे अगोदर, 18 मार्च 1871 ला फ्रांसची राजधानी पॅरिस मध्ये पहिल्यांदा कामगारांनी आपले शासन कायम केले. याला पॅरिस कम्युन म्हटले गेले.** त्यांनी शोषकांद्वारे पसरवल्या जाणाऱ्या या विचारांना ध्वस्त केले की कामगार राज्यकारभार चालवू शकत नाहीत. पॅरिसच्या बहादूर कामगारांनी फक्त भांडवली सत्तेच्या रथालाच उलटवले नाही तर 72 दिवसांच्या शासनाच्या दरम्यान येणाऱ्या दिवसांचे एक छोटे मॉडेल जगासमोर प्रस्तुत केले आणि दाखवले की समाजवादी समाजामध्ये भेदभाव, असमानता, आणि शोषण कशाप्रकारे समाप्त केले जाईल. पुढे चालून 1917 च्या रशियन कामगार क्रांतीने या क्रांतीचा पुढचा टप्पा रचला.

कामगार वर्गाच्या या साहसी कारवाईने फक्त फ्रांसमधीलच नाही तर जगातील भांडवलदारांचे काळीज थरथरले. त्यांनी कामगारांच्या पहिल्या सत्तेला सुरुंग लावण्यासाठी जीवतोड प्रयत्न केले आणि शेवटी कामगारांच्या कम्युनला त्यांनी रक्ताच्या नद्यांमध्ये न्हाऊन काढले. पण कम्युनचे सिद्धांत अमर झाले.

पॅरिस कम्युनच्या पराजयातूनसुद्धा जगातील कामगार वर्गाने महत्वाचे धडे घेतले. पॅरिसच्या कामगारांचे बलिदान कामगार वर्गाला सतत आठवण देत राहील की भांडवलशाहीला नष्ट केल्याशिवाय त्यांना मुक्ती मिळू शकत नाही.

पॅरिस कम्युनला 150 वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने 'कामगार बिगुल' च्या या अंकापासून आम्ही जगातील पहिल्या कामगार राज्याच्या सचित्र कथेची सुरुवात करत आहोत. 'मजदूर बिगुल' मध्ये मार्च 2012 पासून प्रकाशित झालेल्या धारावाहिक कथेचा अनुवाद पुढील अंकांमध्ये आम्ही देत राहू. — संपादक मंडळ

## कामगाराच्या रक्ताने लिहिलेली पॅरिस कम्युनची अमर कहानी


मागील दोन पुष्पांमध्ये आपण हे माहित करून घेतले की `भांडवलशाहीच्या जुलमी, पाशवी सत्तेच्या विरूध्द लढायचे कसे हे कामगार शिकले'. मशिनी तोडून आपला राग व्यक्त करण्यापासून कामगारांचे आंदोलन चार्टीस्ट आंदोलनापर्यंत पोहचले. हे कामगार वर्गाचे पहिले व्यापक आंदोलन होते आणि ते अयशस्वी झाले तरी ते एक प्रेरणादायी उदाहरण ठरले. यानंतर 1848च्या क्रांत्यांमध्ये कामगारांनी चढाओढीने हिस्सा घेतला आणि खूप मोठी किंमत मोजून ते बहुमोल धडे शिकले. आपण कम्युनिस्ट लीगची स्थापना, कम्युनिस्ट घोषणापत्र लिहीले जाणे आणि कामगारांच्या पहिल्या आंतरराष्ट्रीय संघटनेच्या स्थापने बाबत जाणले. या अंकात आम्ही पॅरिस कम्युनची सगळी कथा थोडक्या शब्दांत वाचकांसमोर मांडणार आहोत. या महागाथेच्या एकेका पैलूच्या बाबतील सविस्तर माहिती पुढील प्रत्येक अंकात सविस्तर देत राहू.

**1.** 1870 च्या उन्हाळ्यात फ्रांसच्या भांडवलदार वर्गाने देशाला प्रशिया सोबतच्या युद्धात उतरवले. सरकार व सेनेचे नेते भ्रष्ट होते. एका मागून एक अशा अनेक युद्धात फ्रांन्सचा पराजय झाला. शेवटी सप्टेंबर मध्ये 80,000 अप्रशिक्षित व कुचकामी हत्यारांनी सज्ज लोकांना प्रशियाच्या सुसंघटीत आणि सुसज्ज सेनेपुढे झोकले गेले. फ्रेंच घेरले गेले आणि वाईट पद्धतीने हारले. फ्रान्सचा नेता तिसरा नेपोलियन आणि त्याचे अर्धे सैन्य कैद केले गेले. पॅरिस चे रक्षण करणाऱ्या सेनेचे याच प्रकारे हाल झाले. प्रशिया राजधानी पॅरिसवर चालून आला! परंतु शहरातील कामगार जनतेने "नॅशनल गार्ड" च्या सैनिकी तुकडीची निर्मिती केली होती. त्यांचे खाण्याचे हाल होत होते. बेकरीवाल्यांच्या दुकानासमोर पावासाठी मोठमोठ्या रांगा लागत होत्या. तरीही त्यांनी शहराच्या सुरक्षेसाठी अनेक तोफा जमवल्या आणि पॅरिसच्या तटबंदी वर सज्ज केल्या. पॅरिसच्या श्रीमंत लोकांना वाटले की कामगारांच्या या कारवाईचा धोका त्यांनाही तितकाच आहे जितका प्रशियाला. जनतेमध्ये क्रांतीकारी उत्साह जागृत झाला होता आणि बाहेरच्या शत्रूवर ताणलेल्या बंदुका तेवढ्याच लिलया पद्धतीने आतल्या शत्रूकडे फिरू शकत होत्या. श्रीमंताच्या इशाऱ्यावरून जनतेकडून या तोफा हिसकावण्याचा प्रयत्न केला गेला. तातडीने इशाऱ्याचा संदेश पसरवला गेला: सगळ्या शहरातील कामगार ज्यात स्त्रिया पण होत्या व पुरुष पण, ते सगळे तोफांच्या रक्षणासाठी निघाले. आणि सरकारी सैनिक या रक्षकावर हल्ला न करता त्यांना सामील झाले.



पॅरिसच्या सुरक्षेसाठी कामगार आणि नॅशनल गार्डने मिळून खूप साऱ्या तोफा आपल्या ताब्यात घेवून पॅरिस मध्ये जागोजागी तैनात केल्या. मोन्तमात्र डोंगरावर लावलेली अशीच एक तोफ या चित्रात दिसत आहे. 8 मार्च 1871 ला मंत्री थियेर ने आपल्या सैनिकांना कामगार आणि नॅशनल गार्ड यांच्या कडून सर्व तोफा हिसकावून घेण्याचे आदेश दिले. याच्या विरोधातूनच पॅरिसमध्ये कामगारांनी विद्रोहाला सुरवात केली.

**2.** 18 मार्च 1871 रोजी पॅरिस कम्युन म्हणजेच कामगारांचे राज्य घोषित केले गेले. सरकार आपल्या काही सैनिकी तुकड्यांसोबत थोड्या दूर अंतरावरच्या वर्सायच्या महालात पळून गेले. कम्युनार्डांनी (पॅरिस कम्युनच्या कामगारांनी) त्यांना जाऊ दिले, जेव्हा की ते या सैनिकांना आपल्या बाजूला वळवू शकत होते. जे श्रीमंत लोक पॅरिस मधून पळून जात होते त्यांना कम्युनार्ड्सनी बंधक बनवायला हवे होते, पण त्यांनी असे केले नाही. त्यांना या उदारतेची खूप मोठी किंमत मोजावी लागली. एरोनदिसमेंट म्हणजेच जिल्ह्यांमध्ये वाटल्या गेलेले पॅरिस महानगर आता कम्युनार्ड्सच्या तुकड्यांच्या ताब्यात होते. त्यामध्ये स्त्री-पुरुष, कामगार आणि बुध्दीजीवी सहभागी होते. लेनिन च्या शब्दात "एक नव्या प्रकारचे राज्य—कामगारांचे राज्य" निर्माण होत होते. या नव्या राज्याने केलेल्या घोषणा वाचण्यासाठी लोकांची रस्त्यावर गर्दी होत होती. चर्चचे सत्तेपासून विलगीकरण, बेकरी दुकानात रात्री काम करण्याची मनाई, गरिबांचे मागील भाडे रद्द, पाद्यांना अटक, बंद पडलेले कारखाने परत चालू करणे, कामगारांना झालेला दंड माफ.



कम्युनच्या निर्णयांची घोषणा होताच ते वाचण्यासाठी पॅरिसच्या कष्टकऱ्यांची गर्दी होत होती. एका भितींवर चिटकवलेले घोषणापत्र वाचणारे कष्टकरी लोक.

26 मार्च 1871 ला जनतेद्वारे निवडलेल्या समितीने पॅरिस कम्युन स्थापन झाल्याची घोषणा केली. संपूर्ण पॅरिसमध्ये कामगारांमध्ये उत्साहाची लाट पसरली. त्यांनी कोणत्याही परिस्थितीत कम्युनचे रक्षण करण्याचा संकल्प केला.



# पॅरिस कम्युन: पहिल्या मजूर राज्याची सचित्र कथा (पुष्प तिसरे)

**3.** जगातील या पहिल्या कामगार सरकारची स्थापना भांडवली राज्यातील नोकरशाही पूर्णपणे बरखास्त करून खऱ्या सार्वत्रिक मताधिकाराने झाली. स्थापनेनंतर टेलर, न्हावी, चर्मकार, प्रेस कामगार हे सर्व कम्युनचे सभासद म्हणून निवडले गेले. कम्युनला कार्यपालिका आणि न्यायपालिका म्हणजेच सरकार आणि संसद या दोघांचेही काम करायचे होते. जुन्या पोलीस आणि सेनेला बरखास्त केले गेले आणि सर्व कष्टकरी जनतेला शस्त्रसज्ज करण्याचे काम सुरू झाले. सत्तेवर आल्यावर दोनच दिवसात जुन्या सरकारचे सगळे बदनाम कायदे कम्युनने रद्द केले. कम्युनने पहिल्यांदा वास्तविक धर्मनिरपेक्ष लोकशाही साकार करून हे घोषित केले की धर्म हा प्रत्येक व्यक्तीचा खाजगी मामला आहे आणि राज्यसत्ता वा सरकारला यापासून दूर ठेवले जाईल. कम्युन मध्ये सर्वाधिक महत्वपूर्ण हुद्दे आणि जबाबदारी घेणाऱ्या व्यक्तींनाही कोणतेही विशेषाधिकार नव्हते. कामगार आणि अधिकारी, मंत्री यांच्या पगारात भांडवलशाहीत जी मोठी तफावत होती ती काढून टाकली गेली. पॅरिस कम्युनमध्ये साधारण कामगार जनसमुदायच वास्तविक मालक व शासक होते. कम्युन असेपर्यंत जनसमुदाय मोठ्या प्रमाणात संघटित होते आणि सर्व महत्त्वाच्या राजकीय प्रश्नांवर लोक आपापल्या संघटनांमध्ये चर्चा करत असत.



कामगारानी कम्युनच्या रक्षणासाठी जागोजागी बॅरिकेड्स उभे करून सरकारी सेनेविरुध्द मोर्चे बांधणी सुरू केली. या मध्ये स्त्रिया अग्रभागी होत्या.



वीर कम्युनार्डांनी सेनेचा जबरदस्त मुकाबला केला. एका बॅरिकेड वर लढणारी स्त्री कामगार.

**4.** याच दरम्यान वर्साय मधील बादशहाचा मंत्री थियेर आणि त्याचे प्रतिक्रियावादी सरकार प्रशियाई अधिकाऱ्यांच्या सहाय्याने पॅरिस कम्युनवर आक्रमण करण्याची योजना आखत होते. या हल्यासाठी प्रशियाने हजारोच्या संख्येने कैद केलेल्या फ्रेंच सैनिकांना परत पाठवण्याचे मान्य केले. या सैनिकांना हत्यारबंद करून कामगारांविरुद्ध वापरण्यात येणार होते. प्रशिया आणि फ्रांसचे शासक जे एकमेकांच्या विरोधात युद्ध करत होते, ते कामगारांना चिरडण्यासाठी निर्लज्जपणे एकत्र झाले होते. दुसरीकडे, कम्युनार्ड पण आपली तयारी करत होते. रस्त्यांवर बॅरिकेड उभे केले गेले होते. स्त्रिया आणि पुरुषांनी मिळून ते उभे केले होते आणि ते स्वत: तैनातही झाले होते. परंतु ते संपूर्ण शहरावर ताबा नाही करू शकले. जे भांडवलदार लोक पॅरिस मध्ये राहत होते त्यांनी वर्सायला माहिती पाठवून दिली की शहरात कुठे-कुठे संरक्षण कमकुवत आहे आणि 22 ते 28 मे च्या दरम्यान सैन्य त्याच मार्गाने घुसले जेथे सुरक्षा व्यवस्था कमजोर होती.

**5.** हा एक रक्तरंजित आठवडा होता. कम्युनार्डांनी हिमतीने सामना केला. परंतु हल्लेखोर सैन्यासमोर त्यांना माघार घ्यावी लागली आणि पॅरिसच्या एका छोट्या हिश्श्यात शेवटी त्यांनी मोर्चा बांधला. आता प्रत्येक गल्ली युद्धाचं मैदान होती आणि प्रत्येक घर एक किल्ला. अशा भीषण हल्ल्यासमोर, ज्यामध्ये त्यांनी स्त्रिया व लहान मुले यांचे सुध्दा प्राण घ्यायचे सोडले नाहीत, थकलेले कम्युनार्ड माघार घ्यायला मजबूर होते. शहराच्या जळत्या अवशेषांमध्ये लढणाऱ्या हजारो कम्युनार्डांना अटक केली गेली, हजारोना तिथेच मारून टाकले गेले. अनेक हजारांना, ज्यामध्ये मुले, आजारी आणि वृद्ध लोक होते त्यांना हाकलत मोकळ्या जागेत आणले गेले व गोळ्या घातल्या गेल्या. वर्सायच्या माथेफिरू सेनेची प्रत्येक तुकडी खाटीक होती, आणि कम्युन सोबत सहानुभुती असल्याचा ज्याबद्दलही संशय होता त्या प्रत्येक व्यक्तीला ती मारून टाकत होती. कम्युनला तिच्याच रक्ताच्या थारोळ्यात बुडवले गेले. पॅरिसचे श्रीमंत लोक जे आता परत आले होते ते रस्त्यावर उभे राहून चालू असलेला घृणीत तमाशा बघत होते आणि या विजयासाठी स्वत:ची पाठ थोपटत होते.





कम्युन मध्ये भाग घेतलेल्या हजारो कामगारांवर खटला चालवण्याचे नाटक केले गेले. परंतु सगळे न्यायाधीश भांडवलदारांचेच लोक होते आणि खटल्याचा निकाल अगोदरच ठरलेला होता. हजारो कामगारांना मृत्युची शिक्षा दिली गेली किंवा देशाबाहेर तडीपार केले गेले.

**6.** सफेद दहशतवाद अनिर्बंध चालूच राहिला. हजारोंच्या संख्येने कम्युनार्डांना घेरून, 'पेरे लाशेज' स्मशानभूमीत आणि इतर डझनभर जागांवर नेऊन गोळ्या घातल्या गेल्या. भिंतींला टेकवून उभे करून निर्भय जनतेवर जेव्हा सेना गोळीबार करत होती तेव्हा पॅरिसच्या कामगाराचा मारेकरी जनरल गॅलीफेत तेथे उभा राहून तमाशा बघत होता. प्रेतांचे मोठ-मोठे ढीग लागले होते, ज्यात काही न मेलेले लोक सुद्धा होते... "कम्युनार्डांच्या भिंती"चा एक भाग अजूनही शिल्लक आहे. त्यावर चित्रित केलेले वीर कम्युनार्डांचे चेहरे भांडवलशाहीला आह्वान आहेत आणि कम्युनच्या शहीदांचे स्मारक पण आहेत. फक्त त्या एका आठवड्यात 40,000 कामगारांचे हत्याकांड झाले. यानंतर जे कम्युनार्ड वाचून निघू शकले होते, त्यांना शोधून परत आणले गेले व त्यांच्यावर खटला चालवण्याचे नाटक केले गेले. त्या सर्वांना अपराधी मानले गेले, आणि त्यांना गोळ्या घातल्या गेल्या किंवा फ्रांसच्या ताब्यातील दूरवरच्या बेटांवर तापाने, अतिशय कष्टाच्या कामाने आणि दुर्लक्षाने मरण्यासाठी पाठवले गेले.

7. कम्युनच्या जीवनकाळातच **कार्ल मार्क्स** ने लिहिले होते : **"कम्युनला नष्ट जरी केले तरी संघर्ष फक्त स्थगित होईल. कम्युनचे सिद्धांत शाश्वत आणि अनश्वर आहेत. जोपर्यंत कामगारवर्ग मुक्त होत नाही तो पर्यंत हे सिद्धांत सतत प्रकट होत राहतील"**. कामगारांचे पहिले हत्यारबंद बंड आणि पहिल्या कामगार वर्गाच्या सत्तेचे महत्त्व सांगताना मार्क्सने म्हटले होते, **"18 मार्चचे गौरवशाली आंदोलन मनुष्यजातीला वर्ग-शासनापासून कायमची मुक्ति देणाऱ्या महान सामाजिक क्रांतीची पहाट आहे."**



कम्युनला रक्ताच्या थारोळ्यात बुडवूनही भांडवलदार कधीही सुखाने बसू शकले नाहीत. कामगारांनी आपल्या साथीदारांच्या रक्ताच्या लाल झेंड्याला हातात घेऊन स्वातंत्र्य आणि न्यायाच्या जगासाठी आपली लढाई पुन्हा सुरू केली.

## लसींच्या नावाने फसवणूक सुरूच!

# अपुऱ्या लसीकरणा अभावी, ज्ञानाच्या मक्तेदारीपायी, देश संकटात!

पान 1 वरून

केंद्र सरकारने लसींची ऑर्डर नोंदवण्याचे कामच जानेवारी 2021 मध्ये चालू केले. अमेरिका आणि युरोपातील देशांनी हे काम एक वर्षभर अगोदर केले होते. इतकेच नाही तर आपल्या लोकसंख्येपेक्षा जास्त लसींची ऑर्डर या देशांनी नोंदवलेली होती. परंतु भारत सरकारने मात्र एप्रिल महिन्यापर्यंत फक्त 26 कोटी लसींची ऑर्डर नोंदवलेली होती. म्हणजेच प्रत्येकी दोन डोसच्या हिशोबाने फक्त 13 कोटी लोकांच्या लसीकरणाचे नियोजन होते. देशातील 45च्या वर वय असलेल्या लोकांची आणि 'फ्रंट लाईन वर्कर्स' म्हणजे करोना विरोधातील आघाडीचे काम करणाऱ्या डॉक्टर्स, नर्सेस, इत्यादी कामगारांची मिळून एकूण संख्या किमान 30 कोटी आहे. यांच्याकरिता आवश्यक असलेल्या 60 कोटी लसींची ऑर्डर सुद्धा मोदी सरकारने नोंदवलेली नव्हती. **अशातच 18च्या वर वय असलेल्या लोकांच्या लसीकरणाची घोषणा ही एका बाजूला लोकरंजकतेची घोषणा आहेत, सोबतच तुटवड्याच्या स्थितीला बिकट करून, लसींच्या खाजगी विक्रीद्वारे कंपन्यांना उपलब्ध करून दिलेली प्रचंड नफेखोरीची संधी आहे.** या सर्व काळात लस "ज्यांना हवी आहे त्यांना नाही, तर ज्यांना गरज आहे त्यांनाच" देण्याचे धोरण मोदी सरकारने जाहीर केले होते. अर्थातच गरज कोणाला आहे हे सरकारच ठरवणार होते. सार्वत्रिक लसीकरणाच्या गरजेबद्दल असलेली ही अनभिज्ञता अनायास नाही, तर पुरवठा मर्यादित ठेवून, लसीचे दर वाढवून नफ्याच्या वाढत्या दराच्या लालसेने वास्तवाकडे डोळेझाक करणाऱ्या भांडवली व्यवस्थेचे गुणवैशिष्ट्यच आहे.

150 रुपयात लस विकली तरीही नफा होईल असे सीरमचे मालक पूनावाला बोलले होते, पण आज लस 900 ते 1200 रुपयांना विकली जात आहे यावरून नफ्याचा अंदाज यावा. या संपूर्ण काळात जवळपास 6.6 कोटी लसी या कंपन्यांनी जगाला निर्यात केल्या. अगोदर मोदी सरकारने या 'निर्याती' वरून जगाला मदत करण्याचा आव आणला, परंतु आता अपुऱ्या लसींचे बिंग फुटल्यावर या पैकी मोठ्या संख्येने लसी कंपन्यांनी त्यांच्या व्यावसायिक हितांकरिता, थोडक्यात धंद्याच्या हिताकरिता-नफ्याकरिता-निर्यात केल्या हे मान्य करावे लागले आहे. कंपन्यांना लसी निर्यात कराव्या लागणार आहेत हे मोदी सरकारला माहितच होते, परंतु अगोदर जणू काही 'मानवतावादी' असल्याचे दाखवत असत्याचा ढोंगी वापर प्रतिमा निर्मितीसाठी केला गेला आणि लाखोंचे जीव जायला लागल्यावर सत्याचा वापर प्रतिमा टिकवण्याच्या केविलवाण्या प्रयत्नात होताना दिसत आहे.

लसीकरणाचे हे अपयश लपवण्यासाठी सुद्धा मोदी सरकारने लसीचा दुसरा डोस जो 4 आठवड्यांनी मिळणे अपेक्षित होते तो आता 4 महिन्यांवर पुढे ढकलला आहे. निश्चितपणे याच्या समर्थनात वैद्यकीय 'पुरावे' सुद्धा सरकारने दाखवलेच आहेत, परंतु लसींची अनुपलब्धतता हेच यामागचे मुख्य राजकीय कारण आहे हे लपलेले नाही.

**यापुढे जाऊन हे लक्षात घेतले पाहिजे की देशातील सर्व किंवा बहुसंख्य लोकांचे लसीकरण येत्या वर्षभरात तरी नक्कीच शक्य नाही.** देशातील कोव्हिड लस निर्मात्या सीरम कंपनीची लस निर्मिती क्षमता आहे महिन्याला 7 ते 10 कोटी लसींची. तसेच बायोटेक कंपनीची क्षमता आहे 7 कोटी लसींची. एकूण महिन्याला जास्तीत जास्त 17 कोटी लसीच बनू शकतात. त्यातही या कंपन्यांना ज्या विदेशी ऑर्डर्सची पूर्तता करायची आहे ती वेगळीच. देशाची लोकसंख्या आहे 135 कोटी. यापैकी 100 कोटी लोकांकरिताही जर प्रत्येकी 2 लसी म्हणजेच 200 कोटी लसी बनवायच्या झाल्या तर प्रस्थापित लस निर्मिती दराने त्याला किमान सव्वा वर्ष तरी नक्की जाणार. गेल्या वर्षभरामध्ये लसीकरण कारखाने उभे करणे, लसीचे ज्ञान




मुक्त करणे, कच्च्या मालाच्या उपलब्धतेसाठी प्रयत्न करणे या सर्व आघाड्यांवर काम न केल्यामुळेच आज ही स्थिती आहे की लसी उपलब्ध होणेच दुरापास्त झाले आहे.

लसीवाचून रोग पसरल्यानंतर, दुसऱ्या लाटेच्या अतिप्रचंड मोठ्या तडाख्यानंतर, लाखो लोकांचे तडफडत जीव गेल्यानंतर 'जाग' आलेल्या मोदी सरकारने आता जाहीर केले आहे की जगभरातून लसी विकत घेऊन, भारतातील काही कंपन्यांना लस उत्पादन वाढवायला लावून, जगातील लस कंपन्यांना भारतात तातडीने उत्पादनाचे परवाने देण्याची विनंती करून, अमेरिकेला साकडे घालून लस उत्पादन वाढवण्यासाठी कच्चा माल मिळवून, प्रस्थापित कंपन्यांची लस उत्पादन क्षमता वाढवण वगैरे मार्गांनी डिसेंबर पर्यंत तब्बल 216 कोटी लसी उपलब्ध करवणार. यामध्ये बाओलॉजिकल ई (30 कोटी लसी), झायडस कॅडिला (5 कोटी लसी) या कंपन्यांनी बनवलेल्या लसी, भारत बायोटेक (10 कोटी, नाकाद्वारे घेण्याचे व्हॅक्सिन) आणि सीरम इंस्टीट्यूट (20 कोटी नोव्होव्हॅक्स लस) ने बनवलेल्या इतर लसी, रशियाच्या स्पुटनिकचे 15 कोटी डोस, जेनोव्हाचे 6 कोटी डोस, तसेच जागतिक बाजारातून उपलब्ध होऊ शकतील अशा फायझर, मॉडर्ना, जॉनसन अँड जॉनसन च्या लसी सामील आहेत. निश्चितपणे आग लागल्यावर विहीर खोदली जात आहे, आणि एक नाही तर अनेक आणि प्रत्येक विहिरीला पाणी लागणारच अशी घोषणाही झाली आहे. असे झाले तर निश्चितच देशाच्या जनतेकरिता ते 'वरदान'च ठरेल. परंतु सर्व कंपन्यांना जगभरातून अगोदरच मोठ्या प्रमाणात ऑर्डर्स आहेत, आणि जगातील सर्वाधिक लस उत्पादन भारतात होत असतानाही भारतीय जनतेकरिता लसी कमीच आहेत कारण बनणाऱ्या लसींवर अगोदरच इतर देशांनी अधिकार स्थापित केला आहे. तेव्हा सध्यातरी मोदी सरकारची घोषणा हा अति-आशावादच दिसत आहे. लसीकरण केंद्रांच्या बाहेर लागणाऱ्या शेकडो लोकांच्या रांगा आणि उडणाऱ्या झुंबडी हेच सांगत आहेत की देशामध्ये लसींचा धंदा जोरात चालणार आहे.

फॅसिस्ट मोदी सरकारला जनतेच्या लसीकरणापेक्षाही तंत्रज्ञानाच्या वापराचा आणि त्याद्वारे प्रत्येक गोष्टीवर नियंत्रण ठेवण्याचा, माहितीवर पाळत ठेवण्याचा सोस जास्त आहे हे अनेकदा दिसून आले आहे. लसीकरणा करिताही 'कोव्हिन' या ॲप द्वारेच लसीकरण केले गेले पाहिजे या दुराग्रहापायी देशातील कोट्यवधी लोक जे मोबाईल, इंटरनेट आणि तंत्रज्ञानाच्या वापरात निष्णात नाहीत किंवा ज्यांच्याकडे सतत इंटरनेट वर बसण्याचा वेळ नाही असे लोक लसीकरणाच्या अगोदरच अतिदुर्लभ असलेल्या संधीपासून वंचित राहणार हे निश्चित. आजचे वास्तव हे आहे की ऑनलाईन 'स्लॉट' रिकामे दिसले नाहीत की 5 सेकंदाच्या आत ते भरलेले दिसतात. अशा प्रकारचा वेळ देऊ न शकणाऱ्यांमध्ये बहुसंख्या ही कामगार-कष्टकरी वर्गातून येणाऱ्या लोकांची, वृद्धांची, गैर-शहरी भागातील लोकांचीच असणार आहे आणि अशाप्रकारे देशातील उच्चभ्रूंनाच लस पहिल्यांदा उपलब्ध करून दिली जाणार आहे.

यापुढे जाऊन मोदी सरकारने केंद्रियरित्या लसींची खरेदी न करता प्रत्येक राज्याला आणि इतकेच नाही तर अगदी महानगरपालिकांना सुद्धा स्वत: लस खरेदी करण्यास भाग पाडले आहे. केंद्र सरकारने एकत्रितरित्या लसी विकत घेतल्या असत्या तरी बऱ्याच स्वस्तात एकत्र खरेदी होऊ शकली असती हे समजायला अर्थशास्त्रातील पदवीची गरज नाही. परंतु, देशाच्या 'एकतेचे' गीत रोज गाणाऱ्या आणि देशभक्तीचे पुरावे इतरांना मागणाऱ्या भाजप सरकारला देशातील विविध राज्यांमध्ये जनतेचे स्पर्धा लावूनच देशाची एकता सिद्ध करायची आहे असेच दिसते! या स्पर्धेचा परिणामी इतर काही नाही तर जागोजागी लसीच्या खरेदीत दलाली आणि लाच खाण्याची संधी उपलब्ध होणार, कंपन्यांना अजून जास्त नफेखोरीची संधी मिळणार आणि लसीकरण न झाल्याच्या गुन्ह्याचे खापर केंद्र-राज्य सरकारांनी एकमेकांच्या डोक्यावर फोडण्याची शर्यत लागणार आहे हे निश्चित. मुंबई आणि पुण्यासारख्या 'श्रीमंत' महानगरपालिका जागतिक टेंडरच्या माध्यमातून लसी घेऊ पहात आहेत. लातूर, उस्मानाबाद, गडचिरोली सारखे जिल्हे, सर्व तालुके, गावंखेडी इथल्या लोकांनी लसी कशा घ्याव्यात?

या सर्व महाभारतामध्ये एक गोष्ट स्पष्ट आहे की मोदी सरकारची, सर्व राज्य सरकारांची प्राथमिकता लस कंपन्यांच्या तुंबड्या भरण्याचीच आहे. नाहीतर जी लस केंद्र सरकारच्या पैशातून बनली आहे, जिच्या पेटंट मध्ये भारत सरकारची सुद्धा हिस्सेदारी आहे, त्या कोव्हॅक्सिन लसीची किंमत आज बाजारात रु. 1250 कशी?

लसीकरण संदर्भामध्ये जर जगभरातील जनतेचे सर्वाधिक मोठे नुकसान जर झाले असेल तर ते आहे लसीच्या ज्ञानावर पेटंट कायद्यांच्या माध्यमातून मोठमोठ्या कंपन्यांनी स्थापित केलेल्या मक्तेदारीमुळे. लस बनवणे कोणतेही अवघड काम नाही, आणि लसीचे ज्ञान मुक्त असते तर अगदी भांडवली चौकटीतही अनेक कंपन्यांनी लसी बनवून मोठ्या प्रमाणात सहज लसी बनल्या असत्या. परंतु आरोग्याचा आणि मानवी जीवाचा धंदा करणाऱ्या लस कंपन्यांपैकी कोणीही, अगदी भारत सरकारच्या गुंतवणुकीतुन तयार झालेल्या कोव्हॅक्सिनच्या भारत बायोटेक कंपनीनेही या बाबतीत पेटंट खुले केले नाही. थोडक्यात या कंपन्यांनी आपल्या मक्तेदारीच्या जीवावर मानवतेवर आलेल्या संकटातून खोऱ्याने पैसा कमावण्याची संधी साधली आहे. उशिरा लसीकरणामुळे काही लाख लोकांचे जीव गेले असतील तर ते ज्ञान मक्तेदारीचे रक्षण करणाऱ्या पेटंट कायद्यांनी केलेले खूनच म्हटले पाहिजेत.

ऐतिहासिक अनुभव हे सुद्धा सांगतो की लसीकरण जर कमी वेळेत पूर्ण नाही झाले, तर व्हायरसला रूप बदलून नवीन रूपात पसरण्याची मोठी संधी मिळते आणि अगोदर झालेले लसीकरण कुचकामी ठरून पुन्हा महामारीचे संकट, कदाचित अजून वेगाने, येऊ शकते. पुन्हा भयावह लाट येवो ना येवो, उशिरा होत असलेल्या लसीकरणाला फक्त मोदी सरकार जबाबदार आहे, आणि याची शिक्षा मात्र जीव गमावून देशवासी देत राहणार आहेत.

एकंदरीत लस कंपन्यांच्या नफ्याच्या रक्षणाकरिता जगभरातील भांडवली सत्तांनी, आणि भारतातील फॅसिस्ट मोदी सरकारने विशेष काळजी घेतली आहे हे स्पष्ट आहे. आरोग्याच्या क्षेत्रात लसींवरील पेटंटच्या खाजगी ज्ञानाची मक्तेदारी, आणि पैसेवाल्यांसाठीच असलेल्या आरोग्य सुविधा येत्या काळातही लोकांचे जीव घेतच राहतील आणि त्यासाठी भांडवली सरकारे नेहमीच रक्षकाच्या भुमिकेत सज्ज असतील. नफ्यासाठी चालणारी भांडवली उत्पादन व्यवस्थाच मानवद्रोही आहे ती यामुळे.

# तुमच्या धर्माचा ऱ्हास

पान 11 वरून

जो धर्म आपल्या आपल्या नावाने भावाचा खून करण्यास प्रेरित करतो, त्या धर्माचा सत्यानाश! जर माणसाने शेंडी कापून दाढी वाढवल्याने तो मुसलमान होत असेल आणि दाढी काढून शेंडी ठेवल्याने तो हिंदू वाटत असेल तर याचा अर्थ स्पष्ट आहे की हा भेद फक्त बाह्य आणि नकली आहे. एक चिनी मग तो बौद्ध असो वा मुसलमान, ख्रिश्चन असो वा कन्फ्युशियन, पण त्याची जात चीनीच राहते; एक जपानी मग तो बौद्ध असो वा शिंतो-धर्मी पण त्याची जात जपानीच राहते; एक इराणी मग तो मुसलमान असो वा पारशी, पण तो स्वत:साठी इराणी सोडून दुसरे नाव स्विकारायला तयार नाही. मग आपण हिंदी लोकांना धर्माच्या तुकड्यांमध्ये विभागायला तयार कसे आणि या अनैतिक कृत्याला आपण का सहन करावे?

धर्माच्या मूळाशी घाव घातला गेला आहे; आणि त्यामुळेच आता धर्मांचा मेळ घालण्याच्या गोष्टी कधीकधी कानावर पडतात. पण, हे शक्य आहे का? "मजहब नही सिखाता, आपस मे बैर रखना" (धर्म आपसात वैर शिकवत नाही) – या बेमालूम थापेला काय म्हणावे? जर धर्म वैर शिकवत नाही, तर शेंडी-दाढीच्या लढाईमध्ये आज हजार वर्षे हा देश पिडीत का आहे? जुना इतिहास सोडा, आज सुद्धा हिंदुस्तानाच्या शहरांमध्ये, गावांमध्ये एका धर्मावाल्याला दुसऱ्या धर्मवाल्याच्या रक्ताची तहान कोण लावत आहे? कोण गाय खाणाऱ्यांना लढवत आहे? खरी गोष्ट तर हीच आहे – "मजहब तो है सिखाता आपस मे बैर रखना । भाई को है सिखाता भाई का खून पीना ।" (धर्म तर आपसात वैर शिकवतो, भावाला भावाचे रक्त प्यायला शिकवतो). हिंदुस्तान्यांची एकता धर्मांच्या मेळाने नाही तर धर्मांच्या चितेवर होईल. कावळ्याला धुवून हंस बनवता येत नाही. कांबळं धूवून रंगवता येत नाही. धर्मांचा आजार नैसर्गिक आहे. त्याचा, मृत्यूशिवाय इलाज नाही.

एकीकडे तर हे धर्म एकमेकांच्या रक्ताला इतके तहानलेले आहेत. त्यांच्यापैकी प्रत्येक दुसऱ्याला शिक्षा सुनावत आहे. कपडे-लत्ते, खाणे-पिणे, बोली-वाणी, प्रथा-परंपरा अशा प्रत्येक बाबतीत एक दुसऱ्याच्या उलटा मार्ग धरतो. पण, जिथे गरिबांच्या शोषणाचा आणि धनिकांच्या स्वार्थाच्या रक्षणाचा प्रश्न येतो, तेव्हा मात्र दोघेही बोलतात. गाढव-गावचे महाराज मूर्खशिरोमणी बख्श सिंह सात पिढ्यांपासूनचे पहिल्या दर्जाचे मूर्ख आहेत. आज त्यांच्याकडे वर्षाला पन्ना लाखांची जमिनदारी आहे, जी मिळवण्यासाठी ना त्यांना कणभर अक्कल खर्च केली ना आपल्या बुद्धीच्या जोरावर ते तिला सहा दिवसही चालवू शकतात. ना ते आपल्या मेहनतीद्वारे जमिनीतून एक छटाक तांदूळ पैदा करू शकतात, ना एक कवडी गूळ. महाराज मूर्खशिरोमणी बख्श सिंह यांना जर तांदूळ, गहू, तूप, लाकडाच्या एका ढिगासह जंगलात एकटे सोडले तरी ना त्यांच्याकडे इतकी बुद्धी आहे ना त्यांना कोणते काम येते की ते आपले पोट भरू शकतील; सात दिवसात तडफडून ते तिथंच मरतील. पण आज गाढव-गावात तर महाराज महिन्याला दहा हजार रुपये मोटारगाडीच्या इंधनासाठी फुंकतात. वीस-वीस हजार रुपये जोडीचे कुत्रे त्यांनी पाळलेत. दोन लाख रुपये खर्च करून त्यांच्यासाठी महाल बनलेला आहे. त्यांच्यासाठी स्वतंत्र डॉक्टर आणि नोकर आहेत. उन्हाळ्यात त्यांच्या घरात बर्फाचे तुकडे आणि वीजेचे पंखे चालतात. महाराजांच्या खाण्यापिण्याची तर बातच निराळी आहे. त्यांचे नोकर सुद्धा दूधातुपाने तृप्त आहेत, आणि ज्या पैशांची ते उधळपट्टी करतात्, ते पैसे येतात कुठून? त्या पैशांना पैदा करणारे कसे जगतात? – ते तर दाण्या-दाण्याला मोताद आहेत. त्यांच्या मुलांना महाराज मूर्खशिरोमणी बख्श च्या कुत्र्यांचे उष्टे मिळाले तर ते स्वत:ला धन्य समजतील.


पण जर एखाद्या धर्मानुयायला विचारले की अशा मूर्ख माणसाला हातपाय न हलवता दुसऱ्याच्या कष्टाच्या कमाईला अशा वेडेपणाने उधळण्याचा काय अधिकार आहे, तर पुजारी म्हणतील – "अरे तो तर पूर्वजांची कमाई खातोय. ईश्वरानेच त्यांना मोठं बनवलंय. वेद-शास्त्र सांगतात की लहान-मोठं बनवणारा तर ईश्वर आहे. जर गरीब अन्नाच्या कणासाठी दारोदर भटकत असेल, तर ही ईश्वराने त्याला दिलेली शिक्षा आहे." जर एखाद्या मौलवी किंवा पादऱ्याला विचाराल तर उत्तर मिळेल – "तू काफिर आहेस का? नास्तिक तर नाही? गरीब-श्रीमंत हे तर जगाचा कारभार चालवायला ईश्वराने बनवलेत. ईश्वराच्या मर्जीमध्ये नाक खुपसण्याचा माणसाला काय अधिकार? गरिबाला ईश्वरी प्रसादच समजा. त्याची अधिनता आणि आज्ञाधारकता प्राप्त करा, सर्वनाशाच्या (कयामत) वेळी तुम्हाला याची मजुरी मिळेल." विचार जरा – जर विना मेहनतच महाराज मूर्खशिरोमणी बख्श सिंह पृथ्वीवरच स्वर्गसूख भोगत आहेत, तर अशा 'दिव्याखाली अंधार' दरबारात अधिनता आणि आज्ञाधारकतेने काही होण्याची आशा कशी असेल?

बावळट-शहराचे नवाब नामाकूल खान सुद्धा बरेच जुने धनाढ्य आहेत. त्यांची सुद्धा जमिनदारी आहे आणि ऐयाशीत तर ते मूर्खशिरोमणी बख्श सिंहापेक्षा कमी नाहीत. त्यांच्या शौचालयाच्या भिंतींवर अत्तर शिंपडले जाते आणि गुलाबपाण्याने त्याला धुतले जाते. सुंदर आणि आकर्षक स्त्रियांना फसवून आणण्यासाठी तर त्यांची शेकडो माणसं देशविदेशात फिरत राहतात. या पऱ्या एकाच मुलाखतीत त्यांना शिळ्या वाटू लागतात. कैक हकीम, डॉक्टर आणि वैद्य त्यांच्यासाठी शक्तिवर्धक औषधं, रसायनं तयार करत राहतात. दोन-दोन वर्ष जुनी दारू पॅरिस आणि लंडनच्या तळघरांमधून मोठी रक्कम मोजून मागवून ठेवली जाते. नवाब-बहादुरांचा तळवा तर इतका लाल आणि मुलायम आहे की इंद्राच्या पऱ्यांची जीभही नसेल. यांच्या पाशवी कामवासनेच्या तृप्तीसाठी कित्येक नवऱ्यांना तलवारीखाली जावे लागले आहे, कितीतरी पित्यांना खोट्या खटल्यांमध्ये तुरुंगात सडवले गेले आहे. वर्षाला साठ लाख उत्पन्नही त्यांच्यासाठी पुरेसे नाही. दरवर्षी पाच-दहा लाख रूपये कर्ज चढतेच. यांना G.C.S.I., G.C.I.E., फर्जिंद-खास फिरंग (इंग्रजांचे खास लाडके) इत्यादी मोठमोठ्या उपाध्या सरकार कडून मिळाल्या आहेत. व्हाईसरॉयच्या दरबारात सर्वात पहिली खुर्ची यांची असते आणि त्यांच्या स्वागतामध्ये व्याख्यान देण्याचे आणि अभिनंदन पत्र वाचण्याचे काम बावळट-शहराचे नवाब-बहादुर आणि गाढव-गावाचे महाराज बहादूर यांना मिळते. छोटे आणि मोठे अधिकारी या दोन्ही धनाढ्य उमरावांच्या बुद्धीचे, काम करण्याच्या योग्यतेचे आणि जनतेच्या पालनपोषणाचे कौतुक करताना थकत नाहीत.

नवाब-बहादुरांच्या ऐश्वर्याला खुदाची देणगी आणि कर्माचे फळ म्हणणाऱ्या पंडित, मौलवी, पुरोहित आणि पादऱ्यांचे एकमत आहे. रात्रंदिवस आपसात तसेच आपल्या अनुयायांमध्ये रक्तपाताचा बाजार तेजीत ठेवणारे, अल्ला आणि ईश्वर इथे मात्र एकमत असतात. वेद आणि कुराण, इंजिल आणि बायबल मध्ये याबद्दल फक्त एक शिक्षा आहे. या रक्तशोषक परजीवींच्या स्वार्थांचे रक्षणच जणू या धर्मांचे कर्तव्य आहे. आणि मेल्यानंतरही वैकुंठात आणि स्वर्गात सर्वात चांगले महाल, सर्वात सुंदर बगीचे, सर्वात सुंदर डोळ्यांच्या पऱ्या आणि अप्सरा, सर्वात चांगले मद्य आणि मधाचे प्रवाह बावळट-शहराचे नवाब-बहादुर आणि गाढव-गावाचे महाराज आणि त्यांच्या भाऊबंदांसाठी राखीव आहेत, कारण त्यांनी दोन-चार मशिदी, दोन-चार मंदिरं बनवले आहेत; काही साधू-फकिर आणि ब्राह्मण-मुजावर रोजच त्यांच्याकडे श्रीखंड-पुरी, कबाब-पुलावावर ताव मारत असतात.

गरिबांची गरीबी आणि दारिद्र्याच्या जीवनात काहीच बदलत नाही. हो, जर ते दर एकादशीला उपवास, प्रत्येक रमजानचे रोझे आणि सर्व तीर्थयात्रा, हज-जियारतच्या यात्रा न थांबता आणि काटेकोरपणे करत राहिले, स्वत:च्या पोटाला चिमटा घेऊन ब्राह्मण-मुजावरांचे पोट भरत राहिले, तर त्यांनाही जन्नत आणि वैकुंठाच्या कोणत्या तरी कोपऱ्यातील खोली आणि उरल्या-सुरल्या पऱ्या-अप्सरा मिळतील. गरिबांना फक्त या स्वर्गाच्या आशेवर आपले जीवन घालवायचे आहे. पण ज्या स्वर्ग-जन्नतच्या आशेवर आयुष्यभर दु:खाचे डोंगर चढायचे आहेत, त्या स्वर्ग-जन्नतचे अस्तित्वच आज विसाव्या शतकाच्या भूगोलात कुठे नाही. अगोदर पृथ्वी चपटी होती. स्वर्ग तिच्या उत्तरेकडील सात पर्वतांच्या आणि सात समुद्रांच्या पल्याड होता. आज ना चपट्या पृथ्वीचा पत्ता आहे ना उत्तरेकडील सात पर्वत आणि सात समुद्रांचा. ज्या सुमेरू पर्वतावर इंद्राच्या अमरावती क्षिरसागरात शेषावर पहुडलेला देव होता, ती आता फक्त मुलांचे मन रमवणारी गोष्ट उरली आहे. ख्रिश्चन आणि मुसलमानांच्या जन्नतसाठी सुद्धा त्याच वेळच्या भुगोलात स्थान होते. आजकालच्या भुगोलाने तर त्यांच्या मुळावरच घाव घातला आहे. मग त्या आशेवर लोकांना उपाशी ठेवणे दगाबाजी नाही काय?

# दुर्घटना नाही हत्याकांडाचे सत्र आहे हे!



पान 2 वरून

महामारीला तोंड देत दोनहात करत असतांना उपलब्ध डॉक्टर, नर्स, सफाई कर्मचारी, वार्ड बॉय असे अनेक कर्मचारी अतिरिक्त कामाच्या दबावाखाली काम करत असल्याने वाढलेला कामाचा भार मानसिक ताणतणाव वाढवणारच, त्यामुळे चुका होण्याच्या शक्यता नाकारता येत नाहीत. खाजगी हॉस्पिटल्स मध्ये तर मालकांचा नफा वाढवण्यासाठी 12 तासांपेक्षाही जास्त काम करवले जाणे नेहमीचे आहे. निश्चितच या चुकामागे कारणीभूत असलेल्या तात्कालिक मानवी चुका शोधून त्यावर कारवाई झालीच पाहिजे, सर्व दोषी पदाधिकारी, अधिकाऱ्यांवर कारवाई झालीच पाहिजे पण अशात विसरता कामा नाही की, या सर्व घटनामागे मानवी चुका कमी आणि नफ्यावर आधारित व्यवस्थेने घेतलेले बळी याचे परिणाम जास्त आहेत.

आज कामगार वर्गाने, न्यायप्रिय जनतेने या घटनांच्या मुळाशी जाऊन विचार केला पाहिजे. ज्या देशात पंचतारांकित हॉटेल सारख्या रुग्णालयांना धंद्याचा मुक्त परवाना दिला जातो, जिथे डॉक्टरांना मनमर्जी फी घेऊन लूट करण्याची परवानगी आहे. जिथे औषध कंपन्या कैक पटीने नफा कमावतात आणि चाचण्या (टेस्टिंग) औषधांमध्ये कमिशनखोरी शिवाय चालणारे दवाखाने नावालाही सापडत नाहीत, तिथे सरकारने खाजगी उद्योगांच्या चरण्याचे कुरण बनवले आहे, जिथे देशातील 90 टक्के गरीब कामगार- कष्टकरी इलाजावाचून मरण्याला हतबल आहेत, जिथे रुग्णालयात नफा वाढवण्यासाठी कर्मचाऱ्यांकडून रोज 10-12-14 तास काम करून घेतले जाते, जिथे आरोग्य सुविधेवर 1 टक्के पैसा सुद्धा केला जात नाही, जिथे सर्व आरोग्य व्यवस्थाच नफ्यासाठी चालत आहे, प्रत्येक व्यक्तीला आरोग्य सुविधा पुरवणे जेथे सरकारचे कर्तव्यच मानले जात नाही, खाजगी रुग्णालयाचा धंदा चालावा म्हणून सार्वजनिक आरोग्य व्यवस्था मोडकळीस काढली जात आहे, तेथे हॉस्पिटल्स मध्ये होणारे अपघात हा अपवाद नाही तर व्यवस्थेचा भागच आहे!

संपूर्ण व्यवस्थेवर मक्तेदारी असलेल्या मुठभर धनदांडग्यांच्या नफ्याच्या गणितानुसार चालणाऱ्या भांडवली तंत्रामध्ये सामान्य कष्टकरी जनतेला कोणतीच जागा शिल्लक राहिली नव्हती. करोना महामारीने आरोग्य व्यवस्थेच्या पोखरलेल्या यंत्रणेचे पितळ उघडे पाडले आहे. आग लागून झालेले अपघात हे अजून काही नाही, तर नफ्याने पोखरलेल्या यंत्रणेचे अधूनमधून दिसणारे भीषण वास्तव आहे!

# तुमच्या धर्माचा ऱ्हास

✍ राहुल सांकृत्यायन

तसे तर धर्मांमध्ये आपसात मतभेद आहेत. एक पूर्वेकडे तोंड करून पूजा करा सांगतो तर दुसरा पश्चिमेकडे. एक डोक्यावर केस वाढवायला सांगतो, तर दुसरा दाढी. एक मिशी कापायला सांगतो, तर दुसरा सांगतो मिशी ठेवा. एक म्हणतो जनावराचा गळा रगडून कापा, तर दुसरा सांगतो एका झटक्यात् मुंडी साफ करा. एक कुडत्याचा गळा उजवीकडे ठेवतो, तर दुसरा डावीकडे. एक शिवाशीवीचा कोणताही विचार बाळगत नाही, तर दुसऱ्याकडे प्रत्येक जातीची चूल वेगळी. एक खुदा शिवाय दुसऱ्या कोणाचे नावही जगात राहू देऊ इच्छित नाही, तर दुसऱ्यांकडे देवतांची गणती संपत नाही. एक गाईचे रक्षण करायला सांगतो, तर दुसरा तिच्या बळीचे पुण्य मानतो.

याच प्रकारे जगात सर्व धर्मांमध्ये बरेच मतभेद आहेत. हे मतभेद फक्त विचारांपुरते मर्यादित नाही राहिले, तर गेल्या दोन हजार वर्षांचा इतिहास सांगतो की या मतभेदांमुळे धर्मांनी एकमेकांवर अनन्वित अत्याचार केलेत. ग्रीस आणि रोमच्या अमर कलाकारांच्या रचनांचा आज अभाव का दिसतो? यामुळेच की तिथे एक असा धर्म आला जो अशा मूर्तींना स्वत:च्या अस्तित्वासाठी धोका मानत होता. इराणच्या ऐतद्देशीय कला, साहित्य, संस्कृतीला नामशेष का व्हावे लागले? - कारण, तिथे अशा एका धर्माशी गाठ पडली जो मानवतेचे नावच धरतीवरून संपवू पहात होता. मेक्सिको आणि पेरू, तुर्कस्तान आणि अफगाणिस्तान, इजिप्त आणि जावा - कुठेही पहा, धर्मांनी स्वत:ला कला, साहित्य, संस्कृतीचा शत्रूच सिद्ध केले आहे. आणि रक्तपात? त्याचे तर विचारूच नका. आपापल्या खुदा आणि ईश्वराच्या नावावर, आपापल्या पुस्तकांच्या आणि पाखंडाच्या नावावर यांनी माणसाच्या रक्ताला पाण्यापेक्षाही स्वस्त करून दाखवले. जर जुन्या ग्रीक धर्माच्या नावावर निर्दोष ख्रिश्चन आबालवृद्ध, स्त्री-पुरुषांना सिंहापुढे फेकणे, तलवारीने कापून काढणे मोठ्या पुण्याचे काम समजत होते, तर हातात अधिकार आल्यावर ख्रिश्चनांनी तरी मागे का रहावे? येशू ख्रिस्ताच्या नावावर त्यांनी खुलेपणाने तलवारीचा वापर केला. जर्मनीत लोकांना मानवतेमध्ये आणण्यासाठी जणू हत्याकांडच घडवले गेले. जुने जर्मन ओक वृक्षाची पूजा करत. त्या ओकने त्यांना पथभ्रष्ट करू नये याकरिता आसपासच्या वस्त्यांमध्ये एकही ओक राहू दिला नाही. पोप आणि पेत्रयार्क, इंजिल आणि येशूच्या नावावर प्रतिभावान लोकांच्या विचार-स्वातंत्र्याला आग आणि लोखंडाच्या सहाय्याने दडपत राहिले. थोड्याश्या मतभेदामुळे किती तरी लोकांची मुंडी छाटली गेली, किती तरी लोकांना जिवंत जाळले गेले. हिंदुस्तानाची भूमी सुद्धा अशा धर्मांधतेला कमी बळी पडलेली नाही. इस्लाम येण्याअगोदर सुद्धा काय मंत्र म्हणणाऱ्या आणि ऐकणाऱ्यांच्या तोंडात आणि कानात शिसे आणि लाख ओतली नव्हती? शंकराचार्या सारखा माणूस - सर्व शक्तिनिशी गळा फाडून ओरडत होता की सर्वकाही ब्रह्म आहे, ब्रह्मापेक्षा भिन्न ते सर्व असत्य आहे, त्यापासून ते रामानुजापर्यंत आणि इतर तत्वज्ञानाचे प्रवाह सुद्धा तोंडी जमाखर्चापुढे गेले नाहीत, उलट सर्वशक्तिनिशी शूद्र आणि दलितांना दाबून ठेवण्यात त्यांनी कोणतीही कसर सोडली नाही. इस्लाम आल्यानंतर तर हिंदू-धर्म आणि इस्लाममधले रक्ताळलेले झगडे आजवर चालत आलेत. त्यांनी तर आपल्या देशाला नरक बनवले आहे. म्हणतात की इस्लाम तर शक्ती आणि विश्वबंधुत्वाचा धर्म आहे, हिंदु धर्म ब्रह्मज्ञानाचा आणि सहिष्णुतेचा धर्म आहे; पण या दोन्ही धर्मांनी आपल्या या दाव्यांना वास्तवात उतरवून दाखवले का? हिंदू मुसलमानांना दोष देतात की ते निर्दोषांचे खून करतात; आमच्या मंदिरांना आणि पवित्र तीर्थांना नष्ट करतात; आमच्या स्त्रिया पळवून नेतात. पण, झगड्यांमध्ये काय हिंदू निर्दोषांचे खून करत नाहीत? तुम्ही कानपूर चे हिंदू-मुस्लिम झगडे घ्या, किंवा बनारस वा अलाहाबाद वा आग्र्याचे, तुम्हाला दिसेल की सगळीकडे हिंदू-मुस्लिमांच्या चाकू आणि लाठ्यांना बळी पडलते ते निरपराध, अज्ञात स्त्री-पुरुष, आबालवृद्ध. गावातला किंवा गल्लीतला एखादा कमनशिबी व्यक्ती चुकून त्या रस्त्याने जावा आणि कोणीतरी मागून सुरा भोसकून पसार व्हावे. सर्व धर्म दयेचा दावा करतात, पण हिंदुस्तानातील या धार्मिक झगड्यांना पहाल तर तुम्हाला समजेल की मानवताच इथे आसरा मागत आहे. नि:शस्त्र म्हातारे आणि म्हाताऱ्याच नाहीत तर छोटी-छोटी मुलंही मारली जातात. आपल्या धर्मांच्या शत्रूंना जळत्या आगीत फेकण्याचे प्रसंग आजही बघायला मिळतात.



एक देश आणि एक रक्त मनुष्यांना भाऊ-भाऊ बनवतात. रक्ताचे नाते तोडणे अस्वाभाविक आहे, परंतु हिंदुस्तानात काय दिसून येते? हिंदूंच्या सर्व जातींमध्ये, मग सुरुवातीला काही का असेना, आज तर एकच रक्त वहात आहे; चेहरा पाहून तुम्ही सांगू शकत नाही की हा ब्राह्मण आहे आणि तो शूद्र. कोळशापेक्षाही काळे ब्राह्मण तुम्हाला लाखोंच्या संख्येने सापडतील. आणि शूद्रांमध्येही गव्हाळ रंग वाल्यांचा अभाव नाही. जवळपास राहणाऱ्या स्त्री-पुरुषांचे लैंगिक संबंध, जातींनी कितीही बंधने आणली तरी, नेहमीच घडत असतात. कितीतरी धनिक खानदानांबद्दल, राजवंशांबद्दल तर लोक स्पष्टच बोलतात की दासाच पोर राजा आणि दासीचा पोर राजपुत. असे असूनही हिंदू धर्माचे लोक हजारो जातींमध्ये विभागलेले आहेत. कितीतरी हिंदू, हिंदू नावावर जातीय एकता स्थापित करू पाहतात. पण, ती हिंदू जातीय़ता आहे कुठे? हिंदू जात तर एक काल्पनिक शब्द आहे. अरे अस्तित्वात आहेत ते ब्राह्मण – ब्राह्मणच नाही तर शाकद्विपी, सनाढ्य, जुझौतिया – राजपूत, खत्री, भुमिहार, कायस्थ, चांभार, इत्यादी. — . एका राजपूताचे खाणे-पीणे, लग्न-श्राद्ध हे आपल्याच जातीपुरते मर्यादित असते. त्याचे सामाजिक विश्व त्याच्या जातीपुरतेच मर्यादित आहे. म्हणूनच एखादा राजपूत जेव्हा मोठ्या पदावर पोहोचतो, तेव्हा तो नोकरी लावणे, वशिला लावणे किंवा इतर मार्गांनी सर्वात अगोदर आपल्या जातीच्या माणसाला फायदा पोहचवू बघतो. हे तर स्वाभाविकच आहे. जेव्हा दिवसरात्र जगण्या-मरण्यात संबंध ठेवणारे फक्त आपल्याच बिरादरीचे लोक आहेत, तर नजर दूरवर जाईलही कशी?

म्हणायला तर हिंदूंवर टीका करत इस्लाम म्हणतो की आम्ही जाती-पातीची बंधने तोडली. इस्लाम मध्ये येताच सर्व भाऊ-भाऊ होतात. पण हे खरे आहे का? असे असते, तर आज मोमिन (विणकर), अप्सार (पिंजारी), राईन (काची) इत्यादींचा प्रश्न उपस्थित झाला नसता. अर्जल आणि अशरफ शब्द कोणाच्या तोंडावर आले नसते. सैयद-शेख, मलिक-पठाण आपल्यापेक्षा खालच्या जातींबद्दल तसाच विचार करतात जसे उच्चजातीय हिंदू. खाण्याच्या बाबतीत शिवाशीव कमी आहे, आणि आता तर ती हिंदूंमध्येही कमी होत चालली आहे. पण प्रश्न तर आहेच की – सांस्कृतिक आणि आर्थिक क्षेत्रात इस्लाममधील वरच्या जातींनी खालच्या जातींना पुढे येण्याची संधी कधी दिली का? धार्मिक नेता असेल तर शाही दरबार आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये सर्व जागा वरच्या जातींसाठीच आरक्षित राहिल्या. जमिनदार, तालुकदार, नवाब सर्वच वरच्या जातींचे आहेत. हिंदुस्तानातील चार-पाच कोटी लोकांनी हिंदूंच्या सामाजिक, आर्थिक, आणि धार्मिक अत्याचारांपासून सुटकेकरिता इस्लामचा आसरा घेतला. पण, इस्लाम मधील वरच्या जातींनी काय त्यांना बहरू दिले? सातशे वर्षांनंतरही आज गावचा मोमिन जमिनदारांचा आणि मोठ्या जातींच्या जुलमाचा तसाच शिकार आहे, जसा त्याचा कानू वा कुर्मी जातीचा शेजारी. हिंदूंशी भांडून इंग्रजांचे पाय चाटून कौन्सिल मधील जागा, सरकारी नोकऱ्यांमध्ये जागा यांनी आपल्यासाठी सुरक्षित करून घेतल्या आहेत. पण जेव्हा त्या जागांच्या वितरणाचा प्रश्न उभा राहतो, तेव्हा त्यातील बहुतांश सर्वच जागा वरच्या जातीचे सैयद आणि शेख आपल्या हातात घेतात. साठ-साठ, सत्तर-सत्तर टक्के लोकसंख्या असलेल्या मोमिन आणि अंसार जाती तोंड बघत राहतात. बहाणा काय केला जातो तर त्यांच्यामध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. पण सातशे आणि हजार वर्षांनंतरही जर शिक्षणाच्या संधीमध्ये ते इतके पिछाडलेले असतील तर त्याचा दोष कोणावर आहे? त्यांना कधी शिकायची संधी दिली गेली? जेव्हा शिकण्याची वेळ आली, शिष्यवृत्ती देण्याची वेळ आली, तेव्हा तर सगळे लक्ष आपल्या भाऊबंदांकडेच दिले गेले. मोमिन आणि अन्सार, आचारी आणि चपरासी, सेवक आणि हुक्कासेवकाच्या कामासाठीच तर आहेत. त्यांच्यापैकी कोणी शिकला जरी, तरी त्याच्या वशिल्यासाठी आपल्या जातीत तसा प्रभावशाली व्यक्ती पण कोणी नाही; आणि बाहेर वाले आपल्या भाऊबंदकीला सोडून त्याला का भाव देतील? नोकऱ्या आणि पदांसाठी इतकी धावपळ, इतका मनस्ताप फक्त जातीच्या आणि देशाच्या सेवेसाठीच नाहीये, ती आहे रुपयांसाठी, सन्मानाच्या आणि आरामाशीर जीवनासाठी.

हिंदू आणि मुसलमान वेगवेगळे धर्म असल्यामुळे काय त्यांची जात वेगळी होऊ शकते? ज्यांच्या नसांमध्ये त्यांच्याच पूर्वजांचे रक्त वहात आहे, जे याच देशात पैदा झाले आणि वाढले, मग दाढी आणि शेंडी, पूर्व आणि पश्चिमची नमाज (प्रार्थना) काय त्यांना वेगळा समुदाय सिद्ध करेल? रक्त पाण्यापेक्षा घट्ट नसते का? मग हिंदू आणि मुसलमानाच्या फरकाने बनलेल्या या वेगवेगळ्या जातींना हिंदुस्तानाबाहेर कोण स्विकार करते? जपान मध्ये जा किंवा जर्मनीत, इराणला जा किंवा तुर्कस्तानात, सगळीकडे आपल्याला हिंदी किंवा 'इंडियन' असेच बोलावतात. जो धर्म भावापासूनच दुरावतो, अशा धर्माचा धिक्कार!

पान 10 वर

### लेखकाचा परिचय

राहुल सांकृत्यायन (1893-1963) खऱ्या अर्थाने जनतेचे लेखक होते. ते आजच्यासारख्या तथाकथित प्रगतिशील लेखकांसारखे नव्हते, जे जनतेच्या जीवन आणि संघर्षापासून अलिप्त राहून आपापल्या महालांमध्ये बसून कागदावर प्रकाश टाकत असतात. जनतेच्या संघर्षाचे मोर्चे असोत वा सरंजामदार-जमीनदारांच्या शोषण-दमनाच्या विरुद्ध शेतकऱ्यांच्या संघर्षाचा लढा असो, ते नेहमीच पहिल्या फळीत उभे राहिले. अनेक वेळा तुरुंगात गेले, यातना सहन केल्या. जमीनदारांच्या भाडोत्री गुंडांनी त्यांच्यावर प्राणघातक हल्लासुद्धा केला, परंतु स्वातंत्र्य, समानता आणि मानवी स्वाभिमानासाठी ते ना कधी संघर्षातून मागे हटले आणि ना कधी त्यांची लेखणी थांबली.

जगभरातील 26 भाषा अवगत असलेल्या राहुल सांकृत्यायन यांच्या अचाट बुद्धीचे अनुमान यावरूनसुद्धा लावता येऊ शकते की, ज्ञान-विज्ञानाच्या अनेक शाखा, साहित्याच्या अनेक प्रकारांमध्ये त्यांनी हातोटी मिळवली होती. इतिहास, तत्वज्ञान, पुरातत्वशास्त्र, मानववंशशास्त्र, साहित्य, भाषा-विज्ञान इ. विषयांवर त्यांनी अधिकारवाणीने लेखन केले. बौद्धिक गुलामी, तुमचे अध:पतन, पळू नका-जगाला बदला, तत्वज्ञान-संदर्भ, मानवसमाज, वैज्ञानिक भौतिकवाद, जय यौधेय, सिंह सेनापती, साम्यवादच का?, बावीसावे शतक इ. रचना त्यांच्या महान प्रतिभेची ओळख स्वत:हूनच करून देतात.

राहुल देशातील दलित-शोषित जनतेला हर-तऱ्हेच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी लेखणीचा हत्यारासारखा वापर करायचे. त्यांचं म्हणणं होतं की, "साहित्यकार जनतेचा जबरदस्त सहकारी, सोबतच तो त्यांचा नेता (पुढारी) आहे. तो सैनिक आहे आणि सेनापतीसुद्धा."

राहुल सांकृत्यायन यांच्यासाठी जीवनाचं दुसरं नाव गती होतं आणि मरण किंवा स्तब्धतेचं दुसरं नाव होतं साचलेपणा. यामुळेच अगोदरच तयार असलेल्या मार्गावर चालणे त्यांना कधीही आवडले नाही. ते नव्या मार्गाचे संशोधक होते. परंतु फिरणे म्हणजे त्यांच्यासाठी फक्त भूगोलाची ओळख करून घेणे नव्हते. ते सुदूर देशांतील जनतेचं जीवन आणि त्यांच्या संस्कृतीशी, त्यांच्या जिजीविषेशी ओळख करून घेण्यासाठीचं फिरणं होतं.

समाजाला मागे ढकलणाऱ्या हरतऱ्हेच्या विचार, रुढी, मूल्ये, मान्यता-परंपरांच्या विरुद्ध त्यांचे मन अतिशय तिरस्काराने भरलेले होते. त्यांचं संपूर्ण जीवन आणि लिखाण याविरुद्ध विद्रोहाचं जित-जागतं उदाहरण आहे. यामुळेच त्यांना महाविद्रोहीसुद्धा म्हटले जाते. राहूल यांची ही वेगळी रचना आजसुद्धा आपल्या समाजातील प्रचलित रुढी-परंपरांच्या विरुद्ध तडजोड विहीन संघर्षाची आरोळी आहे.

# धनिक शेतकरी आंदोलनाचे वर्गचारित्र्य उघड करणाऱ्या काही घटनांचे विश्लेषण

पान 5 वरून

इतर 32 संघटनांनी त्याच्या पुढच्याच दिवशी, 11 डिसेंबर रोजी तातडीने बैठक घेऊन वक्तव्य दिले की आमची मागणी केवळ शेतीविषयक दुरुस्त्या रद्द करण्याची आहे. त्यानंतर अनेक संघटनांच्या नेत्यांनी असेदेखील म्हटले की एकता - उग्राहाने केलेल्या निदर्शनांमुळे आंदोलनाचे नुकसान झाले आहे !

गाझीपूर बॉर्डरवर असलेल्या आंदोलनस्थळी जामिया मिलिया इस्लामिया ह्या दिल्लीतील विद्यापीठातील काही विद्यार्थी डफ़ली इत्यादी घेऊन आंदोलनाचे समर्थन करायला गेल्यावर तेथील आंदोलनाच्या नेत्यांनी ह्या विद्यार्थ्यांना आंदोलनातून चक्क परत पाठवले ! वर ह्या घटनेवर कोणतेही स्पष्टीकरण संयुक्त किसान मोर्चाने दिलेले नाही.

धनिक शेतकऱ्यांच्या वाहात संस्कृतीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या ह्या आंदोलनाची सांस्कृतिक बाजू देखील मोठ्या प्रमाणात प्रतिगामी असल्याचे दिसून येते. प्रत्येक गाण्यात स्त्रियांच्या वस्तूकरणाचे नवे उच्चांक गाठणारे, बंदुका, उधळपट्टी, दारू-गांजा-नशेबाजी, अत्यंत अर्वाच्य शब्द देखील सहजपणे प्रत्येक कडव्यात वापरणारी गाणी गाणारे हनी सिंह, बब्बू मान, सिद्दु मूसेवाला इत्यादी गायक ह्या आंदोलनाच्या समर्थनात उतरले आहेत, व अनेक आंदोलनस्थळीदेखील ह्यांचीच गाणी वाजवली जातात. ह्या गायकांची इतर गाणी ऐकल्यास माणूस असण्याचीच लाज वाटू शकते. शेतकरी आंदोलनाकरिता ह्यांनी लिहिलेल्या गाण्यांमध्येसुद्धा जमीन, गाड्या, ट्रॅक्टर, इत्यादि ह्यांची मालकी असण्याचा गर्व, जाट, चौधरी, इत्यादी जातींचा गर्व अशा अनेक घृणास्पद गोष्टी भरलेल्या आहेत. आंदोलनस्थळी बर्गर-पिझ्झा पासून गोडा-धोडाची रेलचेल आहे. बड्या शेतमालकांच्या परदेशस्थ दुसऱ्या पिढीने भरघोस देणग्या पाठवलेल्या आहेत. अनेक महिने आंदोलन चालू ठेवण्याची रसद घेऊनच आंदोलक शेतकरी घेऊन निघालेले आहेत.

### राकेश टिकैतचे वास्तव

आंदोलनात प्रकाशझोतात आलेल्या आणि भांडवली मीडियाने सतत या आंदोलनाचे प्रमुख नेते म्हणून प्रकाशझोतात आणलेल्या राकेश टिकैत व त्यांच्या भारत किसान युनियन संघटनेचा इतिहास देखील जाणून घेणे ह्या पार्श्वभूमीवर गरजेचे आहे.

2013 मध्ये मुजफ़्फ़रपूर मध्ये झालेल्या धार्मिक दंगलींमध्ये भारतीय किसान युनियनची भुमिका महत्त्वाची होती. भाजपामधील अनेक नेत्यांबरोबर मंचावरून राकेश टिकैतचे भाऊ व भारतीय किसान युनियनचे राष्ट्रीय अध्यक्ष नरेश टिकैत ह्यांनी अत्यंत भडकाऊ भाषण दिले होते, व दंगल भडकवण्यात त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे होते. हा सर्व इतिहास जणु काही घडलाच नाही इतक्या शिताफीने विसरून सर्व तथाकथित "कम्युनिस्ट" पक्ष व त्यांच्या युनियन ह्या आंदोलनाचे समर्थन करत आहेत.

इतकेच नव्हे, नरेश टिकैत ह्यांनी ह्याच वर्षी फ़ेब्रुवारीत अयोध्येच्या विवादित राम मंदिरात जाऊन रामाचे दर्शन घेतले व सरकारला सुबुद्धी देण्याची प्रार्थना केली! समाजातील कोणत्या वर्ग समुदायाला समोर ठेवून टिकैत यांनी असे केले? मुज़फ़्फ़रपूर दंगलीत मुसलमानांवर हिंसा करण्यास उद्युक्त करणारी भाषणे देणारे टिकैत हे देशभरातील हिंदू-मुस्लिम तेढ शिगेला नेणाऱ्या अयोध्येच्या राम मंदिरात जाऊन दर्शन घेतात, आणि "मोदींना न दुखवण्याचे" आश्वासन देतात, ह्यात आश्चर्याचे काहीच नाही, यातून केवळ नरेश टिकैत आणि त्यांच्या संघटनेचे राजकीय चारित्र्य उघडे पडते.

2019 मध्ये, निवडणूकीच्या अगोदर राकेश टिकैत व भारतीय किसान युनियनने दहा मागण्या घेऊन शेतकऱ्यांचा मोठा मोर्चा काढला होता, व आतासारखाच दिल्लीला वेढा घालण्याचा त्यांचा मानस होता. इतर अनेक युनियन व संघटनांनीदेखील ह्या मोर्चाला पाठिंबा दिला होता. परंतु, हा मोर्चा टिकैतने अचानकच मागे घेतला. ज्या दहा मागण्या त्यांनी सरकारसमोर ठेवल्या होत्या, त्यावर कुठलेही स्पष्ट वक्तव्य दिले नाही.

काही दिवसांपूर्वी पार पडलेल्या बंगालच्या निवडणूकीत राकेश टिकैत व आंदोलनातील इतर नेत्यांनी तृणमूल काँग्रेससाठी प्रचार केला! राजकीय कैद्यांना मुक्त करण्यासाठी निदर्शने केल्याने आंदोलनाचे नुकसान झाल्याचे वक्तव्य देणाऱ्या संयुक्त किसान मोर्चातील नेत्यांनी बंगालमध्ये लोकशाही अधिकारांना दाबण्यात आणि गुंडगिरीत पुढे असलेल्या तृणमूल काँग्रेससाठी प्रचार केला. मोदीलाही लाजवेल इतका दांभिकपणा ह्या शेतकरी नेत्यांनी केला आहे!

### आंदोलनाची झालेली गोची

आंदोलनाच्या नेतृत्वाला आता लक्षात येत आहे की तिनही कायद्यांना मान्य करा या मागण्यांवर अडून बसण्यात अर्थ नाही. दर्शन पाल आणि उग्राहांनी केलेली वक्तव्ये, त्यांच्या बदलत्या भुमिका हे दर्शवतातच. परंतु मोदी सरकार सुद्धा ऐकायला तयार नाही आणि चर्चेमध्ये कोणतीही सूट द्यायला तयार नाही. आंदोलन उभे करण्याकरिता उद्वेलित केलेल्या जनाधाराच्या भितीमुळे, "तिनही कायदे रद्द केल्याशिवाय परत येणार नाही" अशा घोषणा देणारे या आंदोलनाचे नेते आता इकडे आड आणि तिकडे विहीर या परिस्थितीत अडकले आहेत. निश्चितपणे तिनही कायद्यांना रद्द कराची मागणी सोडून लवचिकता तर नेतृत्वाने दाखवणे चालू केलेच आहे, आणि 'तडजोड नको' या सुरूवातीच्या भुमिकेवर स्वत:वरच टीकास्त्र सुद्धा सोडले आहे. कार्यकर्त्यांना 'समजावण्याचे' काम तर त्यांनी चालू केलेच असेल! तेव्हा स्वत:ला 'क्रांतिकारक' म्हणवणाऱ्या या आंदोलनाची झालेली गोची स्पष्ट दिसून येत आहे.

धनिक शेतकरी, कुलक वर्ग हा शेतमजुरांचा शोषक वर्गच आहे आणि भारतातील सत्ताधारी भांडवलदार वर्गाचा तो नेहमीच एक घटक राहिलेला आहे. सध्याचे आंदोलन हे कॉर्पोरेट भांडवलदार वर्ग आणि धनिक शेतकरी वर्गामधले भांडण आहे. कामगारवर्ग आणि गरीब शेतकरी वर्गाने या आंदोलनात धनिक शेतमालक वर्गाचे शेपूट न बनता, काळाबाजारीच्या बाजूने असलेल्या तिसऱ्या कायद्याविरोधात उभे राहणे हीच योग्य राजकीय भुमिका आहे.

# क्रांतिकारी समाजवादाने कशा प्रकारे महामारींवर नियंत्रण आणले

पान 16 वरून

जनांदोलन बनवण्याचा संकल्प केला गेला. क्रांतिकारी चीन मध्ये सुरूवातीपासूनच आरोग्य, स्वच्छता आणि लसीकरणाची मोहिम छेडली गेली. 1950 ते 1952 पर्यंत जवळपास 60 कोटी लोकांना देवीची लस दिली गेली ज्यामुळे देवीच्या रोग्यांची संख्या खूप कमी झाली. टायफसच्या केसेसमध्ये 95 टक्के कपात झाली. 1957 पर्यंत चीनच्या दोन तृतीयांशापेक्षाही अधिक हिश्श्यांमध्ये मलेरिया, प्लेग, सिस्टोसोमियासीस, लिश्मैनियासीस, ब्रुसेलोसीस सारख्या आजारांवर नियंत्रण मिळवण्यासाठी साथरोग नियंत्रक केंद्र उघडली गेली होती.

याच काळात 'देशप्रेमी आरोग्य मोहिम' सुद्धा सुरू करण्यात आली जिचे उद्दिष्ट लोकांमध्ये स्वच्छ वातावरण, सुरक्षित पिण्याचे पाणी, शौचालयांची निर्मिती आणि मलमूत्र विल्हेवाटीबद्दल जागरूकता निर्माण करणे होते. सोवियत संघाप्रमाणेच चीनने सुद्धा लोकांमध्ये जागरूकता पसरवण्यासाठी मोठ्या प्रमाणात पोस्टर्सचा वापर केला. 1950 च्या दशकाच्या शेवटी चार हानीकारक किड्यांच्या (माश्या, डास, उंदीर आणि चिमण्या - नंतर चिमण्यांच्या जागी ढेकूणांचा समावेश केला गेला) विरोधात जनतेला संघटित केले गेले. याप्रकारे लोकांच्या जुन्या सवयी आणि पद्धती बदलल्या गेल्या आणि स्वच्छतेचा सन्मान करण्याचा दृष्टीकोण लोकांमध्ये मूळ धरू लागला.

1965 मध्ये सांस्कृतिक क्रांती सुरू झाल्यानंतर आरोग्य सुविधांना नीट-नेटके करण्याच्या ध्येयावर अधिक जोर दिला गेला. आरोग्य मंत्रालय आणि चीनी मेडिकल असोसिएशनला "संघर्ष, टीका आणि बदल" यांचे संघर्ष केंद्र बनवले गेले. या दरम्यान मेडिकल कॉलेजांमध्ये कोणताही नवीन वर्ग सुरू केला गेला नाही आणि अगोदरच शिकत असलेल्या मेडिकल च्या विद्यार्थ्यांना व्यावहारिक प्रशिक्षण देऊन गावांमध्ये पाठवले गेले.

या दरम्यान गावागावात आणि दूरवरच्या भागांपर्यंत आरोग्य सुविधा घेऊन जाणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांची एक पूर्ण फौजच उभी केली गेली जिच्यामध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थी-युवकांना आणि विशेषत: मुलींना सामील केले गेले. 'बेअरफूट डॉक्टर' (अनवाणी डॉक्टर) म्हटल्या जाणाऱ्या या आरोग्य कर्मचाऱ्यांना तीन ते सहा महिन्यांचे मूलभूत मेडिकल आणि पॅरामेडिकल प्रशिक्षण दिले जाई. हे आरोग्य कर्मचारी उपचारापेक्षा आजार नियंत्रणावर जास्त जोर देत. त्यांना लस देण्याचे, बाळंतपणाचे आणि इतर प्राथमिक उपचार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले होते. आधुनिक चिकित्सा प्रणाली आणि औषधांसोबतच ते ॲक्युपंक्चर आणि मॉक्सिबशन सारख्या चीनी पारंपारिक चिकित्सा पद्धतींचा आणि औषधांचा वापर करत. गंभीर रोगांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांना ते कौंटी हॉस्पिटलला पाठवत. 1970च्या दशकात चीनच्या आरोग्य कार्यक्रमाला जागतिक आरोग्य संघटनेने सुद्धा स्विकारले होते आणि जगातील इतर भागांमध्ये सुद्धा अशाप्रकारच्या आरोग्य कार्यक्रमाला प्रोत्साहन देण्यास अनुमोदन दिले होते.

सांस्कृतिक क्रांतीच्या काळात शहरातील आरोग्य कर्मचाऱ्यांना एकतर निश्चित जागी - जसे कौंटी हॉस्पिटल आणि कम्युन हॉस्पिटल किंवा 'फिरत्या मेडिकल टीम्स' मध्ये तैनात केले गेले. कोणत्याही वेळी प्रत्येक शहरी हॉस्पिटलचा किमान एक तृतीयांश कर्मचारी वर्ग गावांमध्ये असायचा. ते सहा महिन्यांपासून ते एक वर्षांपर्यंतचा काळ तेथे घालवत असायचे आणि वर्षातून दोनदा आपल्या कुटुंबियांना भेटू शकत होते. जर ते जास्त काळ गावांकडे घालवू इच्छित असायचे, तर ते आपल्या कुटुंबालाही सोबत ठेवू शकत होते. काही शहरी डॉक्टर्स तर कायमस्वरूपी गावांमध्ये स्थायिकही झाले.

गावांकडे पाठवण्याचे एक अजून कारण हे होते की शहरी डॉक्टर्स, मेडिकल कॉलेजांचे शिक्षक आणि संशोधक यांना कठीण मेहनत आणि शेतकऱ्यांशी संपर्क याद्वारे 'पुनर्शिक्षित' केले जावे. जे लोक गावांमध्ये राहून आले ते सांगत की त्यांना शेतकऱ्यांच्या कठीण जीवनाचा अंदाजही नव्हता आणि शेतकऱ्यांचा गरजा समजल्यामुळे आता वैद्यकीय सेवेप्रती त्यांचे उत्तरदायित्व कशाप्रकारे अजून वाढले आहे. 1965 अगोदरही 'सहायकां'च्या विकासाचे प्रयत्न झाले होते, परंतु 'सांस्कृतिक क्रांती' दरम्यान एका नवीन पद्धतीच्या आरोग्य कर्मचाऱ्यांची निर्मिती झाली जे 'नियमित' डॉक्टर्स आणि इतर आरोग्य कर्मचाऱ्यांपेक्षा खूप वेगळे होते. या नवीन आरोग्य कर्मचाऱ्यांना आकड्यांमध्ये मोजताना आरोग्य कर्मचारी म्हणून मोजले जात नव्हते. त्यांची मोजणी कृषी श्रमिक (अनवाणी डॉक्टर्स), उत्पादन श्रमिक (श्रमिक डॉक्टर्स), किंवा गृहिणी आणि सेवानिवृत्त लोकांमध्ये (रेड मेडिकल वर्कर) केली जाई आणि ते स्वत:लाही तसेच समजत.

याशिवाय आरोग्य सेवांच्या संरचनेत मोठे बदल केले गेले. या संबंधात सर्वात मोठा मुद्दा 1949 नंतर एका उच्चभ्रू मॅनेजर्स आणि बुद्धिजीवींच्या गटाचा विकास होता, ज्याला माओ आणि त्यांचे साथी प्रतिक्रांतिकारी प्रवृत्ती मानत होते. 1971 मध्ये इतर संघटनांप्रमाणेचे आरोग्य संघटनांचे नेतृत्व सुद्धा 'क्रांतिकारी समित्यां'च्या हातात आले होते. या समित्यांमध्ये 'जन मुक्ती सेने'चे प्रतिनिधी, कॅडरचे सदस्य आणि आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधी 'तीनास-एक' प्रमाणात असत.

या प्रयत्नांच्या परिणामी क्रांतिकारी चीनने ना फक्त महामाऱ्यांचा यशस्वी सामना केला, तर तेथील लोकांच्या आयुर्मानात आणि जीवनस्तरात जबरदस्त सुधारही झाला. याचा अंदाज या आकड्यावरून येऊ शकतो की क्रांतीपूर्व चीनमध्ये नवजात मृत्यू दर 1000 पैकी 300 इतका होता, जो 1970 चे दशक येता-येता 40 वर खाली आला होता, जो अमेरिकेसारख्या विकसित देशांच्या समतुल्य होता.

**अनुवाद: राहुल**

# हेलिन बोलेक आणि इब्राहिम गोक्चेक यांच्या आठवणी

## जगभरातील फॅसिस्ट आणि हुकूमशहांविरोधातील संघर्षांमध्ये आम्हाला प्रेरणा देत राहतील!

✍ सत्यम

(तुर्कस्तानातील हुकूमशाही विरोधात लढणारे क्रांतिकारी कलाकार इब्राहिम गोक्चेक यांच्या 8 मे या शहादत दिनी साथी सत्यम यांनी 2020 मध्ये लिहिलेल्या लेखाचा अनुवाद)

अलविदा इब्राहिम गोक्चेक! क्रांतिकारी लाल सलाम!


हेलिन बोलेक नंतर आजच्याच दिवशी (8 मे 2020 रोजी) त्यांचे साथी संगीतकार इब्राहिम गोक्चेक सुद्धा आपल्याला सोडून गेले. मुक्तपणे गिटार वाजवता यावी, यासाठी स्वातंत्र्याच्या मागणीसाठी 323* दिवसांच्या उपोषणानंतर इब्राहिम सुद्धा आपल्या साथी हेलिन यांच्या मार्गावर गेले, ज्या 288 दिवसांच्या उपोषणानंतर 3 एप्रिल 2020 रोजी आपल्याला सोडून गेल्या होत्या. (*तुर्कस्तानात ही परंपरा आहे की उपोषणादरम्यान काहीच ठोस पदार्थ खात नाहीत, परंतु पातळ पदार्थ घेऊ शकतात.)

हे दोघेही तुर्कस्तानातील क्रांतिकारी संगीत बँड 'ग्रुप योरम'चे सदस्य होते. तुर्कस्तानातील एर्दोगानच्या पाशवी सत्तेने या बँडवर याकरिता बंदी घातली होती कारण की हा बँड एर्दोगानच्या जुलमी आणि पुराणपंथी सत्तेचा विरोध करत होता, आणि समाजवाद व कामगार वर्गाचे गीत गात होता. 2016 मध्ये बँडच्या सर्व सदस्यांच्या अटकेच्या फर्मानानंतर पोलिसांनी त्यांच्या सांस्कृतिक केंद्रांवर छापे मारले आणि त्यांच्या वाद्य यंत्रांनाही नष्ट केले. तुर्कस्तानात पहिल्यांदाच कलाकारांच्या डोक्यावर इनाम जाहीर केले गेले आणि त्यांना 'फरार दहशतवाद्यांच्या' यादीत टाकले गेले.

एर्दोगानच्या फॅसिस्ट सत्तेकरिता ते दहशतवादी आणि देशद्रोही होते कारण ते त्या खाण कामगारांचे गीत गात होते जे जमिनीखाली सात मजले खोलवर अत्यंत खराब स्थितींमध्ये काम करताना मरत होते; कारण ते त्या क्रांतिकारकांचे गीत गात होते ज्यांना एर्दोगानच्या फॅसिस्ट सत्तेने छळ करून मारून टाकले होते; कारण ते त्या शेतकऱ्यांचे गीत गात होते ज्यांच्या जमिनी हिसकावून घेतल्या गेल्या होत्या, ते तुर्कस्तानातील उत्पीडीत कुर्दीश लोकांचे गीत गात होते, ते त्या गरिबांबद्दलचे गीत गात होते ज्यांच्या झोपड्या बुलडोझर्सनी तोडल्या गेल्या होत्या, आणि ते त्या बुद्धीजीवींचे गीत गात होते ज्यांना गप्प करण्यासाठी मृत्यूदंड दिला जात होता. ते विरोधाचे गीत गात असत आणि रेसेप तैयप एर्दोगानच्या क्रूर शासनासाठी हे दहशतीपेक्षा कमी नव्हते.

जन आंदोलनांच्या पाशवी दमनानंतर 2016 मध्ये एर्दोगानद्वारे आणीबाणीची घोषणा होताच कार्यकर्ते, पत्रकार, आणि लेखक-कलाकार-संगीतकारांवरचे दमनचक्र तीव्र झाले होते. तुर्कस्तानात अत्यंत लोकप्रिय असलेल्या इब्राहिम आणि त्यांच्या बँडच्या सदस्यांना अचानक एक दिवस समजले की त्यांना दहशतवादी घोषित








केले गेले आहे आणि त्यांच्या डोक्यावर इनाम घोषित करण्यात आले आहे. त्यांच्या घरांवर आणि सांस्कृतिक केंद्रांवर 2 वर्षात 9 वेळा छापे मारले गेले. शेवटी त्यांना अटक करण्यात आली. अटकेच्या काही दिवस अगोदरच गेल्या वर्षी इब्राहिम आणि हेलिन बोलेकने राजकीय कैद्यांच्या अधिकारांच्या मागणीवर उपोषण सुरू केले होते आणि नंतर त्यालाच आमरण उपोषणात परिवर्तित केले होते. त्यांच्या मागण्या होत्या की त्यांच्या बँडवरची बंदी हटवली जावी, तुर्कस्तानात कुठेही त्यांना आपले संगीत प्रस्तुत करण्याचे स्वातंत्र्य मिळावे, त्यांच्या सर्व अटक झालेल्या साथींना मुक्त केले जावे आणि त्यांच्यावरील खटले मागे घेतले जावेत.

त्यांना गेल्या नोव्हेंबर मध्ये तुरुंगातून सोडले गेले पण आपल्या मागण्यांना घेऊन त्यांचा विरोध चालूच राहिला. ग्रुप योरम बँडचे दोन सदस्य अजूनही जेल मध्येच आहेत. त्यापैकी एक गोक्चेक यांची पत्नी आहे.

तुर्कस्तानातील शेकडो लेखक-कलाकार आणि मानवाधिकार कार्यकर्त्यांच्या आवाजाकडे दुर्लक्ष करत फॅसिस्ट सत्ता अडून बसली की त्यांनी अगोदर उपोषण समाप्त करावे, त्यानंतरच त्यांच्याशी चर्चा होऊ शकेल. पण हे दोन्ही क्रांतिकारी कलाकारही आपल्या इराद्यांचे पक्के होते. अठ्ठावीस वर्षांची सुंदर आणि लोकप्रिय गायिका हेलेन 288 दिवसांच्या उपोषणानंतर 3 एप्रिल 2020 रोजी नाही राहिली. ती आज इस्तंबुलच्या एका स्मशानभूमीत पहुडलेली आहे.

मृत्यूच्या काही दिवस अगोदर 41 वर्षीय इब्राहिमने लिहिलेल्या पत्रात म्हटले होते, "मी खिडकी बाहेर बघतो आणि मला इस्तंबुलच्या गरिबांच्या वस्त्या दिसतात. मी याप्रकारे कमजोर आहे की बाहेर जाऊ शकत नाही, माझे वजन आता फक्त 40 किलो आहे. पण मी कल्पना करतो की मी माझ्या गिटार सोबत मंचावर आहे आणि मी बघतो आहे की हजारो तुर्क लोक आकाशात मुठी लहरावत 'बेला चालो'* गात आहेत. (*दुसऱ्या महायुद्धात फॅसिस्टांशी लढणाऱ्या इटालियन छापेमारांचे गीत)

सतत म्हटले जाते की कम्युनिस्ट एका स्वप्नदुनियेत (युटोपियात) जगत आहेत आणि समाजवाद एक अयशस्वी सिद्धांत आणि कधीही खरे न होणारे स्वप्न आहे. मग काय कारण आहे की सर्व जगामध्ये गरिब आणि कामगारांच्या अधिकारांकरिता आवाज उठवणाऱ्यांना रोज सतावले जाते? काय कारण आहे की सर्व सत्ता त्यांचा आवाज दडपून टाकण्यासाठी जुलमाची पराकाष्ठा करायला तयार होतात? भारत असो वा तुर्कस्तान, सगळे फॅसिस्ट त्यांना याप्रकारे का घाबरतात?

उत्तर स्पष्ट आहे. सगळे हुकूमशहा जाणतात की क्रांतिकारी आपल्या जीवावर उदार होऊन त्यांचा ढोंगीपणा लोकांसमोर नागडा करतील. ते जाणतात की कम्युनिस्ट इतिहासाला कूस बदलायला भाग पाडू शकतात. ते जाणतात की जिद्दी लोक तोपर्यंत लढत राहतील जोपर्यंत जगामध्ये लढण्याची गरज बाकी असेल, ते तोपर्यंत झुंझत राहतील जोपर्यंत ते आपल्या आजूबाजूच्या भौतिक परिस्थितींना बदलवून सोडत नाहीत. ते समजतात की हेच ते लोक आहेत जे लोकांच्या हृद्यात क्रांतीचे रोपटे लावतील आणि तेव्हा भूक, अपमान आणि मृत्यूवर टिकलेल्या त्यांच्या सत्तेची कालघटिका भरणे सुरू होईल. यामुळेच आपल्या भितीला लपवण्यासाठी ते सतत ओरडत राहतात की कम्युनिझ्म संपला आहे आणि दिवसरात्र ते आपल्याला गप्प करायच्या, संपवायच्या आणि तुरूंगात टाकायच्या षडयंत्रांच्या तयाऱ्या करत असतात.

पण त्यांना माहित नाही की हेलिन आणि इब्राहिम सारखे लोक कधी मरत नाहीत. आपल्या प्रिय भगतसिंह आणि पाश प्रमाणे ते कोट्यवधी लोकांच्या हृद्यात जीवंत राहतात, त्यांच्या हृदयाला आशा आणि हिंमतीने प्रकाशमान करत राहतात, आणि सत्ताधीशांच्या छातीत चाकूसारखे धसून राहतात.

भारताच्या जनतेच्या वतीने आम्ही हेलिन आणि इब्राहिमला क्रांतिकारी सलाम अर्पण करतो. कॉम्रेड, तुमच्या रक्ताने एक दिवस क्रांतीची फुलं बहरतील आणि नाजिम हिकमत व रूमीची धरती तुमच्या संघर्षांच्या आठवणीत लिहिलेल्या कविता आणि गीतांनी निनादून जाईल.

**अनुवाद - निश्चय**

# लाखोंचे मृत्यू! फॅसिस्ट मोदी सरकारचे करोना थांबवण्यात घोर अपयश!

**पान 4 वरून**

भरकटवण्याचे काम सुरू करून दिले आहे. एकीकडे झालेल्या सर्व मृत्यूंना 'व्यवस्था' नामक कोणतीतरी शासन-बाह्य शक्ती कारणीभूत आहे असा प्रचार चालवला गेला (इथे हे आठवले पाहिजे की जेव्हा पहिली लाट ओसरत होती तेव्हा सर्व श्रेय मोदीला, भाजप सरकारला दिले जात होते), यामध्ये मोदी आणि भाजप सरकारचा उल्लेख प्रकर्षाने टाळला जात आहे. दुसरीकडे विरोधी पक्षांचे षडयंत्र, चीनने घडवलेला व्हायरस हल्ला, राज्य सरकारांचे अपयश, विदेशी मीडियाचे षडयंत्र अशा षडयंत्र सिद्धांतांचा प्रसार करतानाच, शेठ रामदेव यांच्या मार्फत जणू काही ॲलोपथीचे तंत्रच लाखो मृत्यूंना कारणीभूत आहे अशा चर्चेला तोंड फोडून, करोनाच्या अपयशावरील चर्चेला ॲलोपथी विरुद्ध आयुर्वेद असे रूप देऊन, सरकारच्या भुमिकेला पुन्हा सतरंजीखाली सरकावण्याचे प्रयत्न होत आहेत.

### सावध रहा, माथी भडकावणाऱ्या प्रचारांचा पुन्हा हल्ला होणार आहे!

अशामध्ये जनतेमध्ये जो असंतोष वाढत आहे, जो प्रचंड राग खदखदत आहे, त्या रागाला त्याच्या खऱ्या कारणांविरोधात म्हणजेच नफेखोर व्यवस्थेविरोधात, बेरोजगारी विरोधात, भांडवलदार वर्गाच्या हितासाठी चालणाऱ्या राज्यसत्तेच्या विरोधात जाऊ न देण्यासाठी सत्तेत बसलेले फॅसिस्ट त्यांचा नेहमीचा विखारी खेळ खेळणार. जेव्हा जेव्हा अशी राजकीय संकटाची स्थिती बनत जाते, तेव्हा तेव्हा हिंदू-मुस्लिम, आरक्षण, पाकिस्तान-बांग्लादेश, देशवासी आणि 'घुसखोर' अशा माथी भडकावणाऱ्या नकली मुद्यांचा वापर संघी फॅसिस्ट सतत करत आले आहेत. तेव्हा सावध रहा! कामगार-कष्टकरी वर्गाने या प्रचारांना बळी न पडता, सामाजिक सौहार्द टिकवत, एकजूट होऊन खऱ्या शत्रू विरोधात म्हणजेच भांडवली व्यवस्थेविरोधात, आरोग्य व्यवस्थेच्या राष्ट्रीयीकरणासाठी, मोफत आणि सार्वत्रिक लसीकरणासाठी, बेरोजगारी भत्त्यासाठी आणि कायम स्वरूपी कामासाठीचे संघर्ष तीव्र करण्यावर जोर दिला पाहिजे.

# क्रांतिकारी समाजवादाने कशा प्रकारे महामारींवर नियंत्रण आणले

## सोवियत संघाचे आणि क्रांतिकारी चीनचे अनुभव

✍ आनंद सिंह

गेल्या दीड वर्षांपासून चालू असलेल्या करोना जागतिक महामारीने फक्त सर्व भांडवली देशांच्या सरकारांचेच नाकर्तेपण उघडे केले नाही तर भांडवली आरोग्य व्यवस्थेचे जनविरोधी चरित्रही पूर्णत: उघडे पाडले आहे आणि भांडवलशाहीच्या मर्यादांना प्रखरपणे समोर आणले आहे. नफ्याच्या अंतहीन लालसेवर टिकलेल्या भांडवलशाहीचे क्रूर वास्तव आता सर्वांसमोर आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानातील विलक्षण प्रगतीचा वापर महामारीवर नियंत्रण मिळवण्याऐवजी जास्तीत जास्त नफ्याच्या संधी शोधण्यासाठी केला जात आहे. भांडवलशाहीच्या या मानवद्रोही चरित्राचे पितळ उघडे पडत असताना हा प्रश्न अत्यंत प्रासंगिक झाला आहे की समाजवादामध्ये महामारींवर नियंत्रण कशाप्रकारे केले जाते. या लेखामध्ये आम्ही विसाव्या शतकातील दोन महान क्रांत्यांनी, रशियन क्रांती आणि चिनी क्रांतीने, महामाऱ्या आणि आजारांवर नियंत्रणासाठी केलेल्या उपायांची चर्चा करू.

### ऑक्टोबर क्रांती नंतर रशियाने महामारींवर नियंत्रण कसे आणले?

रशियात 1917 च्या बोल्शेविक क्रांतीनंतर स्थापित झालेल्या समाजवादी सत्तेला एकीकडे आपल्या अस्तित्वाच्या रक्षणासाठी 14 साम्राज्यवादी देशांचा हल्ला, घेरेबंदी आणि देशामध्ये चालू असलेल्या गृहयुद्धाचा आणि भीषण अन्न संकटाचा सामना करावा लागत होता आणि दुसरीकडे त्याचवेळी अनेक महामाऱ्यांचाही सामना करावा लागत होता. हा तोच काळ होता जेव्हा जगामध्ये स्पॅनिश फ्ल्यू नावाची महामारी पसरली होती. रशियामध्ये स्पॅनिश फ्लू पेक्षाही जास्त कहर टायफस नावाच्या आजाराने केला होता. 1918 ते 1922 च्या दरम्यान टायफसने जवळपास 25 लाख लोकांचे बळी घेतले होते. याशिवाय कॉलरा (पटकी), देवी आणि क्षयरोगाने सुद्धा महामारीचे रूप घेतले होते. लक्षात घ्या की हा तोच काळ होता जेव्हा पहिले महायुद्धही चालू होते आणि ज्यामुळे सुद्धा परजीवी विषाणूंच्या पोषणाला सहाय्य होत होते आणि सर्व आजार महामारींचे रूप घेत होते.

हे सुद्धा लक्षात घ्यावे की समाजवादी सत्तेकडे त्यावेळी अत्यंत मर्यादित संसाधने होती आणि युद्ध व गृहयुद्धाच्या परिस्थितीमध्ये त्यांच्यासमोरचे आह्वान अजूनच कठीण झालेले होते. त्यावेळी जीवशास्त्र आणि वैद्यकीय शास्त्रही आजच्या तुलनेत बरेच मागे होते. ॲंटीबायोटिक्स सारखी औषधेही अजून शोधली गेलेली नव्हती. युद्धामुळे दवाखाने, चिकित्सेची उपकरणे, डॉक्टर्स आणि आरोग्य कर्मचाऱ्यांचा मोठा तुडवडा होता.

अशा बिकट परिस्थितीमध्ये नवजात कामगार सत्तेने महामारीवर काबू मिळवण्यासाठी जे उपाय केले त्यांच्यापासून आजही प्रेरणा घेतली जाऊ शकते. सोवियत सत्तेने क्रांतीनंतर लगेचच आरोग्य सेवांचे राष्ट्रीयीकरण केले ज्यामुळे औषधे आणि इतर आरोग्य सुविधांचा योजनाबद्ध पद्धतीने वापर केला जाऊ शकला. काळाबाजार करणाऱ्यांविरोधात कडक कारवाई करून आरोग्य सुविधा जनतेला मोफत उपलब्ध करवली गेली. औषधे आणि चिकित्सेच्या उपकरणांच्या उत्पादनासाठी नवीन कारखाने सुरू केले गेले आणि प्रत्येक शहरात, आणि गावामध्ये नवीन दवाखाने उघडले गेले. या तातडीने उचलल्या गेलेल्या पावलांमुळेच रशियामध्ये स्पॅनिश फ्लूवर भांडवली देशांच्या अगोदर नियंत्रण मिळवले गेले. क्रांतीचे एक वर्ष पूर्ण होण्याअगोदरच जुलै 1918 मध्ये सार्वजनिक आरोग्याची जन-कमिसारियत (नारकोमज्द्राव) स्थापन केली जिचे उद्दिष्ट सोवियत संघामध्ये आरोग्या संबंधातील संस्था, शोध आणि संशोधन, महामारीवर लक्ष ठेवणाऱ्या संस्था, चिकित्सेचे शिक्षण आणि प्रशिक्षण तसेच आरोग्य व स्वच्छतेबद्दल जागरूकता पसरवणाऱ्या संस्थांमध्ये ताळमेळ घालून एका एकीकृत आणि सार्वत्रिक व्यवस्थेची स्थापना करणे होते. नारकोमज्द्राव चे सर्व काम



दोन वैचारिक स्तंभांवर आधारित होते: पहिला, लोकांच्या आरोग्यासंदर्भात सामाजिक कारकांना प्राधान्य आणि दुसरे, रोग निवारणाऐवजी रोग नियंत्रणाच्या पद्धतींना प्राधान्य.

तत्कालीन रशियन समाजाचे मागासलेपण आणि शिक्षणाचा अभाव पाहता सोवियत सत्तेने लोकांमध्ये आरोग्य आणि स्वच्छतेसंबंधातील मूलभूत माहिती मोठ्या प्रमाणावर प्रसारित करणयचा वीडा उचलला आणि आरोग्य व स्वच्छतेला एका जनांदोलनाचे रूप दिले. आजची भांडवली सत्ता टीव्ही, इंटरनेट, आणि सोशल मिडीया असूनही आरोग्य आणि स्वच्छतेसंबंधी खरी माहिती लोकांपर्यंत पोहोचवू शकत नाहीये. पण आजपासून एक शतक अगोदर समाजवादी सत्तेने हे काम पोस्टरांद्वारे प्रभावी पद्धतीने पूर्ण करून दाखवले. शहरे, आणि गावखेड्यांमध्ये आरोग्य व स्वच्छतेविषयी जागरूकता पसरवणाऱ्या पोस्टर्सचा भडीमार केला गेला. विक्तोर देनी आणि दिमित्री मूर सारख्या जनकलाकारांनी अशी रचनात्मक पोस्टर्स बनवण्यात मोठे योगदान दिले. ही पोस्टर्स सोप्या भाषेत आणि तक्ते,नकाशे, आणि फोटोंसहित बनवले जात जेणेकरून कमी शिकलेले आणि निरक्षर लोकही त्यांना समजू शकतील.

महामारींना पसरवण्यापासून थांबवण्यासाठी लोकांमध्ये जागरूकता पसरवणाऱ्या मोहिमेला 'स्वच्छता प्रबोधन' नाव दिले गेले. या मोहिमेचे वैशिष्ट्य असे होते की तिला शहरे, गावं, खेड्यांमध्ये कामगार आणि शेतकऱ्यांच्या समित्यांच्या सहभागातून चालवले गेले. मोठ्या प्रमाणात पोस्टर लावण्याखेरीज या समित्या घरांची आणि सार्वजनिक ठिकाणांची पाहणी करत आणि लोकांमध्ये आरोग्य व स्वच्छतेसंदर्भातील महत्वाची माहिती देत तसेच नियमित अंघोळ आणि हात साफ करण्यासाठी साबणांचे वितरण करत असत. याशिवाय देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत आरोग्य व स्वच्छतेसंदर्भात माहिती देण्यासाठी विशेष ट्रेन चालवल्या गेल्या ज्यांमध्ये हॉस्पिटलच्या सुविधा उपलब्ध होत्या. इतकेच नाही तर सार्वजनिक स्नानघर आणि शौचालयांची व्यवस्था असलेल्या ट्रेन्स सुद्धा चालवल्या गेल्या.

क्रांती नंतर चिकित्सक, सह-चिकित्सक, नर्स, दाई, दंतचिकित्सक, फार्मासिस्ट आणि इतर आरोग्य कर्मचाऱ्यांच्या तुटवड्याला कमी करण्यासाठी विशेष शिक्षण व प्रशिक्षण अभियान चालवले गेले. 1913 आणि 1926 च्या दरम्यान अशा आरोग्य कर्मचाऱ्यांच्या संख्येमध्ये 60 टक्के वाढ झाली.

'दहा दिवस ज्यांनी दुनियेला हलवून सोडले' सारख्या ऐतिहासिक पुस्तकांचे लेखक, प्रसिद्ध अमेरिकन पत्रकार आणि क्रांतिकारी बुद्धिजीवी जॉन रीड याच दरम्यान रशियाच्या दौऱ्यावर होते. टायफसचा कहर इतका होता की रीड सुद्धा आजारी पडले. टायफसच्या संक्रमणामुळेच 1920 मध्येच त्यांचा मृत्यू झाला. आपल्या मृत्यूच्या काही दिवस अगोदरच त्यांनी सोवियत रशियातील महामारीच्या बिकट परिस्थितीबद्दल आणि समाजवादी सत्तेद्वारे महामारी संपवण्यासाठी केल्या जात असलेल्या उपायांचे विस्तृत वर्णन 'लिबरेटर' नियतकालिकातील एका लेखात केले आहे. या लेखात रीड लिहितात:

“टायफस, एक थांबत-थांबत येणारा ताप, एन्फ्ल्युएंझा कामगारांमध्ये वेगाने पसरत होते; गावांमध्ये एकीकडे पेलाग्रा आजाराचा कहर होता , तर दुसरीकडे शेतकऱ्यांना मीठ सुद्धा मिळत नव्हते. दोन वर्षांपेक्षा जास्त काळापासून अर्धपोटी राहणाऱ्या लोकांची शरीरं आजारांशी लढू शकत नव्हती. मित्र देशांद्वारे रशियाला औषधं पाठवण्यावर बंदीच्या धोरणामुळे हजारो मृत्यू झाले. असे असूनही सार्वजनिक आरोग्याच्या जन-कमिसारियतने एका बलाढ्या स्वच्छता सेवेची निर्मिती केली, जी संपूर्ण रशियामध्ये स्थानिक सोवियतच्या नियंत्रणामध्ये असलेल्या आरोग्य उपविभागांचे एक नेटवर्क होती. त्यांची पोहोच त्या भागांपर्यंतही होती जिथे अगोदर कधी कोणी डॉक्टर पोहोचलाही नव्हता. प्रत्येक टाऊनशीप मध्ये आता कमीत कमी एक आणि अनेकदा तर दोन-तीन हॉस्पिटल बनवले गेले होते. या सेवांतर्गत अगोदर डॉक्टरांना संघटित केले जाई आणि अजूनही केले जात आहे. सांगण्याची गरज नाही की या सेवा पूर्णत: मोफत आहेत. आकर्षक रंगातील लाखो पोस्टर्स प्रत्येक जागी लावले गेले आहेत ज्यांमध्ये चित्रांच्या माध्यमातून लोकांना सांगितले गेले आहे की आजारापासून रक्षण कसे करावे आणि त्यांना घरांची, गावाची आणि स्वत:ची स्वच्छता करण्यासाठी आग्रह केला आहे. रशियामध्ये एका अखिल रशियन मातृत्व प्रदर्शनाची सुरुवात केली गेली, जिचे उद्दिष्ट मुलांना जन्म देण्याबद्दल आणि त्यांच्या पालनपोषणाबद्दल महिलांना जागरूक करणे आहे. या प्रदर्शनाला रशियाच्या दुर्गम गावांपासून ते देशाच्या कानाकोपऱ्यात नेले गेले. प्रत्येक गावात आणि शहरात कामगार महिलांसाठी मोफत मातृत्व हॉस्पिटल आहे जिथे त्या मूल होण्याच्या आठ आठवडे अगोदर आणि नंतर वेळ घालवतात, आणि त्यांना मुलांची देखभाल करायला शिकवले जाते. या दरम्यान त्यांना पूर्ण वेतन मिळते. इतकेच नाही तर गावातील मोफत दवाखान्यांशिवाय(ज्यांची संख्या झारकालीन संख्येच्या दसपट आहे) दुधपीत्या मुलांच्या आयांसाठी विशेष सल्ला केंद्रही आहेत. इथे मुलांसाठी सगळं काही केलं जातं. अर्धउपासमार भोगणाऱ्या जर्मनीतील मुलं अत्यंत कमजोर पैदा होत आहेत, आणि मोठी होऊन त्यांच्या शरीरांमध्ये विविध विकृती निर्माण होत आहेत, याउलट अर्धउपासमार भोगणाऱ्या रशियामध्ये मुलं बादशहा आहेत.”

रशियान क्रांतीनंतर अस्तित्वात आलेल्या कामगार सत्तेच्या भगिरथ प्रयत्नांचाच परिणाम होता की 1923 पर्यंत ना फक्त तिने साम्राज्यवादी हल्ले, गृहयुद्ध आणि उपासमारीला मात दिली, उलट महामारीवरही मोठ्या प्रमाणात नियंत्रण मिळवले. क्रांतीच्या या सुरुवातीच्या आपात्कालीन वर्षांमध्ये महामारीवर नियंत्रणाकरिता केलेल्या प्रयत्नांना पुढे नेते समाजवादी निर्माणाच्या काळात सोवियत रशियाने आरोग्य व स्वच्छतेवर विशेष जोर दिला आणि कष्टकऱ्यांच्या कामाची तसेच जीवनाची स्थिती आरोग्यपूर्ण बनवण्याच्या दिशेने अभूतपूर्व यश प्राप्त केले.

### क्रांतिकारी चीनने महामारींवर नियंत्रण कसे मिळवले?

1949 च्या नव्या लोकशाही क्रांतीनंतर सत्तेत आलेल्या चीनच्या कम्युनिस्ट पक्षाने सुरुवातीपासूनच लोकांच्या आरोग्याला प्राथमिकता दिली. क्रांतीच्या एका वर्षातच 1950 मध्ये पहिली राष्ट्रीय आरोग्य काँग्रेस आयोजित केली गेली जिच्यामध्ये ग्रामीण आरोग्यावर जोर देणे, अभियानांच्या द्वारे रोगांना अटकाव करणे, आधुनिक आणि पारंपारिक चिकित्सा पद्धतींचा मेळ आणि आरोग्याला

पान 14 वर

• संपादक मंडळ – निखील एकडे, बबन ठोके • संपादकीय कार्यालय- रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग, 7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043
मो. नं. 8669735643 , 9619039793 • जागृति प्रिंटर्स, 12-ए, ग्राउंड फ्लॉर, भायखला सर्विसेज इंडस्ट्रीज, भायखळा, मुंबई - 9820017588 येथे मुद्रित